
MAHMARI 19358/13/1/2000 - TC

विद्या प्रसारक मंडळ
स्थापना • नौपाडा • ठाणे



# व्ही. पी. एम्. दिशा

वर्ष सतरावे / अंक १२ / डिसेंबर २०१६

## संपादकीय

### निश्चलनीकरण : शोध व बोध

८ नोव्हेंबर २०१६ हा दिवस भारताच्या आर्थिक इतिहासातील महत्त्वाचा दिवस ठरला. ह्या दिवशी संध्याकाळी ८.०० वाजता भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी एक धाडसी निर्णय जाहीर केला. हा निर्णय म्हणजे येणाऱ्या काही महिन्यांत भारताची अर्थव्यवस्था पिंजून काढणारा होता. सदर निर्णय म्हणजेच भारतीय अर्थव्यवस्थेतून रुपये ५०० व रुपये १००० ह्या मूल्यांच्या चलनी नोटा बाद करण्याचा म्हणजेच त्यांचे निश्चलनीकरण करण्याचा होता. निश्चलनीकरणास इंग्रजीत 'डिमॉनेटायझेशन' (Demonetisation) असे संबोधले जाते. आज हा निर्णय घेऊन एक महिन्याच्यावर काळ लोटला आहे. तरीसुद्धा प्रसार माध्यमांमध्ये, संसदेमध्ये व समाजामध्ये ह्या निर्णयाविषयी चर्चा होताना दिसते. अनेक लोक पंतप्रधानांच्या ह्या निर्णयाचे कौतुक व स्वागत करताना आढळतात. तर त्याचबरोबर काही लोक हा निर्णय म्हणजे भारतीय अर्थव्यवस्थेला अनाठायी झळ पोहोचविणारा व सामान्य जनतेला त्रास देणारा आहे असे म्हणताना दिसतात. व्यवस्थित विचार केल्यानंतर आपल्या असे लक्षात येते की, ह्या दोन्हीही बाजूंमध्ये थोड्याफार प्रमाणात तथ्य आहे. ह्या निर्णयाचा खऱ्या अर्थाने अर्थव्यवस्थेला फायदा झाला किंवा होईल वा नुकसान झाले किंवा होईल हे येणाऱ्या काही महिन्यांत वा वर्षांत समजेल.

भारतातील निश्चलनीकरणाचा इतिहास पाहता असे जाणवते की, १९४६ व १९७८ साली भारतामध्ये रुपये १०००, रुपये ५,००० व रुपये १०,००० मूल्यांच्या नोटांचे निश्चलनीकरण करण्यात आले होते. १९४६ साली हा निर्णय घेण्यात आला तेव्हा भारताच्या रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर महान अर्थतज्ज्ञ चिंतामणराव देशमुख हे होते. तर १९७८ साली जेव्हा निर्णय झाला तेव्हा केंद्रात जनता पक्षाचे सरकार होते. ह्या दोन्हीही वेळी केंद्र सरकारने निश्चलनीकरण करण्यासाठी वटहुकूम काढलेला होता. येथे हा मुद्दा मांडण्याचे कारण म्हणजे भारतीय अर्थव्यवस्थेच्या दृष्टीने निश्चलनीकरण हे काही नवीन नाही. येथे मुद्दा हा आहे की, १९४६ साली, १९७८ साली व आता नोव्हेंबर २०१६ मध्ये केंद्रीय सरकारांना हा निर्णय घेण्याची आवश्यकता का भासली? ह्याचे उत्तर एकच आहे व ते म्हणजे भारतीय अर्थव्यवस्थेतून काळे धन वा काळा पैसा नष्ट करणे. १९७८ साली देखील असे जाहीर करण्यात आले होते की, मोठे मूल्य असणाऱ्या नोटांच्या स्वरूपात वा माध्यमातून काही धनाढ्यांनी व व्यापाऱ्यांनी मोठ्या प्रमाणात काळे धन

(पृष्ठ क्र २ वर)

(मुखपृष्ठावरून - **संपादकीय)**

साठवून ठेवले आहे व ह्या धनाचा /पैशाचा उपयोग बेकायदेशीर व्यवहार व वस्तुंचा कृत्रीम साठा व यातून वस्तूंचा तुटवडा निर्माण करण्यासाठी केला जातो. असे केल्यामुळे अर्थव्यवस्थेला झळ बसते व महागाई देखील वाढते असे त्यावेळी सांगण्यात आले होते.

आपणा सर्वांस ठाऊक आहेच की, २०१४ च्या सार्वत्रिक निवडणूकांमध्ये भारतीय जनता पक्षाला व ह्या पक्षप्रणीत राष्ट्रीय लोकशाही आघाडीला बहुमत मिळाले व नरेंद्र मोदी देशाचे पंतप्रधान बनले. भारतीय जनता पक्षाने व प्रामुख्याने नरेंद्र मोदींनी निवडणुकीच्या प्रचारादरम्यान भारतातील काळे धन/पैसा बाहेर काढण्याचे वचन दिले होते. ह्या निवडणुकीच्या काळात व नंतरदेखील काही उत्साही लोकांनी तर भारतातील कोणत्या लोकांकडे (प्रामुख्याने राजकीय पक्षांच्या नेतेमंडळींकडे) किती काळा पैसा आहे व त्यांनी हा पैसा स्वित्झर्लंड ह्या युरोपातील देशाच्या 'स्विस' बँकेत ठेवला आहे ह्याचे आकडेवारीसह माहिती देणारे संदेश पाठविले होते. हे संदेश प्रामुख्याने सध्याच्या भ्रमणध्वनींत (Mobile phone) उपलब्ध असलेल्या व्हॉटस्अॅप (whatsapp) ह्या 'स्फॉटवेअर' वा तंत्रज्ञानाच्या मदतीने पाठविलेले होते. असो, तर मुद्दा असा आहे की, भारतीय अर्थव्यवस्थेतील काळ्या पैशाची चर्चा गेली दोन ते अडीच वर्षे मोठ्या प्रमाणात होताना आढळते. त्यामुळे पंतप्रधान नरेंद्र मोदींवर एका प्रकारे ह्या बाबतीत निर्णायक निर्णय घेण्यासाठीचा दबाव होता. नरेंद्र मोदींनी २०१४ साली पंतप्रधान झाल्यानंतर चांगल्या प्रशासनाची सुरुवात केली व देशाच्या हिताच्या दृष्टीने अनेक महत्त्वाचे निर्णय घेतले यात वाद नाही. हे निर्णय प्रामुख्याने भारताच्या परराष्ट्रनीतीबाबत व चीन व पाकिस्तान विषयक धोरणांच्या बाबतीत होते.


अशा तऱ्हेने ह्या पार्श्वभूमीवर काळ्या पैशाच्या बाबतीत ठोस पाऊल उचलण्याच्या दृष्टीने नरेंद्र मोदींनी वर नमूद केल्याप्रमाणे रुपये ५०० व रुपये १००० ह्या मूल्यांच्या नोटांचे निश्चलनीकरण करण्याचा निर्णय घेतला. ३१ डिसेंबर २०१६ पर्यंत सामान्य लोक ह्या नोटांच्या स्वरूपातील आपल्या जवळील पैसा बँकांच्या खात्यात भरू शकतील असेही सांगण्यात आले. मात्र, ह्या नोटा चलनातून अचानकपणे बाद झाल्यामुळे सामान्य जनतेची ससेहोलपट झाली यात वादच नाही. सुरुवातीस देशभर सामान्य लोक उन्हा-तान्हात बँकांच्या बाहेर रांगा लावून असलेले चित्र दिसत असे. अजूनही असे चित्र भारताच्या दुर्गम व दूरवरच्या प्रदेशांमध्ये दृष्टीस पडते. एक विचित्र असा प्रकार पाहण्यास मिळत होता की, लोक जुन्या नोटा बँकांमध्ये भरताहेत व एटीएम् (ATM) यंत्रातून नवीन नोटा काढण्यास गेल्यास नोटा उपलब्ध नसल्याचा संदेश मिळतोय. ह्या प्रकारामुळे काही काळ तरी मुंबई-ठाण्यासारख्या शहरी भागातील लोकांना देखील त्रास झाला. मात्र, एवढे खरे की, हा त्रास झालेला देखील परवडेल परंतु येणाऱ्या काळात ह्या निर्णयामुळे खरोखरच काळ्या पैशाला खीळ बसायला हवी.

सरकारच्या ह्या निर्णयावर विरोधी पक्षांनी टीकेची झोड उठविली. अर्थात, विरोधी पक्ष म्हणून सरकारच्या धोरणांवर आवश्यक तेव्हा टीका करणे व सरकारवर दबाव आणणे ही लोकशाहीमध्ये विरोधी पक्षाची भूमिकाच असते. सत्ताधारी पक्षातील नेते मंडळींनी विरोधकांच्या टिकेला प्रत्युत्तर देखील दिले. किंबहुना ह्या टीका व प्रत्युत्तरांच्या फैरी

(पृष्ठ क्र.४० वर)

व्ही.पी.एम्.

# दिशा



वर्ष सतरावे / अंक १२ / डिसेंबर २०१६

**संपादक**
डॉ. विजय बेडेकर

'दिशा' प्रारंभ जुलै १९९६
(वर्ष २१ वे/अंक ६ वा

**कार्यालय/पत्रव्यवहार**
विद्या प्रसारक मंडळ
डॉ. बेडेकर विद्या मंदिर
नौपाडा, ठाणे - ४०० ६०२
**दूरध्वनी : २५४२ ६२७०**
**www.vpmthane.org**

**मुद्रणस्थळ :**
परफेक्ट प्रिण्टस्,
नूरीबाबा दर्गा रोड, ठाणे.
**दूरध्वनी : २५३४ १२९१**
**२५४१ ३५४६**
**Email:perfectprints@gmail.com**

## अनुक्रमणिका


| | | | |
|---|---|---|---|
| १) | संपादकीय | सुभाष गं. शिंदे | |
| २) | 'स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे व तो मी मिळविणारच!' | सहा. प्रा. सुभाष गं. शिंदे | ३ |
| ३) | ओळख वनस्पतींची - कुंभी | श्री. प्रकाश दुधाळकर | १० |
| ४) | नर्मदा परिक्रमा (भाग : ३४) | श्री. अरविंद ओक | ११ |
| ५) | व्यक्तिवेध-०६: मेघनाद साहा | श्री. नरेंद्र गोळे | १४ |
| ६) | नैतिक आणि आध्यात्मिक पाया | श्री. सदानंद वैजनाथ पाटील | २२ |
| ७) | तत्त्वज्ञान आणि आपण | प्रा. अपर्णा कुलकर्णी | २८ |
| ८) | परिसर वार्ता | संकलित | ३१ |


या अंकात व्यक्त झालेली मते त्या लेखकांची वैयक्तिक मते असून त्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

# व्ही. पी. एम. दिशाच्या संदर्भात

- आपण दिशा नियमित वाचा. इतरांनाही वाचायला सांगा.
- हे व्यासपीठ **अभ्यासपूर्ण लेखांसाठी** आहे.
- शैक्षणिक संस्थेने असे मासिक चालवावे, याचे हे एकमेव उदाहरण आहे.
- आपण विचारप्रवृत्त लेख पाठवून दिशाला सहकार्य करू शकता.
- आपण स्वत: देणगीमूल्य द्या व इतरांना द्यायला सांगा.
- आपले देणगीमूल्य द्यायचे राहिले नाही ना, कृपया पडताळून पाहा.
- दिशाच्या संदर्भात देणगीमूल्य, लेख पाठवावयाचे असतील तर कार्यवाह, विद्या प्रसारक मंडळ, डॉ. बेडेकर विद्या मंदिर, नौपाडा, ठाणे - ४००६०२ या पत्त्यावर पाठवा. ०२२-२५४२६२७० या क्रमांकावर संपर्क साधा.
- आपण सार्वजनिक ग्रंथालयाचे संचालक असाल वा असे एखादे ग्रंथालय चालवत असाल, तर आपण सभासद होणे अत्यंत गरजेचे आहे. महाविद्यालये, शाळा यांच्या प्रमुखांनीही आपल्या संस्थेचे देणगीमूल्य पाठवावे.
- www.vpmthane.org या संकेतस्थळावर दिशाचे जुने अंक आपण पाहू शकता.
- वार्षिक देणगीमूल्याचा रु. ५००/- चा धनादेश 'विद्या प्रसारक मंडळ A/C दिशा' या नावाने पाठवावा.
- कृपया वर्गणीदार व्हावे.

- संपादक

# ‘स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे व तो मी मिळविणारच!’

*लोकमान्य टिळकांच्या ‘स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे व तो मी मिळविणारच!’ ह्या सिंहगर्जनेला ३० डिसेंबर २०१६ रोजी १०० वर्षे पूर्ण होऊ झाल्याच्या निमित्ताने – संपादक*

महाराष्ट्राने आपल्या भारत देशाला अनेक नररत्ने दिली आहेत. भारतमातेचा इतिहास अभ्यासताना पदोपदी असे जाणवते की, प्राचीन काळापासून मराठी मातीत जन्माला आलेल्या अनेक पुत्रांनी आपल्या मातृभूमीची यथार्थ सेवा केली आहे. अशा अनेक प्रसिद्ध नररत्नांपैकी १९ व्या व २० व्या शतकात आपल्या कार्याद्वारे भारतमातेचा मान, अस्मिता व स्वराज्य यासाठी मराठी बाण्याने लढणारे एक विद्वान व्यक्तिमत्त्व म्हणजे लोकमान्य बाळ गंगाधर टिळक हे होय. लोकमान्यांविषयी व त्यांच्या कर्तृत्वाविषयी माहिती नसेल अशी व्यक्ती विरळानेच सापडेल. लोकमान्य टिळकांच्या राष्ट्रभक्तीविषयी, विद्वत्तेविषयी, चारित्र्याविषयी व नैतिकतेविषयी कुणीच शंका घेऊ शकत नाही.

लोकमान्य टिळकांचा जन्म २३ जुलै १८५६ रोजी कोकणातील रत्नागिरी जिल्ह्यातील चिखली या गावी झाला. परंतु लोकमान्यांची कर्मभूमी म्हणजे ‘पुणे’ (पूर्वीचे ‘पूना’) होय. लोकमान्यांनी अगदी तरुण वयापासूनच स्वतःस समाजकार्य, शैक्षणिक कार्य, राष्ट्रहिताचे कार्य व पत्रकारिता यासाठी वाहून घेतले होते हे सर्वज्ञात आहे. लोकमान्यांच्या शिक्षण क्षेत्रातील कार्याविषयी बोलताना डेक्कन एज्युकेशन सोसायटी ह्या संस्थेचा उल्लेख आवर्जून करावासा वाटतो. संस्थेच्या स्थापनेत लोकमान्य टिळकांचा वाटा सिंहाचा होता व ह्या शिक्षण संस्थेने मोठ्या प्रमाणात शाळा व महाविद्यालयांची स्थापना केलेली आढळते.

पत्रकारिता म्हणजे समाजशिक्षण व राष्ट्रभक्तीचा प्रसार करण्याचे सर्वात महत्त्वाचे साधन होय हे जाणणारे द्रष्टे पत्रकार व संपादक म्हणजे लोकमान्य टिळक होत. त्यांनी ‘मराठा’ व ‘केसरी’ ही दोन वृत्तपत्रे सुरू केलेली आढळतात. यातील ‘मराठा’ हे इंग्रजीतून प्रसिद्ध होत असे, तर ‘केसरी’ हे मराठी भाषेतून प्रसिद्ध होई. सध्याचे पुण्याहून प्रसिद्ध होणारे ‘केसरी’ हे वृत्तपत्र १९ व्या शतकात लोकमान्यांनी सुरू केलेले ‘केसरी’ हे पत्र होय. खुद्द लोकमान्य टिळक १९ व्या व २० व्या शतकात ह्या पत्राचे संपादक असताना, ह्या वृत्तपत्राचा ब्रिटिशांवर जबरदस्त दरारा होता. ‘केसरी’चे लोकमान्य टिळक लिखित अग्रलेख वा संपादकीय लोक अक्षरशः वाचून कोळून पित असत. प्रसिद्ध विचारवंत फ्रँसीस बेकन यांचे पुस्तकांविषयीचे एक उद्‌गार वा वाक्य फार प्रसिद्ध आहे. बेकनचे हे इंग्रजीतील वाक्य पुढीलप्रमाणे आहे –

"Some books are to be tasted, others to be swallowed and some few are to be chewed and digested."

याचा मराठीमध्ये ढोबळमानाने अनुवाद पुढीलप्रमाणे होऊ शकतो– ‘काही पुस्तकांची चव (आस्वाद) घेतली पाहिजे, काही पुस्तके गिळली पाहिजेत, तर काही पुस्तके चघळून पचविली पाहिजेत.’ या वाक्यातील शेवटचा भाग टिळकलिखीत केसरीतील तत्कालीन अग्रलेखांना अगदी चपलखपणे बसतो. लोक अक्षरशः टिळकांच्या अग्रलेखाने पेटून उठत असत. टिळकांच्या अग्रलेखांचे मथळे वा शीर्षक ह्या विषयावर एखादा विद्यार्थी विद्यावाचस्पती (पीएच.डी.) सारख्या पदवीसाठीचे संशोधन करू शकेल असे म्हणणे वावगे

ठरणार नाही. याचे कारण अनेकदा अग्रलेखांचे व बातम्यांचे मथळे वाचून ब्रिटिश सरकार टिळकांबाबत बिथरत असे व त्यामुळे टिळकांना बऱ्याच वेळा ह्याच कारणामुळे अटक झालेली दिसते. अशाच एका शीर्षकांपैकी एक म्हणजे 'सरकारचे डोके ठिकाणावर आहे काय?' हे एक शीर्षक होय.

लोकमान्य टिळकांच्या जीवनकार्याचा अभ्यास केल्यास एक बाब आपणास प्रकर्षाने जाणवते. ही बाब म्हणजे त्यांनी विविध विषयांवर मांडलेली मते त्याकाळात अनेकांना व प्रामुख्याने त्यांच्या काँग्रेसमधील नेमस्त नेत्यांना रुचली नाहीत. याचे कारण म्हणजे त्या मतांचा खोलात जाऊन विचार झाला नाही असे म्हणणे वावगे ठरू नये. लोकमान्यांची तळमळ व विचार त्याकाळात लोकांना पूर्णतः कळले नाहीत व त्यामुळेच त्यांच्याविषयी अनेक लोकांमध्ये गैरसमज (misunderstanding) तर होतेच, मात्र टिळक अनेकांना कळू शकले नाहीत. त्यामुळे ते एका अर्थाने दुर्दैवी नेते ठरले असे म्हणणेही वावगे ठरू नये.

लोकमान्यांनी ब्रिटिशांच्या अन्यायकारी व जुलमी राजवटीविरुद्ध लोकांमध्ये प्रबोधन करण्यासाठी व त्यानंतर त्यांची एकजूट करण्यासाठी केलेले प्रयत्न अचंबित करणारे आहेत. लोकांना एकत्र कसे आणावे व त्यानंतर त्यांच्या मनाचा व हृदयाचा ताबा कसा घ्यावा हे लोकमान्यांमधील वक्त्याला चांगलेच ठाऊक होते. त्यांनी यासाठी सुरू केलेले 'शिवजयंती' व 'गणेशोत्सवा'सारखे सार्वजनिक उत्सव याची साक्ष देतात. शिवराय म्हणजे महाराष्ट्राचे आराध्यदैवत. १७ व्या शतकात अहमदशाही, आदिलशाही, कुतुबशाही व मुघलांसारख्या प्रबळ राजकीय सत्तांविरुद्ध यशस्वी लढा देऊन शिवाजी महाराजांनी महाराष्ट्रात स्वराज्याची स्थापना केली. शिवरायां नंतर इसवी सनाच्या १८ व्या शतकात स्वराज्याचे मोठ्या वटवृक्षाप्रमाणे 'हिंदू पातपदशाहीत' रूपांतर करण्याचे काम पेशव्यांनी केले. अशा ह्या शिवरायांपेक्षा, तरुणांना प्रेरणा देणारे दुसरे कुठले व्यक्तिमत्त्व असेल? लोकमान्य टिळकांनी हे ओळखले व जणू शिवरायांसारखे देशभक्तीने पेटून उठा व एकत्र येऊन ब्रिटिशांना व त्यांच्या जुलमी राजवटीला मूठमाती द्या अशा प्रकारचा संदेश त्यांना जनतेला व प्रामुख्याने तरुणांना द्यावयाचा होता.

महाराष्ट्र भूमीतील जनता पूर्वापारपासून वृत्तीने धार्मिक आहे. आपल्या महाराष्ट्रात हिंदूंची अनेक पवित्र तीर्थस्थळे, मंदिरे, शक्तीपीठे, ज्योतिर्लिंगे व नद्या आहेत. नाशिकसारख्या ठिकाणी तर फार पूर्वीपासून नित्यनेमाने कुंभमेळा भरत असतो. महाराष्ट्रात अनेक हिंदू उत्सव व सण फार पूर्वीपासून आनंदाने व उत्साहाने साजरे केले जातात. गणपती ही देवता तर महाराष्ट्रात खूप लोकप्रिय आहे. प्रामुख्याने कोकणातील मराठी माणसाचा गणेश चतुर्थी (गणेशोत्सव) हा उत्सव म्हणजे जीव की प्राण. गणेशोत्सव सार्वजनिक स्तरावर मोठ्या प्रमाणात साजरा करण्यासाठीचे श्रेय लोकमान्य टिळकांना जाते. हे दोन सार्वजनिक उत्सव जनसामान्यांमध्ये मोठ्या प्रमाणात लोकप्रिय करण्यामागची टिळकांची भूमिका म्हणजे लोकांमधील व तरुणांमधील ऊर्जेला एकत्र करून तिचा वापर देशासाठी करणे हा होता. मात्र, दुर्दैवाने सद्यस्थितीत ज्याप्रकारे हे सण साजरे केले जात आहेत ते पाहून खुद्द लोकमान्यांना खेद झाल्याशिवाय राहिला नसता. टिळकांचे देशप्रेम ह्या विषयावर लिहावयाचे ठरल्यावर एक विशेष ग्रंथच निर्माण करावे लागेल. ज्याप्रमाणे टिळकांनी सार्वजनिक उत्सवांच्या माध्यमातून समाज व जनतेला एकत्र आणण्याचे व त्यांना देशप्रेमाचे कडू पाजण्याचे प्रयत्न केले, त्याचप्रमाणे त्यांनी अखिल भारतीय काँग्रेसच्या माध्यमातून देखील ब्रिटिश शासनाविरुद्ध रान उठविण्याचे (पेटविण्याचे) अथक प्रयत्न केले. अखिल भारतीय काँग्रेसची स्थापना इसवी सन १८८५ मध्ये पहिले अधिवेशन मुंबईत भरवून झाली. ह्या अधिवेशनाला भारताच्या विविध भागांतून आलेले जवळ-जवळ बहात्तर प्रतिनिधी उपस्थित होते. काँग्रेसच्या ह्या पहिल्या

अधिवेशनाचे अध्यक्षस्थान व्योमेशचंद्र बॅनर्जी ह्या नेत्याने भूषविले. काँग्रेसचे हे पहिले अधिवेशन पुण्यास भरणार होते. मात्र आयत्यावेळी पुणे हे ठिकाण बदलून हे अधिवेशन मुंबईला भरविण्यात आले. इतिहासकारांच्या मते लोकमान्य टिळकांनी १८८९ साली अधिकृतरित्या काँग्रेसमध्ये प्रवेश घेतला. काँग्रेसविषयी येथे एवढे विवेचन करण्याचे कारण म्हणजे, ही भारतातील १९ व्या शतकातील खऱ्या अर्थाने पहिली अखिल भारतीय स्वरूपाची राजकीय संघटना होय. काँग्रेसची स्थापना होण्यापूर्वी बंगाल, मद्रास व मुंबई इलाख्यांमध्ये काही प्रांतीय पातळीवरच्या राजकीय संस्था होत्या. ह्या संस्थांपैकी काही संस्था म्हणजे- 'इंडियन असोसिएशन', 'बाँबे प्रेसिडेन्सी असोसिएशन', 'पुणे सार्वजनिक सभा', 'मद्रास महाजन सभा' ह्या होत. ह्या सर्व संस्थांचे कार्य त्या त्या प्रांतांपुरतेच मर्यादित होते. वर नमूद केलेल्या प्रांतांतील नेत्यांनी एकत्र येऊन अखिल भारतीय स्वरूपाची एक राजकीय संघटना स्थापन करण्याचे ठरविले व त्याची फलश्रूती म्हणजे अखिल भारतीय काँग्रेस होय असे म्हणणे वावगे ठरणार नाही. त्याचप्रमाणे वर नमूद केलेल्या प्रांतीय राजकीय स्वरूपाच्या संस्थांनी देखील काँग्रेसच्या स्थापनेसाठी हातभार लावल्याचे जाणवते. टिळकांच्या व्यक्तिमत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे त्यांचा स्वतंत्रबाणा व त्यांचे निर्भिड, कल्पक व अभिजात विचार हे होय. याचा प्रत्यय त्यांनी दिलेला स्वदेशीचा नारा होय. काँग्रेसच्या महत्त्वाच्या नेत्यांपैकी भारतीयांनी स्वदेशी वस्तुंचा वापर केला पाहिजे असे मत मांडणारे लोकमान्य टिळक म्हणजे पहिले नेते होत असे म्हणणे वावगे ठरणार नाही. त्यांच्या बुद्धिवान मनाने हेरले की, ब्रिटिशांची खरी ताकद म्हणजे त्यांचा आर्थिक नफा हा होय. ब्रिटिश भारतात परकीय वस्तू वा माल विकून कोट्यवधी रुपये ब्रिटनच्या खजिन्यात नेत आहेत हे टिळकांनी लागलीच ओळखले. त्यामुळेच त्यांनी भारतीयांमध्ये स्वदेशीचा म्हणजेच भारतीयांनी आपल्याच भारत देशात बनलेल्या वस्तू विकत घ्याव्यात ह्या विचाराचा प्रसार झाला पाहिजे हे मत मांडले. आपण नंतरच्या घटनांचा व प्रामुख्याने गांधीजींच्या चळवळींचा विचार केला असता असे निदर्शनास येते की, त्यांनी देखील जनमानसामध्ये स्वदेशीचा प्रसार केला होता. गांधीजींनी असहकार चळवळ सुरू केल्यावर तर परदेशी व मुख्यतः ब्रिटिश मालाची होळी करण्याचा कानमंत्र भारतीयांना दिला. गांधीजींच्या या आवाहनास भारतीय जनतेने देखील उत्स्फूर्त प्रतिसाद दिलेला आढळतो. देशात अनेक ठिकाणी परकीय वस्तूंची होळी झाल्याची वा केल्याची इतिहासात नोंद आहे. महात्मा गांधींनी स्वतः चरख्यावर सूत काढून भारतीयांना स्वतःचे कापड स्वतः बनवा व परकीय कापडापासून दूर राहा हे सांगितले. महात्मा गांधींचे चरख्यावर सूत काढतानाची छायाचित्रे तर अगदी लहान मुलांपासून ते मोठ्यांपर्यंत आपण सर्वचजण पाहात आलो आहोत.

टिळकांची चरित्रे अनेकांनी लिहिलेली आहेत. यात सोराब घासवाला, नरहर रघुनाथ फाटक, न. चिं. केळकर या विद्वानांनी लिहिलेली टिळकांची चरित्रे विशेष उल्लेखनीय आहेत. महाराष्ट्रातील सध्याचे प्रसिद्ध विचारवंत व संतशिरोमणी तुकाराम महाराजांचे चौदावे वंशज डॉ. सदानंद मोरे यांनी अलीकडच्या काळात लिहिलेले लोकमान्यांचे चरित्रदेखील अतिशय सुंदर आहे. डॉ. सदानंद मोरे हे मराठीचे व इतिहासाचे संशोधक व गाढे अभ्यासक म्हणून सुप्रसिद्ध आहेत. त्यांनी 'गर्जा महाराष्ट्र' ह्या पुस्तकाच्या रूपाने देखील महाराष्ट्राच्या जनतेला अमूल्य असा बौद्धिक ठेवा व भेट दिली आहे. डॉ. सदानंद मोरे, विद्या प्रसारक मंडळ संचलित जोशी-बेडेकर महाविद्यालयास सतत भेटी देत असतात व विद्यार्थी तसेच शिक्षकांसाठी व्याख्याने देत असतात याचा आम्हास सार्थ अभिमान आहे. २०१० साली महाराष्ट्र राज्याच्या स्थापनेला ५० वर्षे पूर्ण झाली. त्यामुळे ते वर्ष महाराष्ट्र राज्य सुवर्णमहोत्सवी वर्ष म्हणून साजरे केले गेले. त्यानिमित्ताने पुण्याच्या श्री गंधर्व-वेद प्रकाशन या संस्थेने

देशातील व महाराष्ट्रातील महान पुरुषांची वा राष्ट्र पुरुषांची चरित्रमाला प्रकाशित केली होती. त्यापैकी एक पुष्प म्हणजे लोकमान्य टिळकांचे डॉ. सदानंद मोरे लिखीत चरित्र होय. वाचकांना आवर्जून अशी विनंती करावीशी वाटते की, त्यांनी हे चरित्र जरूर वाचावे.

टिळकांचे अधिकृत चरित्रकार डी. व्ही. ताम्हणकर यांनी त्यांची तुलना अमेरिकेचे पहिले राष्ट्राध्यक्ष जॉर्ज वॉशिंग्टन यांच्याशी केली आहे. त्यामुळे ह्या दोहोंमधील तुलना करून त्यांच्या व्यक्तिमत्त्वातील साम्यस्थळांविषयी लिहिण्याचा मोह आवरत नाही. जॉर्ज वॉशिंग्टन हे मूलतः सैनिक होते. त्यांनी अमेरिकेच्या क्रांती दरम्यान वा अमेरिकेच्या स्वातंत्र्ययुद्धा दरम्यान ब्रिटिशांविरुद्ध अमेरिकन सैन्याचे नेतृत्व केले. ते सैनिक असल्यामुळे त्यांनी आपल्या तब्येतीकडे व शरीराकडे लक्ष दिलेले असणार यात वाद नाही. अगदी त्याचप्रमाणे व्यक्तीचे शरीर अगदी सदृढ व तंदुरुस्त असले पाहिजे अशी लोकमान्य टिळकांची ठाम धारणा होती. त्यामुळेच त्यांनी शिक्षण घेत असताना आपल्या कारकिर्दीतील अतिशय महत्त्वाचे असे एक वर्ष फक्त शरीर कमावण्यासाठी दिले होते. ह्या एक वर्षात त्यांनी आपले खाणे–पिणे व व्यायाम करणे यावर विशेष लक्ष दिले व उत्तम शरीरयष्टी बनविली. हे सगळे करत असताना त्यांचे अभ्यासाकडे जरा दुर्लक्ष झाले व ते एक वर्ष अनुत्तीर्ण झाले. मात्र, त्यांनी आपले शैक्षणिक नुकसान नंतर भरून देखील काढले. जॉर्ज वॉशिंग्टन यांचा लोकशाही मुल्यांवर पूर्ण विश्वास होता. टिळकांचा देखील लोकशाहीच्या तत्त्वांमध्ये विश्वास होता. त्यामुळेच त्यांना महात्मा गांधीजींनी 'Born Democrat' (मराठीत 'जन्मतःच लोकशाहीची मूल्ये नसानसात भिनलेला व ती जपणारा' असे म्हणता येईल.) असे संबोधले आहे. महात्मा गांधीजींनी टिळकांचा उल्लेख, 'आधुनिक भारताचे निर्माते' असा केलेला आढळतो. जॉर्ज वॉशिंग्टन हे लढाऊ बाण्याचे होते व त्यांनी अमेरिकेच्या जनतेला कुशल नेतृत्व दिले. टिळकांचा देखील मूळ स्वभाव व बाणा पाहिला तर तो आक्रमक, लढवय्या व स्वाभिमानी होता. तसेच जॉर्ज वॉशिंग्टन व लोकमान्य टिळक ह्या दोहोंनी आपापल्या काळात स्वतःच्या राष्ट्र उभारणीत महत्त्वाची भूमिका बजावलेली दिसते.

सर व्हॅलेनटाईन चिरोल या इंग्रज व्यक्तीने आपल्या पुस्तकात लोकमान्यांचा उल्लेख 'भारतीय असंतोषाचे जनक' असा केला आहे. ह्या पुस्तकात माननीय लेखक महाशयांनी टिळकांच्या कार्याचे कौतुक कमी करून टीका करण्यातच जास्त धन्यता मानलेली दिसते.

लोकमान्य टिळक हे स्वातंत्र्य लढ्याच्या दरम्यानचे एकमेव नेते असतील की ज्यांच्यावर ब्रिटिश सरकारने तब्बल तीन वेळा देशद्रोहाचा खटला भरलेला होता. टिळक, ब्रिटिशांनी केलेल्या अटकांमुळे व तुरुंगवासाने खचून गेले नाहीत. उलट त्यांनी ब्रिटिशांच्या नाकावर टिच्चून आपले राष्ट्रकार्य तर सुरूच ठेवले; त्याचसोबत ब्रिटिशांना ठासून सांगितले की, ब्रिटिशांमुळे आता 'देशद्रोह' ह्या शब्दाची व्याख्या बदलण्याची गरज आहे वा आवश्यकता येऊन ठेपली आहे.

मराठी भाषेतील सुप्रसिद्ध कवी अशोक नायगावकर यांनी आपल्या 'वाटेवरच्या कविता' ह्या काव्यसंग्रहात टिळकांवर एक कविता लिहिली आहे. ही कविता आजच्या पिढीने वाचण्यासारखी आहे. ह्या कवितेतून नायगावकरांनी टिळकांना त्याकाळात तरुणांकडून अपेक्षीत असलेली देशभक्ती व आजच्या तरुणांचे भौतिकवादी विचार व उद्दीष्ट त्याचप्रमाणे परदेशात जाण्याची घाई ह्या विरोधाभासावर छान उपहासात्मक भाष्य केले आहे. अर्थात, अतिशय प्रखर बुद्धिमत्ता असलेल्या व उच्चकोटीचा बुध्यांक असलेल्या व्यक्तींना आपली सर्जनशिलता वा सृजनशिलता सिद्ध करण्यासाठी अमेरिकेसारख्या देशांमध्ये मोठ्या प्रमाणात संधी आहेत यात वादच नाही. मात्र, अशा बुद्धिवान व्यक्तींनी

युद्धाची खरी भयानकता त्यात माणसे मरतात ही नसून; माणूस माणसाला मारायला तयार होतो ही आहे.

भारतातील नोकरशाहीने निर्माण केलेल्या तथाकथित अडथळ्यांवर मात करून काही तरी नवीन करून दाखविणे व देशहितासाठी व देशाच्या प्रगतीसाठी योगदान करणे अपेक्षीत आहे व ते हे करू शकतात. आजच्या तरुणांनी असे करणे म्हणजे टिळकांना खऱ्या अर्थाने आदरांजली ठरेल. भारताचे सध्याचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना देखील हेच अपेक्षीत आहे. त्यामुळेच भारत सरकार सर्वच क्षेत्रातील जमेल तेवढी बंधने व जाचक कायदे रद्द करताना व नवीन कायदे पारित करताना दिसते. तसेच भारत सरकारने 'डिजिटल इंडिया', 'स्टार्ट-अप्स्', 'स्किल इंडिया' इत्यादी नावीन्यपूर्ण व नवतरुणांच्या जिव्हाळ्याचे प्रकल्प राबविण्यास सुरुवात केली आहे. येथे हे नमूद करण्यास आनंद होतो की, विद्या प्रसारक मंडळ, ठाणे ही शैक्षणिक संस्था व तिचे कार्याध्यक्ष डॉ. विजय बेडेकर हे अशा नावीन्यपूर्ण व विद्यार्थी उपयोगी प्रकल्पांचे नेहमीच स्वागत करत असतात. डॉ. विजय बेडेकरांनी हे सर्व प्रकल्प विद्या प्रसारक मंडळाच्या महाविद्यालयांमध्ये राबविण्यासाठी अनेक पावले उचलली आहेत.

टिळकांनी आपल्या भाषणांतून 'स्वराज्या' विषयी जनतेमध्ये जागरुकता निर्माण करण्याचा सपाटा लावला होता. त्यांनी भाषणांमध्ये 'स्वराज्य' हा शब्द उच्चारलेला ब्रिटिशांना खटकत असे. त्यामुळे ब्रिटिश शासनाने द्वेषबुद्धीने २३ जुलै १९१६ रोजी टिळकांवर भाषण बंदीकरिता त्यांनी जामीन का घेऊ नये अशा आशयाची नोटीस बजावली होती. २३ जुलै हा टिळकांचा वाढदिवस व त्या दिवशी टिळकांचा जनतेतर्फे सत्कार व वाढदिवस तसेच भाषणाचा कार्यक्रम ठरलेला होता. तरीदेखील सामान्य शिष्टाचार व सद्सद्विवेक बाजूला सारून ब्रिटिशांनी ही कारवाई केली होती. टिळकांनी यावेळी त्यांच्या शैलीत 'हा सरकारी आहेर आहे' असे उद्गार काढले होते. नंतर याच विषयावरून टिळकांवर राजद्रोहाचा खटला भरला गेला.

टिळकांचे स्वभाव वैशिष्ट्य म्हणजे ते आपल्या तथाकथित विरोधकांविषयी देखील आपल्या मनात किल्मीष वा द्वेष बाळगत नसत. टिळकांप्रमाणेच नामदार गोपाळकृष्ण गोखले हे देखील पुण्याचेच. ह्या दोन्ही नेत्यांचे समर्थक पुण्यात मोठ्या प्रमाणात होते. टिळक व गोखले यांच्यात वैचारिकदृष्ट्या अनेक वाद व भेद होते. गोखले हे काँग्रेसमधील नेमस्त (मवाळ) नेते म्हणून प्रसिद्ध तर टिळक जहाल गटाचे नेते. टिळक तर एकदा मवाळांवर टीका करताना म्हणाले होते की, वर्षातून एकदा बेडकासारखे आवाज काढल्यामुळे त्याचा ब्रिटिशांवर काहीच परिणाम होणार नाही. ह्यातून टिळकांना मवाळांना हे सांगायचे होते की, वर्षातून एकदा काँग्रेसचे अधिवेशन घेऊन व अनेक प्रस्ताव मंजूर करून घेतल्याने ब्रिटिश सरकार घाबरणार नाही, की ते आपल्याला स्वातंत्र्य देणार नाहीत. असे वैचारिक भेद असतानादेखील टिळकांनी गोखल्यांच्या निधनाचे वृत्त ऐकल्यानंतर ते लागलीच सिंहगडच्या आपल्या बंगलीहून पुण्यात आले व स्मशानभूमीत उपस्थित राहून भाषण केले. टिळक एवढे लोकप्रिय होते की, ते भाषण करायला उभे राहिले असता लोक अगोदरच टाळ्या वाजवून त्यांचे स्वागत करत असत व दाद देत असत. गोखल्यांच्या निधनाच्यावेळी शोकसभेत टिळक भाषण करण्यास उभे राहिले असता लोकांनी अशाच टाळ्या वाजविल्या. टिळकांना हे अजिबात रुचले नाही व त्यांनी जमावाला जाणीव करून दिली की, नामदार गोपाळकृष्ण गोखल्यांसारखे देशाचे महान नेते निवर्तले आहेत ह्याचेतरी भान त्यांनी ठेवले पाहिजे. यातून टिळकांनी वैचारिक वाद बाजूला ठेवून गोखलेंच्या राष्ट्रीय कार्याची एकप्रकारे वाखाणणीच केल्याचे व त्यांच्या राष्ट्रकार्यास आदरांजली वाहिल्याचे जाणवते.

टिळकांच्या व्यक्तिमत्त्वाचा एक महत्त्वाचा पैलू म्हणजे त्यांची प्रखर बुद्धीमत्ता हा होय. टिळक लहान वयापासून व प्रामुख्याने विद्यार्थी दशेत अतिशय बुद्धिमान विद्यार्थी म्हणून प्रसिद्ध होते. टिळकांना गणित ह्या विषयात

तर फार गती होती. वर्गात शिक्षकांनी पूर्ण गणित सांगण्याअगोदरच टिळक उत्तरे देत असत. त्यामुळे टिळकांचे शिक्षक त्यांना सांगत की, अगोदर त्यांनी गणिते वहीत लिहून घ्यावीत व त्यानंतरच ती सोडवून उत्तरे द्यावीत. अशाप्रकारे टिळकांकडे गणितातील अवघड प्रश्न पूर्ण होण्या अगोदर त्याचे उत्तर तयार असे. ह्यावरून ते शिक्षकांचा प्रश्न कुठल्या प्रकारचा असू शकतो वा विचारल्या जाणारा प्रश्नाचा रोख लागलीच समजून घेऊन उत्तर देत असत हे लक्षात येते. टिळकांच्या व्यक्तिमत्त्वाच्या घडामोडीत दोन व्यक्तींचे योगदान फार महत्त्वाचे होते व त्या म्हणजे रामचंद्रपंत व गंगाधरपंत ह्या होत. ह्यापैकी रामचंद्रपंत हे टिळकांचे आजोबा तर गंगाधरपंत वडील होत. टिळकांचा जन्म महाराष्ट्रातील कोकण किनारपट्टीतील रत्नागिरी जिल्ह्यात झाला होता. टिळक लहान असताना, त्यांचे आजोबा रामचंद्रपंत हे त्यांना राष्ट्रभक्ती विषयीच्या गोष्टी सांगत असत. अनेकदा ह्या आजोबा-नातूंची जोडी कोकणच्या मनोरम्य किनारपट्टी नजीकच्या आंब्याच्या झाडाखाली बसत असे. ह्याच ठिकाणी टिळकांच्या बालवयात रामचंद्रपंत त्यांना १८५७ च्या स्वातंत्र्य समराविषयीच्या गोष्टी देखील सांगत असत. रामचंद्रपंतांनी स्वतः १८५७ च्या उठावा दरम्यान भारतीयांची शौर्यपूर्ण कृत्ये पाहिली होती. ह्या विवेचनावरून असे लक्षात येते की, नंतरच्या काळातील टिळकांच्या व्यक्तिमत्त्वातील निर्भिडपणा, स्पष्टोक्ती व निस्सीम राष्ट्रभक्ती ह्याचे मूळ कुठेतरी त्यांच्या बालमनावर आजोबांनी केलेल्या संस्कारात आहे. टिळकांचे वडील गंगाधरपंत हे टिळकांना लहानपणी गणित शिकवत असत.

टिळकांचा अजून एक गुणविशेष म्हणजे ते सिद्धहस्त लेखक होते. त्यांनी संपादक व पत्रकार म्हणून इंग्रजी व मराठी भाषांमध्ये विपुल प्रमाणात लेखन केले यात वादच नाही. त्यासोबतच टिळकांनी संशोधन करून विद्वत्तापूर्ण ग्रंथ निर्माण केलेले आढळते. टिळककृत अशा ग्रंथांमध्ये ओरियन (Orion), द आर्टिक होम इन द वेदाज् (The Arctic Home in the Vedas) व गीता रहस्य (Gita Rahasya) ह्या ग्रंथांचा उल्लेख आवर्जून करावा लागेल. 'ओरियन' व 'द आर्टिक होम इन द वेदाज्' ह्या पुस्तकांद्वारे टिळकांनी 'वेदांचा' काळ इसवी सन पूर्व ५००० हा असल्याचे, तसेच 'आर्य' मुळातून उत्तर ध्रुवीय प्रदेशातून आल्याचे सिद्ध करण्याचा प्रयत्न केला. तसेच एकेकाळी उत्तर ध्रुवीय प्रदेश मनुष्यास राहण्यासाठी योग्य होता, वस्ती करण्याजोगा होता हे सांगण्याचा प्रयत्न केला. 'भगवद्‌गीता' हा ग्रंथ हिंदू बांधवांना अतिशय प्रिय व पूज्यनीय आहे. हिंदूंच्या रोजनिशीतल्या जीवनात भगवद्‌गीतेला अनन्य साधारण महत्त्व आहे.

भगवद्‌गीतेत विशद केलेल्या कर्मयोगावर टिळकांनी आपल्या 'गीतारहस्य' ह्या ग्रंथांत अतिशय सोप्या मराठी भाषेत भाष्य केले आहे. टिळकांनी हा ग्रंथ मराठी भाषेतून लिहून सामान्य मराठी वाचकांना ज्ञानाचे दालन उघडून देण्याचे मोठे कार्य केले आहे. टिळकांचा हा ग्रंथ इसवी सन १९१५ मध्ये प्रसिद्ध झाला होता. टिळकांनी बी.ए. पर्यंत शिक्षण तर घेतलेच परंतु त्यांनी एल.एल.बी. ही विधी शास्त्रातील पदवी देखील घेतली. टिळकांची अभ्यासू वृत्ती, संशोधन करण्याचा दांडगा व्यासंग, सतत वाचन व लिखाण करण्याची धडाडी हे गुण आजच्या तरुणांनी अंगीकारणे अतिशय महत्त्वाचे आहे. ह्यातूनच आजचा तरुण स्वतःच्या व्यक्तिमत्त्वाचा तर विकास करीलच, मात्र त्याचसोबत देशोन्नतीस देखील हातभार लावील यात वाद नाही.

टिळक १९१४ साली तुरुंगवासातून (मंडालेच्या तुरुंगातून) सुटका झाल्यानंतर गप्प बसले नाहीत तर उलट त्यांनी पूर्वीच्याच जोमाने राष्ट्रीय चळवळीचे काम करण्यास सुरुवात केली. त्यांनी डिसेंबर १९१५ मध्ये होमरूल लीग (स्वराज्य संघ) स्थापनेचा ठराव केला व १९१६ मध्ये ह्या संघाची स्थापना केली.

---

जेष्ठत्व केवळ वयामुळे नाही तर गुणांमुळे येते.

१९१६ साली लखनौ येथे भरलेल्या काँग्रेसच्या अधिवेशनाला लोकमान्य टिळक उपस्थित राहिले होते. हे अधिवेशन म्हणजे एका प्रकारे टिळकांचे काँग्रेसमध्ये पुनरागमन होते. ह्याच अधिवेशनामध्ये काँग्रेस व मुस्लीम लीग दरम्यान इतिहासप्रसिद्ध 'लखनौ करार' झाला. ह्या करारानुसार मुस्लीम लीग काँग्रेसप्रणीत राष्ट्रीय चळवळीला पाठिंबा देईल व काँग्रेसने खिलाफत चळवळीला पाठिंबा द्यावा असे ठरले. मात्र, ह्या अधिवेशनाचे सर्वात महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे ह्या अधिवेशनात टिळकांनी आपली 'Home rule is my birth right and I shall have it' – म्हणजेच 'स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे व तो मी मिळविणारच' ही सिंहगर्जना केली. टिळकांच्या ह्या जगप्रसिद्ध विधानाला वा वाक्याला डिसेंबर २०१६ मध्ये शंभर वर्षे पूर्ण होणार आहेत. ह्याचे औचित्य साधून महाराष्ट्राच्या राज्यसरकारने २३ जुलै ह्या लोकमान्यांच्या जन्मदिवशी काही कार्यक्रमांचे आयोजन केले होते. ह्या कार्यक्रमांना महाराष्ट्राचे माननीय राज्यपाल सी. विद्यासागर राव हे देखील उपस्थित होते.

टिळकांच्या व्यक्तिमत्त्वाचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे त्यांचे चारित्र्य व नैतिकता हे होय. त्यांच्या नैतिकते विषयीचा एक किस्सा सांगून लेखणी आवरती घ्यावीसी वाटते. महाराष्ट्रातील प्रसिद्ध विचारवंत व लेखक श्री. म. माटे व २० व्या शतकातील भारतातील एक प्रतिभावान, विद्वान व उत्तुंग व्यक्तिमत्त्व डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे स्नेही होते. एकदा आंबेडकर मुंबईस्थित सिद्धार्थ महाविद्यालयात आले असता त्यांनी पाहिले की, माटे सरांचं व्याख्यान चालू आहे. तेव्हा आंबेडकरांनी निरोप ठेवला की, ते ग्रंथालयात जाऊन वाचत बसणार आहेत व माटेसरांचे व्याख्यान संपल्यानंतर त्यांच्याबरोबर गप्पा मारणार आहेत. आंबेडकरांच्या सुचनेप्रमाणे माटे गुरुजींच्या व्याख्यानानंतर त्यांच्या आंबेडकरांसोबत गप्पा सुरू झाल्या. तेव्हा गप्पांच्या ओघात राष्ट्रीय नेत्यांच्या नैतिकतेविषयी चर्चा निघाली असता डॉ. आंबेडकर म्हणाले होते की, ''ह्या देशात नैतिकतेच्या दृष्टीने दोघा नेत्यांचेच नाव घ्यावे लागेल'' व हे दोन नेते म्हणजे खुद्द डॉ. बाबासाहेब आंबेडकर व दुसरे नेते म्हणजे लोकमान्य टिळक होत. हा संवाद डॉ. भीमराव कुलकर्णी लिखित 'खेकडे आणि खेकटी' या पुस्तकातील 'माटे मास्तर कॅन्सरने गेले!' ह्या प्रकरणात दिलेला आहे. वाचकांनी हे पुस्तक जरूर वाचावे. अशा तऱ्हेने एक बाब अधोरेखीत होते की, तुम्ही टिळकांच्या विचारांशी असहमत असू शकता; मात्र त्यांच्या चारित्र्याविषयी व नैतिकतेविषयी शंकाच घेऊ शकत नाही. एका महापुरुषाने दुसऱ्या महापुरुषाचा केलेला हा यथायोग्य सन्मान होता यात वादच नाही. टिळकांच्या 'स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे व तो मी मिळविणारच' ह्या सिंहगर्जनेला डिसेंबर २०१६ मध्ये शंभर वर्ष पूर्ण होऊ घातल्याचे औचित्य साधून; चला आपण एक पण करू या की, 'आपल्याला टिळकांसारख्या महापुरुषांच्या पुण्याईमुळे स्वराज्य मिळाले आहे त्याचे रुपांतर आपण सुराज्यात करू व समाज व देश सर्व बाबतीत समृद्ध होईल यासाठी सतत प्रयत्नशील राहू.'

**संदर्भ :**

लोकमान्य : नरहर रघुनाथ फाटक

लोकमान्य टिळक यांचे चरित्र : न. चिं. केळकर

लोकमान्य बाळ गंगाधर टिळक : सदानंद मोरे

लोकमान्य टिळक सिम्बॉल ऑफ स्वराज (इंग्रजी): सोराब घासवाला

वाटेवरच्या कविता : अशोक नायगावकर

खेकडे व खेकटी : डॉ. भीमराव कुलकर्णी

**– सहा. प्राध्यापक सुभाष गं. शिंदे**
उपप्राचार्य व इतिहासविभाग प्रमुख
जोशी-बेडेकर महाविद्यालय, ठाणे.
भ्रमणध्वनी : ९८२०३२८२२६
Email :subhashinscotland@gmail.com

●●●

# ओळख वनस्पतींची
## कुंभी

*'ओळख वनस्पतींची' या लेखमालेतील तेरावा भाग. 'कुंभी' या वनस्पतीची वैशिष्ट्ये, त्याचे उपयोग, त्याची देखभाल या बाबींवर या लेखात प्रकाश टाकला आहे - संपादक*

उशीराने हजेरी लावूनही पावसाने आपला कोटा पूर्ण केला आहे. त्यामुळे सर्व जलाशये मस्त भरली आहेत. अपवाद मराठवाडा व विदर्भातील काही भागांचा. पण या लहरी पावसाला कोण सांगेल. निसर्गाचे अनाकलनीय कोडे अजून तरी पूर्णपणे सुटलेले नाही. जिथे जिथे हिरवाई पसरली आहे ती तरी डोळ्यात साठवून ठेवण्यासाठी अनेकांची आता पावलं बाहेर पडतील. या हिरवाईमध्ये लपलेलं पण आपल्या गोलाकार घुमटाच्या तसेच मोठ्या हिरव्या चमकदार पानांच्या मुळे चटकन नजरेस भरणारं एक झाड तुम्हाला जंगलात, माळरानावर जलप्रवाहाच्या काठावर दिसेल. जरा जवळ जाऊन नीट बघा. मध्यम उंचीच्या खोडाला चहूबाजूंनी फुटलेल्या फांद्या अन् त्यावर दाटीवाटीने आलेल्या मोठ्या पानांचा पर्णसंभार छान घुमटाकार रूप धारण केलेलं हे झाड आहे कुंभीचे. यांचे शास्त्रीय नाव आहे Careya arborea.



हे एक मध्यम उंचीचे झाड असून उंची २० मीटरपर्यंत वाढते. पानाचा आकार लंबगोलाकार असून टोकाकडे फुगीर असून देठाकडे निमुळते होत जाते. या पानांना देठ असा नसतोच. पान फांदीपासूनच सुरू होते. पानांच्या कडा किंचित दंतूर. पाने फांदीच्या शेंड्यावर व सर्व बाजूंनी पण एकांतरीत, गर्द हिरवी व चिवट आकार १५ ते २० सेंमी. लांब व ८ ते १० सें.मी. रुंद. शिशिरात लाल होऊन नंतर गळणारी.

या झाडाची खरी ओळख पटते ती साधारण मार्च-एप्रिलमध्ये. जेव्हा या झाडाला पिवळ्या, पांढऱ्या रंगाची व ८ सें.मी. व्यासाची फुले झुबक्यांनी येतात तेव्हा. चार पाकळ्या असलेली ही फुले सुंदर असली तरी सुवासिक मात्र नाहीत. काहीसा दुर्गंधच पसरविणारी अशी आहेत. अर्थात निसर्गाच्या ठायी सुगंध-दुर्गंध या संकल्पना नसतातच. या मानवी संकल्पना आहेत. निसर्गाला फक्त गंध हीच संकल्पना मान्य आहे. वेगवेगळ्या किटकांना आपल्याकडे आकर्षित करून त्यांच्याद्वारे परागकिरणाचे काम करून घेण्याच्या दृष्टीने फुलांनी केलेली ही योजना असते. त्या बदल्यात किटकांना मधूरसाची बक्षिसी दिली जाते.

या फुलांची रचना वैशिष्ट्यपूर्ण असते. चार पाकळ्या निमूळत्या होत मागे वळलेल्या. काहीशा हिरवट पिवळट. त्यामधून निघालेले शेकडो पुंकेसर, बुडाशी सुंदर गुलाबी रंग शेंड्याकडे पांढरा पिवळा होत जातो. पाकळ्यांपेक्षा पुंकेसराच्या या तुऱ्यांचाच तोरा मोठा असतो. या पुंकेसराच्या मधोमध हिरव्या रंगाची टोपी परिधान केलेला स्त्रीकेसर हा स्त्रीकेसर. फूल गळून गेले तरी कायम असणारा व हळूहळू मोठ्या होत जाणाऱ्या फळाची शेवटपर्यंत साथ देणारा.

या वृक्षाची फळे ७ ते ८ सें.मी. व्यासाची, हिरव्या

(पृष्ठ क्र. १३ वर)

आपले विचार वाळूत लिहा, क्षमेचे वारे त्यांना उडवून लावेल.
आपले सुख दगडात कोरा, ते कोणीही खोडू शकणार नाही.

# नर्मदा परिक्रमा

भाग : ३४

*नर्मदा परिक्रमेतील हा पुढचा टप्पा. लेखकाचे चौफेर निरीक्षण, भेटलेली माणसे या नोंदी वाचण्यासारख्या आहेत - संपादक*

**सोमवार १८ फेब्रुवारी २०१३ दिवस ८५ वा. ग्वारीघाट –बरेला–शारदा मु. जगदीश्वर मंदिराश्रम.**

सकाळी नळाला पाणी नव्हते. बाटलीतही पाणी नव्हते. समोर जाऊन बाटलीभर पाणी मागितले तर मिळाले नाही. पुढे जाऊन, 'नर्मदाजल एका पाइपातून वाहते ते घ्या' असा सल्ला मिळाला. पुढे जाऊन अंधारात गल्लीत शोधून परतलो. बाजूला मुले उभी होती. त्यांना विचारले तर म्हणाले, दुसऱ्या गल्लीपुढे सतत वाहते पाणी आहे. मी म्हटले, 'शोधून मला सापडले नाही, मी इथला नाही, एक बाटली पाणी मला इथे मिळू शकत नाही का?'

दोन बाटल्यांपैकी एक बाटली कुणीतरी मला भरून दिली. २४ तास पाणी वाहते ऐकल्यावर मी तिथे जाऊन स्नान करून आलो. पाठोपाठ बन्सी उठला, त्याने बोअरिंग पाण्याचा स्विच शोधून पाणी चालू केले होते. मला वाटले होते की रात्री कुणा हातून नळ थोडा उघडा राहून टाकी रिकामी झाली असावी आणि साडेसहा वाजेपर्यंत सरकारी नळ येईपर्यंत पाणी मिळणार नाही. बोअरिंग असेल अशी कल्पना मला आली नाही.

आज निघाल्यापासून थकवा जाणवत होता. आता ऊनही लागत होते. सतत थांबत चालणे सुरू होते. थकवा आला की मला कळत नसे की मी कुठपर्यंत आणि का चालायचे?

काल गाव बिलहरीजवळ चहा मिळाला. मी थकलो होतोच. बन्सीसुद्धा आज चालण्यास इच्छुक नव्हते. दुपारचे १.१० झाले होते. रस्त्याला दुकाने होती. अधे मधे गावे लागत. आम्ही थकून सालीखेडा–आरोग्य केंद्राजवळ बसलो होतो. उपाशी राहण्याची स्पष्ट चिन्हे होती.

बन्सी म्हणाला, 'मैय्या भोजन देईलच पण मला आतून अजून जेवणाची ऊर्मी नाही. पण जेवण एक वाजता मिळेल.' अजून एक तासाने.

मी म्हटले,'भैय्या बन्सी, आताच एक दहा झाले आहेत. गाव संपत आले आहे. आता या डांबरी सडकेला मैय्या कुठून कसे भोजन देईल कळत नाही.'

कष्टाने सॅक उचलून, आलिया भोगासी म्हणत रस्ता धरला आणि दहा पावले गेलो नाही तोच गल्लीच्या तोंडाशी एका बाइकवाल्याने थांबविले व आत निर्देश केला. एक दुकानदार आम्हाला बोलवीत होते.

किराणामालाचे छोटे दुकान होते. बहुधा चहाचे निमंत्रण असावेसे वाटले आणि आम्हाला भूक होती भोजनाची. सॅक पायरीवर ठेवून गुपचूप बसून राहिलो. पाठीवर सॅक नसणे हेही मोठे सौख्यकारक असते.

थोड्या गप्पा झाल्या. आम्ही जेवलेलो नाही कळल्यावर दुकानदार पप्पू अग्रवाल यांनी घरात पत्नीस भोजन तयार करण्यास सांगितले व आमची परिक्रमा प्रेरणा विचारली. विशेषतः बन्सी तरुण. त्याला विचारले की, 'आपण इतक्या तारुण्यात परिक्रमेस कसे तयार झालात?'

बन्सीनेही आडपडदा न ठेवता त्याची कहाणी सांगितली. नर्मदा प्रसादांच्या पुस्तकाचा उल्लेख प्रेरणा स्थानाबद्दल करताच ते म्हणाले पान क्र. १२३ वर त्यांचा उल्लेख आहे. कारण नर्मदा प्रसाद त्यांच्याकडे तेव्हा भोजनाला होते!

या विलक्षण दैवी योगाने मी भारावून गेलो. नर्मदा प्रसादांना फोन लावला व अग्रवाल बोलले. मी ही बोललो. नर्मदा प्रसादांना सर्व गोष्टी स्पष्ट आठवल्या!

पुरी भाजीचे सुंदर भोजन मैय्याप्रसादाने मिळाले. बरेला गावाकडे प्रस्थान केले. पण आज सकाळपासूनच जो थकवा होता तो कमी झाला नव्हता. गाव येता येईना. ४ कि.मी. अंतर पण फार वाटायला लागले. गाव आले हायसे वाटले पण उतरायची व्यवस्था झाली नाही. चार ठिकाणी आग्रहाने चहा मिळाला, पण निवास भोजन नाही! कुणी 'राहा' म्हणाले नाही.

५।। वाजून गेले आणि पाऊण-तास चालत गावाबाहेर म्हणजे चक्क पुढल्या रिछाई गावाजवळ असलेल्या जगदीश्वर मंदिर धर्मशाळेत पोहोचलो तेव्हा अंधार पडला होता.

भोजन नाही पण स्वच्छ निवास मिळाला.

**मंगळवार १९ फेब्रुवारी २०१३ दिवस ८६ वा. रिछाई (जगदिश्वर मंदिर)-निवास रस्ता- मनेरी मु. धर्मशाळा गुलाब सिंग ठाकूर १५ कि.मी.**

डॉ. प्रल्हाद पटेल यांच्या कुटुंबीयांनी गेले २० वर्षे परिक्रमावासियांच्या सेवेचे व्रत घेतले आहे. तयार भोजन व निवास याची सोय ते आनंदाने करतात. वाटेत येताना अनेक ठिकाणी चहाचा आग्रह होत होता. तो स्वीकारत आम्ही एक वाजता पटेलांच्या अन्नक्षेत्रात पोहोचलो. थोड्या वेळाने भोजन प्रसादाची व्यवस्था झाली. परंतु गेल्या गेल्या बालभोग म्हणून काही नमकिन खायला मिळाले.

ग्वारी घाटावर विभक्त झालेले गोस्वामीजीही आमचे भोजन होईतो दाखल झाले, परंतु जेवून पुढे निघून गेले! आणि एक मूर्तीही विश्वास पारीदार तेही पुन्हा एकदा भेटले.

स्वयंपाकाची तयारी सुरू असताना अंगणात कावळा ओरडत होता तेव्हाच कळले की आमच्या पाठोपाठ मूर्ती येत आहेत व इथे भोजनासाठी थांबणार आहेत.

साडेचार वाजता गावात होतो पण निवारा मिळत नव्हता. गावाबाहेर एक तलाव होता. त्या पलीकडे एक मोठा यज्ञ सुरू होता. तिथे आम्हा इच्छेविरुद्ध जावे लागले. या बाष्फळ कर्मकाण्डाच्या ठिकाणी ना थांबायची इच्छा ना दर्शनाची इच्छा; पण गावकरी जमल्यास जबरदस्तीने तिथे ढकलतात.

तिथे गेलो. पण निघून पुढे ३ कि.मी. वरील मणेरी गावात जायचा निर्णय घेतला. सहा वाजले होते. ७।। वाजता एकाकी अंधारल्या रस्त्यावर पोलीस चौकी दिसली तिथे गेलो.

इन्स्पेक्टर श्रीवास्तव यांनी प्रेमाने स्वागत केले. 'हवे तर इथे व्यवस्था करतो, चौकी पवित्र होईल' म्हणाले, 'परंतु इथे नळ नाही, भोजन जिथून माझे येते तिथूनच तुमचेही भोजन येईल, आपण इथेच झोपू.'

दरम्यान त्यांनी एक फोन लावला व गुलाबसिंग ठाकूर यांच्याकडे चौकशी केली व भोजन, निवास, स्नान व्यवस्था केली.

कुठे राहायचे हा निर्णय आमच्यावर सोपविला. अर्धा कि.मी. पुढे असलेल्या गुलाबसिंगाचा पर्याय (स्नान व्यवस्थेमुळे) आम्ही निवडला. स्टेशन ऑफिसर श्रीवास्तवजी वय ५८ वर्ष, स्वतः आमच्या बरोबर पैदल गुलाबसिंग पाटलांकडे आले. आमची व्यवस्था

निरखली व निरोप घेऊन बोलविलेल्या बाइकवरून पोलीस स्टेशनला परत गेले.

चौकीत आम्हाला अगत्याने चहा दिला. 'मुलीचे लग्न (३२ वय) जमत नाही. काही तरी करा' असे म्हणताना त्यांच्या डोळ्यात व्यथा दाटून आली होती.

गुलाबसिंग ठाकुरांची पत्नी मायासिंग यांची तब्येत ठीक नसल्याने भोजनाची जबाबदारी ओंकार नाथजी तिवारी या २८ वर्षीय तरुणाने उत्तम पार पाडली. हा तरुण अती गरीब कुटुंबातला. अभ्यासात मागे, दांडगाईत पुढे. वडिलांच्या हातचा मार खाल्ला आणि घरातून निघून गेला. वय वर्षे ११. अलाहाबादला गेला. एका गाडीत बसला, ती गाडी कुठली हे कुठे ठाऊक होते. चंदीगढला उतरला. तिथे एका सरदारजीने घरी नेले. सिमेंट गोणी वाहण्याचे काम! सरदारच्या भावाचा काही कारखाना होता तिथे लागला.

खूप पैस मिळविले, उत्तम मेकॅनिक झाला होता. वयाच्या १७ व्या वर्षी गावी परतला. (बहिण सोडल्यास) कुणी ओळखले नाही. मेला समजून दहावे तेरावेसुद्धा आटपून घेतले होते!

आता विवाहीत आहे. निर्व्यसनी आहे. बायकोमुलांपासून कामानिमित्त दूर आहे. पण जावून येऊन आहे. सुखात आहे!

**– अरविंद ओक**
मानपाडा, डोंबिवली.
भ्रमणध्वनी : ०९८३३४४१५८०

•••



(पृष्ठ क्र. १० वरून ... **ओळख वनस्पतींची**)

रंगाची, गोल व मडक्यासारखी दिसणारी. त्यामुळे त्या झाडाला कुंभाचं झाड म्हणून कुंभी हे नाव मिळालं. ही फळं जंगलातील प्राण्यांची फार आवडती आहेत. विशेषतः रानडुकरांना ती जास्तच आवडतात. पावसाच्या सुरुवातीला ती गळून पडतात. मडक्याच्या तोंडामध्ये विसावलेला लांबोडा स्त्रीकेसर असतोच जोडीला.

या वृक्षाची फळे तसेच सालीचे अनेक औषधी उपयोग आहेत. बुरशी तसेच विविध बॅक्टेरियांना प्रतिबंध करण्याचा महत्त्वाचा गुणधर्म या झाडाच्या सालीमध्ये आहे. दमा, खोकला, प्रदररोग, सांध्यावरील सूज इत्यादी आजारावर याचा वापर होतो. मात्र औषध म्हणून तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाखाली वापर करणे योग्य. कधी अपायही होऊ शकतात. या झाडाच्या औषधी गुणधर्माबद्दल बरेच संशोधन झाले असून, यात अँटीऑक्सिडंट व अँटी मायक्रोबियल हे गुण असल्याचे सिद्ध झाले आहे.

अर्थात सामान्य जणांसाठी किंवा लोकसमुहासाठी हे एक शोभिवंत झाड म्हणून उद्यानात तसेच आपल्या परिसरात लावण्यासारखे झाड नक्कीच आहे. या झाडाची फारशी मिजास नसतेच. त्यामुळे भारतीय उपखंडात सर्वत्र उपलब्ध आहे. याची लागवड बीयांपासून करता येते. वनविभागाच्या नर्सरीमध्ये तसेच खाजगी नर्सरीमध्ये याची रोपे मिळू शकतात.

**– प्रकाश दुधाळकर**
एफ–२२, नीता अपार्टमेंट,
मिठागर–नवघर लिंक रोड,
मुलंड (पू.), मुंबई – ८१.
दूरध्वनी : २१६३ ६०५२

•••

दीपज्योतीमध्ये असे सामर्थ्य आहे की स्वत: प्रज्ज्वलीत होऊन दुसऱ्याला प्रज्ज्वलीत करते.

# व्यक्तिवेध-०६ : मेघनाद साहा

*खगोलशास्त्राचे प्रणेते मेघनाद साहा यांचा अल्प परिचय या लेखात करून दिला आहे - संपादक*

(लेखाचा उर्वरीत भाग मागील अंकापासून पुढे ...)

नोव्हेंबर १९२१ मध्ये साहा भारतात परत आले. खैरा-प्रोफेसर ऑफ फिजिक्स म्हणून ते कलकत्ता विद्यापीठात रुजू झाले. खैरातील कुमार गुरूप्रसाद सिंग ह्यांच्या मदतीतून निर्माण केलेले हे नवेच अध्यासन (सीट) होते. मात्र साहा दीर्घकाळ कलकत्त्यात राहिले नाहीत. १९२३ मध्ये ते भौतिकशास्त्र विभागप्रमुख म्हणून अलाहाबादमध्ये गेले. कलकत्त्यातून बाहेर जाण्याचा साहा ह्यांचा निर्णय, मुख्यत्वे संशोधनाकरता आर्थिक अनुदान मिळत नव्हते त्यामुळेच घेतलेला होता. देणग्यांद्वारे आशुतोष मुखर्जी आणखीही अध्यासने निर्माण करू शकत असले, तरीही सरकारने त्यांच्या विस्तारयोजनांना संमती दिली नाही. तत्कालीन गव्हर्नर लॉर्ड रोनाल्डशाय कलकत्ता विद्यापीठातील पदव्युत्तर विभागांतून केल्या जात असलेल्या कामांची प्रशंसा करत असता असे म्हणाले की, ‘गरीब देशात सार्वजनिक पैशांतून अशा अभ्यासांना किती अर्थपुरवठा करता येईल ह्याला मर्यादा असतात. विद्यापीठास विद्यमान अडचणींत आणखी सहभाग देण्यास कायदेमंडळ तयार असेल अशी मी आशा करतो. मात्र कायदेमंडळासही तुटपुंज्या संसाधनांतून अनेक निकडीच्या गरजा पुरवायच्या होत्या. अशा परिस्थितीत मला असे दिसते की, विद्यापीठाला ह्याचा विचार करावा लागेल की ते ज्या ज्या विषयांत पदव्युत्तर वर्ग चालवू इच्छित आहे आणि ज्या विषयांत परीक्षा घेऊन बक्षिसे वाटू इच्छित आहेत, त्या त्या विषयांत पदव्युत्तर वर्ग चालविण्यास ते बांधिल आहेत काय?’ गव्हर्नरांच्या आश्वासनानिरपेक्ष, कलकत्ता विद्यापीठाच्या अनुदानात वाढ झाली नाही. १९२२ मध्ये सरकार अडीच लाखाचे अतिरिक्त अनुदान देण्यास तयार होते. पण काही शर्तींसकट. ह्या शर्ती आशुतोष मुखर्जींना मान्य नव्हत्या. हा देकार नाकारतांना ते म्हणतात, ‘आम्ही हा पैसा घेणार नाही. आम्ही आमच्या संसाधनांतच सीमित राहू. दारोदार जाऊन बंगालातील लोकांना त्यांच्या जबाबदारीची जाणीव करून देऊ. आमचे पदव्युत्तर शिक्षक, स्वातंत्र्य गमावण्यापेक्षा उपाशी राहणे पसंत करतील.’

अशा परिस्थितीत साहांच्या कलकत्ता सोडून जाण्याच्या निर्णयाने विपरीत भावना उत्पन्न झाल्या. कलकत्ता रिव्ह्यूने त्या निर्णयावर कठोर टीका केली. मात्र ह्याची नोंद करावी लागेल की, साहांनी कलकत्ता सोडण्यापूर्वी, सिंडिकेटला असे लिहिले की, विद्यापीठ माझ्या दर्जाचे वेतन म्हणजेच रु.६५०-५०-१००० अधिक संशोधन अनुदान म्हणून हातखर्चाला रु.१५,००० मला देण्यास तयार असेल, तर मी माझ्या पूर्व-शिक्षण-संस्थेची सेवा करतच राहीन. सिंडिकेटने हा प्रस्ताव फेटाळून लावला. ते म्हणतात, विद्यापीठाची सद्य आर्थिक परिस्थिती पाहता आणि विद्यापीठातील इतर शिक्षकांचे दावे पाहता, ही विनंती मान्य करता येत नाही. म्हणून अंतिमतः साहा अलाहाबाद विद्यापीठात गेले. तिथे संशोधन सुरू करण्यापूर्वी त्यांना कार्यशाळा (वर्कशॉप), प्रयोगशाळा आणि वाचनालय सुधारावे लागले. त्याशिवाय, सज्जड प्रशिक्षण कर्तव्ये पार पाडल्यानंतर त्यांचेपाशी फारसा वेळच शिल्लक राहिना. मात्र ह्या अवघड परिस्थितीतही साहा विचलित झाले नाहीत.

लवकरच त्यांचे आणि त्यांच्या विद्यार्थ्यांचे शोधनिबंध बाहेर येऊ लागले. अलाहाबादमधील त्यांच्या सहकाऱ्यांत एन. के. सूर, पी. के. किचलू, डी. एस. कोठारी, आर. सी. मजूमदार, आत्माराम, के. बी. माथूर आणि बी. डी. नाग चौधरी इत्यादी लोक होते. साहा १९२७ मध्ये रॉयल सोसायटीचे फेलो झाल्यानंतर युनायटेड प्रॉव्हिन्सचे गव्हर्नर सर विल्यम मॉरीस ह्यांनी साहांच्या विभागास दरसाल रु.५,०००/- चे संशोधन अनुदान सुरू केले.

अलाहाबादमध्ये खगोलशास्त्रीय समस्यांवरील संशोधनाव्यतिरिक्त, त्यांनी भौतिकशास्त्राच्या अनेक शाखांत संशोधन सुरू केले आणि संघटितही केले. सांख्यिकीय यांत्रिकी (स्टॅटिस्टिकल मेकॅनिक्स), आण्विक आणि रेण्वीय वर्णपटदर्शनशास्त्र (ॲटॉमिक अँड मॉलिक्युलर स्पेक्ट्रोस्कोपी), विद्युत-ऋण-मूलद्रव्यांचे विजक आकर्षण (एलेक्ट्रॉन ऍफिनिटी ऑफ एलेक्ट्रोनिगेटिव्ह एलिमेंटस), सक्रिय नत्रबदल (ऍक्टिव्ह मॉडिफिकेशन ऑफ नायट्रोजन), उच्च तापमानावरील रेण्वीय विघटन (हाय टेंपरेचर डिस्सोसिएशन ऑफ मॉलिक्यूल्स), मूलकांबरातील प्रारणलहरींचा प्रसार (प्रपोगेशन ऑफ रेडिओवेव्हज इन आयोनोस्पिअर) आणि वरिष्ठ वातावरणाचे भौतिकशास्त्र (फिजिक्स ऑफ द अप्पर ऍटमोस्पिअर). ह्याच वेळी साहांनी त्यांचे विख्यात पाठ्यपुस्तक 'अ ट्रिटीज ऑन हीट' लिहिले. हेच पुस्तक पहिल्यांदा १९३१ साली 'ए टेक्स्टबुक ऑफ हीट' ह्या शीर्षकाने प्रकाशित झालेले होते. बी. एन. श्रीवास्तव ह्यांच्या सोबतीने हे पुस्तक लिहिलेले होते. ह्या पुस्तकाला प्रस्तावना लिहित असता सी.व्ही.रामन लिहितात, 'उष्णतेवरील प्रणालीबद्ध आणि अद्ययावत संहिता (ट्रिटीज) तयार करण्यासाठीचे कष्टप्रद कार्य हाती घेऊन प्राध्यापक साहा, देशातील आणि देशाबाहेरील विस्तृत वर्तुळातील वाचकांच्या धन्यवादांस पात्र ठरले आहेत. ते नक्कीच हे पुस्तक अभ्यासतील आणि त्याच्या गुणवत्तेचा आस्वाद घेतील.' ह्या पुस्तकाची एक सारांशरूप आवृत्ती विज्ञान स्नातकांकरता प्रकाशित करण्यात आलेली होती. तिचे शीर्षक 'ज्युनिअर टेक्स्टबुक ऑफ हीट' असे होते. त्यांनी एन.के.साहा ह्यांचेसोबतीने 'ट्रिटीज ऑन मॉडर्न फिजिक्स' शीर्षकाचे आणखीही एक पुस्तक लिहिले होते.

अलाहाबाद येथे साहांनी १९३० मध्ये, युनायटेड प्रॉव्हिन्स ऍकॅडमी ऑफ सायन्सेस स्थापन केली. अशी ऍकॅडमी स्थापन करण्याची सूचना युनायटेड प्रॉव्हिन्सचे गव्हर्नर सर माल्कम हेले ह्यांच्याकडूनच आलेली होती, हे विशेष. इंडियन सायन्स काँग्रेस असोसिएशनच्या समारंभ प्रसंगी अलाहाबाद येथे, युनायटेड प्रॉव्हिन्समधील गोळा झालेल्या सर्व शास्त्रज्ञांना उद्देशून बोलत असता माल्कम म्हणाले होते की, 'मला पूर्ण कल्पना आहे की, आमच्या संशोधकांच्या अथवा विद्यार्थ्यांच्या प्रयासांना (आर्थिक व्यय आणि उपयोगिता) ह्या दिशेने वळवण्यास निश्चित स्वरूपाच्या मर्यादा आहेत. मला हेही पूर्णपणे ठाऊक आहे की, त्यांच्या कष्टांचे समन्वयन बाहेरून करताही येणार नाही. असे प्रयास स्वयंस्फूर्ततेने, न पेक्षा कुठल्याशा सायन्स ऍकॅडमीच्या सल्ल्यानुरूप केले जाऊ शकतील. अशा सायन्स ऍकॅडमीत, प्रांतात सद्यपरिस्थितीत कार्यरत असलेले, वैज्ञानिक कार्याच्या सर्व विशेष शाखांचे अधिकारी प्रतिनिधी असतील. मात्र जर कुठल्याशा स्वरूपातील दृश्यमान समन्वयन घडवता आले, लोकांना हे सिद्ध करून दाखवता आले की वैज्ञानिक कार्यकर्ते, त्यांच्या काही ऊर्जा, मी सुचवलेल्या दिशेने वळवत आहेत; तर मला विश्वास वाटतो की, आपण वैज्ञानिक कार्याने ज्यावर विसंबून राहावे अशा सार्वजनिक पाठिंब्याची आणि खासगी मुक्ततेची मागणी प्रभावीरीत्या करू शकू.'

साहा जुलै १९३८ मध्ये कलकत्ता विद्यापीठात

परत आले. ते पलित–प्रोफेसर आणि भौतिकशास्त्र विभागप्रमुख झाले. त्या वेळी श्यामाप्रसाद मुखर्जी विद्यापीठाचे कुलगुरू होते. त्यांच्या पश्चात लगेचच सर महम्मद अझिझुल हक विद्यापीठाचे कुलगुरू झाले. रुजू झाल्यावर लगेचच पलित– प्रयोगशाळेतील संशोधन संघटित करण्यात ते व्यस्त झाले. भौतिकशास्त्रातील एम.एस.सी.च्या अभ्यासक्रमाची पुनर्रचना करण्याचे कामही त्यांनी हाती घेतले. १९४० मध्ये साहा ह्यांनी अणुकेंद्रकीय भौतिकशास्त्रातील एक सामान्य आणि एक विशेष असे दोन अभ्यासक्रमही सुरू केले. इथे ह्याची नोंद करायला हवी की, विदलन आविष्कार (फिजन फिनॉमिना) १९३९ मध्ये ऑट्टो हान (१८७९–१९६८) आणि फिर्टझ स्ट्रास्समन (१९०२–८०) ह्यांनी शोधून काढला होता. साहांनी पुंज यांत्रिकीवर एक अभ्यासक्रमही सुरू केला. कलकत्ता विद्यापीठातील साहा ह्यांच्या संशोधन कार्याबद्दल डी.एस.कोठारी लिहितात, 'कलकत्त्यातील त्यांचे संशोधन बहुतांशी अणुकेंद्रकीय प्रणालींशी संबंधित राहिले, विशेषतः बीटा–सक्रियता, विद्युत्चुंबकीय लहरींचा मूलकांबरातील प्रसार आणि सौर प्रभावळीच्या (कोरोना) समस्या ह्यांचेशी.'

साहा हे एक थोर संस्था–संस्थापक होते. जिथे ते रुजू झाले होते तो अलाहाबाद विद्यापीठामधील भौतिकशास्त्र विभाग त्यांनी देशातील सर्वात सक्रिय केंद्र म्हणून नावारूपास आणला. विशेषतः वर्णपटदर्शनशास्त्राच्या क्षेत्रात. विभाग, देशभरातून विद्यार्थ्यांना आकर्षित करत असे.

१९११ मध्ये साहांनी अलाहाबाद येथे उत्तरप्रदेश ॲकॅडमी ऑफ सायन्सेसची स्थापना केली, जिचे पुढे जाऊन नॅशनल ॲकॅडमी ऑफ सायन्सेस, इंडिया असे पुनर्नामांकन झाले. हिचे उद्‌घाटन १ मार्च १९३२ रोजी झाले. एशियाटिक सोसायटी ऑफ बेंगालच्या धर्तीवरच हिचे प्रारूप करण्यात आलेले होते. साहा तिचे पहिले अध्यक्ष होते. १९३३ मध्ये साहांनी कलकत्त्यास इंडियन फिजिकल सोसायटीची स्थापना केली. इंडियन जर्नल ऑफ फिजिक्स हीच सोसायटी प्रकाशित करते. रामन, साहा आणि कृष्णन ह्यांच्यासारखे विख्यात शास्त्रज्ञ इंडियन जर्नल ऑफ फिजिक्स मध्ये आपले शोधनिबंध नियमितपणे प्रकाशित करत असत. साहा ह्यांच्याच पुढाकाराने नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ सायन्सेस ऑफ इंडिया ह्या संस्थेची स्थापना कलकत्ता येथे झाली. ७ जानेवारी १९३५ रोजी तिची अधिकृत घोषणा, कलकत्ता विद्वत्सभा सभागृहात करण्यात आली. अध्यक्षपदी जे. एच. हटन होते. एल. एल. फर्मोर ह्या संस्थेचे पहिले निर्वाचित अध्यक्ष झाले होते. १९३४ मध्ये मुंबईत झालेल्या इंडियन सायन्स काँग्रेस असोसिएशनच्या अधिवेशनातील अध्यक्षीय भाषणात, अशा ऑल इंडिया ॲकॅडमी ऑफ सायन्सेसची प्रथम साहा ह्यांनीच प्रस्तुत केलेली होती. नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ सायन्सेसचेच पुनर्नामांकन पुढे इंडियन नॅशनल ॲकॅडमी ऑफ सायन्सेस असे करण्यात आले आणि तिचे मुख्यालय नवी दिल्लीत हलविण्यात आले. केंद्रीय काच आणि चीनीमाती संशोधन संस्थेचे (सेंट्रल ग्लास अँड सिरॅमिक्स रिसर्च इन्स्टिट्यूट) नियोजन आणि स्थापना करण्यातही साहा ह्यांचा हातभार लागलेला आहे. ही संस्था कौन्सिल ऑफ सायंटिफिक अँड इंडस्ट्रिअल रिसर्च ह्या संस्थेची कलकत्ता येथील सहयोगी संस्था आहे. १९४४ मध्ये साहा ह्यांची इंडियन असोसिएशन फॉर कल्टिव्हेशन ऑफ सायन्सच्या ऑनररी सेक्रेटरीपदी निवड झाली. १९४६ ते १९५० दरम्यान ते तिचे अध्यक्षही राहिले. १९५२ मध्ये ते असोसिएशनच्या प्रयोगशाळांचे पूर्णवेळ संचालकही झाले आणि तहहयात त्या पदावर राहिले. त्यांच्या नेतृत्वाखाली असोसिएशनच्या कार्यक्रमाचा मोठ्या प्रमाणात विस्तार झाला. अध्यक्ष ह्या नात्याने त्यांनी असोसिएशनच्या आधुनिक प्रयोगशाळांची उभारणी केली.

साहा ह्यांनी कलकत्ता विद्यापीठात; प्रारण

---

जिथे रूजत नाही तेथे उगीच बी पेरू नये.

भौतिकशास्त्र (रेडिओ फिजिक्स), विजकविद्या (इलेक्ट्रॉनिक्स) आणि उपायोजित भौतिकशास्त्र (अप्लाईड फिजिक्स) हे विभाग; स्थापन करण्यात महत्त्वाची भूमिका निभावलेली आहे. १९५० मध्ये साहांनी इन्स्टिट्यूट ऑफ न्युक्लिअर फिजिक्सची स्थापना केली. संस्थेची कोनशिला डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी ह्यांचे हस्ते बसविण्यात आली. ते त्यावेळी भारत सरकारचे नागरी पुरवठा मंत्री होते. संस्थेचे औपचारिक उद्‌घाटन इरीन जोलिएट क्युरी ह्यांच्या हस्ते, ११ जानेवारी १९५० रोजी करण्यात आले होते. ही संस्था मुळात कलकत्ता विद्यापीठाच्या आवारातच होती. उद्‌घाटन सोहळ्यास उपस्थित असणाऱ्यांत रॉबर्ट रॉबिन्सन आणि जे. डी. बर्नाल हेही होते. १९४० साली कलकत्ता विद्यापीठातील एम. एस. सी. फिजिक्सच्या अभ्यासक्रमात पहिल्यांदा अणुकेंद्रकीय भौतिकशास्त्राचा समावेशही साहा ह्यांनीच केला होता. त्याशिवाय त्यांनी एम.एस.सी.पश्चातचा अणुकेंद्रकीय विज्ञानावरील एक अभ्यासक्रमही देशात पहिल्यांदाच सुरू केला होता. देशातील पहिला आवर्तनक (सायक्लॉट्रॉन) उभारण्यासाठीची पावलेही त्यांनी उचललेली होती.

शास्त्रीय कार्यकर्त्यांच्या, जुलै १९४६ मध्ये ब्रिटनमध्ये भरवण्यात आलेल्या परिषदेचे पर्यवसान, वर्ल्ड फेडरेशन ऑफ सायंटिफिक वर्कर्सची स्थापना होण्यात झाले. ह्या परिषदेत साहा सहभागी झालेले होते. भारतात परत आल्यावर त्यांनी भारतातील शास्त्रीय कार्यकर्त्यांना, तत्सम संस्था भारतात उभी करण्याबाबत, सायन्स अँड कल्चर मध्ये संपादकीय लिहिले. अशा प्रकारच्या संघटनेचे उद्दिष्ट स्पष्ट करत असताना ते लिहितात,- अशा प्रकारच्या संघटनेची ध्येये आणि उद्दिष्टे; परिषदांतून प्रशिक्षण आणि सार्वजनिक क्षेत्रात प्रत्यक्ष कृती घडवून राष्ट्रजीवनात विज्ञानाचा पूर्णत्वाने उपयोग व्हावा ह्याकरता निश्चित केलेली असावीत. आणखीही एका प्रसंगी ते लिहितात, भारतातील शास्त्रीय कार्यकर्त्यांनी, सन्माननीय नागरिक म्हणून जगण्याचा अनुस्यूत हक्क आणि मातृभूमीच्या उद्धाराप्रतीची कर्तव्ये बजावावीत अशी वेळ येऊन ठेपलेली आहे. यथावकाश ७ जुलै १९४७ रोजी असोसिएशन फॉर सायंटिफिक वर्कर्स (इंडिया) ची स्थापना झाली.

साहा ह्यांनी कलकत्ता येथे १९३५ साली इंडियन सायन्स न्यूज असोसिएशनची स्थापना केली. जनसामान्यांत विज्ञानाचा प्रसार करणे हेच तिचे प्रमुख उद्दिष्ट होते. सायन्स अँड कल्चर हे संस्थेचे मुखपत्र प्रकाशित करणे सुरू झाले. पत्रिकेच्या पहिल्या आवृत्तीची प्रत प्राप्त झाल्यावर नेताजी सुभासचंद्र बोस लिहितात, सायन्स अँड कल्चरच्या अवतरणाचे स्वागत, केवळ अमूर्त विज्ञानात रस असलेल्यांनीच नव्हे, तर व्यवहारात राष्ट्र-उभारणीत रुची असणाऱ्यांनीही केले पाहिजे. जुन्या राष्ट्र घडविणार्यांचे दृष्टीकोन काय असतील ते असोत, आपण तरुणांनी राष्ट्र उभारणीचे कार्य पूर्णतः वैज्ञानिक दृष्टीकोन समोर ठेऊन करायला हवे आणि आधुनिक विज्ञान आणि संस्कृती आपल्याला जे जे देऊ शकत असेल त्या सर्व ज्ञानाने आपण सुसज्ज असायला हवे अशीच आमची इच्छा आहे. मात्र राजकीय कार्यकर्त्यांना त्यांच्या न संपणाऱ्या व्यस्ततेपायी स्वतः असे ज्ञानार्जन शक्य होत नाही. म्हणून वैज्ञानिक आणि वैज्ञानिक तपासकांनी त्यांना मदत करण्यास पुढे यावे. साहांनी स्वतः २०० हून अधिक लेख सायन्स अँड कल्चर मध्ये लिहिले. त्यात शास्त्रीय आणि औद्योगिक संशोधनाच्या संघटनांपासून तर अणुऊर्जा व तिचे औद्योगिक उपयोग, नदीखोरेविकास प्रकल्प, राष्ट्रीय अर्थव्यवस्थेचे नियोजन, शैक्षणिक सुधारणा, भारतीय दिनदर्शिका इत्यादींपर्यंत विविध विषयांचा समावेश होता. वर्तमानात पत्रिकेचे ६८ वे वर्ष सुरू आहे.

भारतातील वैज्ञानिक अर्थव्यवथेच्या नियोजनाबाबतच्या

जिथे मोल जाणत नाही तिथे शब्द टाकू नये.

आपल्या दृष्टीविषयी साहा ह्यांनी विस्ताराने लिहून ठेवलेले आहे. साहांनीच राष्टीय नियोजन समितीच्या स्थापनेकरता, तत्कालीन भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे अध्यक्ष असलेले नेताजी सुभाषचंद्र बोस ह्यांचे मन वळवले होते. सुरुवातीस, सर्वाधिक ख्यातीप्राप्त भारतीय अभियंता एम. विश्वेश्वरय्या हे त्या समितीचे अध्यक्ष राहिले. मात्र, समितीचा प्रभाव पडण्याच्या दृष्टीने साहांना असे वाटत होते की, तिचे अध्यक्षपद काँग्रेसच्या एखाद्या शक्तीशाली नेत्याकडे असावे. त्यासाठी समितीचे अध्यक्षपद स्वीकारण्यास जवाहरलाल नेहरूंना राजी करण्यासाठी त्यांचे मन वळवण्यास साहांनी रवींद्रनाथ टागोरांना गळ घातली होती.

साहा हे अणुऊर्जेच्या शांततामय विनियोगाचे समर्थक होते. १० मे १९५४ रोजी त्यांनीच ह्या विषयावरला प्रथम सांसदीय वाद सुरू केला होता. साहा ह्यांचा ऍटॉमिक एनर्जी कमिशनच्या स्थापनेस विरोध होता. त्यांना असे वाटत होते की, अणुऊर्जेबाबतचे संशोधन विद्यापीठ पातळीवर केले जावे. वस्तुतः त्यांना इंडियन ऍटॉमिक एनर्जी ॲक्ट पूर्णतः मोडीत काढण्याची इच्छा होती. त्यांना असे वाटत होते की, असा कार्यक्रम हाती घेण्यापूर्वी सरकारने प्रथम आवश्यक त्या पायाभूत सुविधा आणि प्रशिक्षित मनुष्यबळ निर्माण करावे. मात्र, साहा ह्यांचा विरोध असूनही १९४८ मध्ये, होमी जे. भाभा ह्यांच्या अध्यक्षतेखाली ऍटॉमिक एनर्जी कमिशन ची स्थापना करण्यात आली. डी.एम.बोस ह्यांनी १९६७ साली असे म्हटले होते की, अणुऊर्जाविभागाचे स्थानांतर, तसेच अणुऊर्जाविभागाचे सचिव म्हणून आणि अणुऊर्जाआयोगाचे अध्यक्ष म्हणून भाभा ह्यांची केलेली नियुक्ती, ह्या पंतप्रधानांच्या (जवाहरलाल नेहरू ह्यांच्या) निर्णयांमुळे साहा ह्यांची काहीशी निराशा झाली असणार. कारण १९३५ पासून नेहरू आणि साहा ह्यांनी समान स्वारस्याच्या अनेक क्षेत्रांत सहकार्य केलेले होते. त्यात सुभाषचंद्र बोस ह्यांनी १९३८ साली नियुक्त केलेल्या नियोजन समितीचा समावेश होतो, जिच्या अध्यक्षपदी नेहरू होते, आणि जिचे साहा हे महत्त्वपूर्ण सदस्य होते. त्यानंतरच्या काही निर्णयांबाबत पंतप्रधानांसोबतच्या संबंधातील वाढता अवघडलेपणा, पुढे १९५२ मध्ये मग साहा ह्यांनी राजकारणात प्रवेश केला, त्यापाठीमागच्या कारणांतील एक घटक असू शकेल. मात्र ह्यात मुळीच शंका नाही की, अणुऊर्जेच्या उपयोगाबाबतच्या भारतीय नियोजनाचा विकास भाभांच्या सुपूर्त करण्याचा पंतप्रधान नेहरूंचा निर्णय योग्यच होता. भारतातील अणुऊर्जेच्या विकासासोबत भाभांनी स्वतःची ओळख निर्माण केली. साहा ह्यांची स्वारस्ये अनेक आणि विविध स्वरूपांची होती. त्यांच्या ह्या मताशी, अनेक लोक सहमत होतील.

अनेक भारतीय नदीखोऱ्यांत वारंवार घडून येणाऱ्या विध्वंसक पुरांबाबतही साहांना अत्यंत काळजी वाटत असे. १९२३ मध्ये उत्तर बंगालात सर्वदूर पुरामुळे घडून आलेल्या हानीमुळे आचार्य प्रफुल्लचंद्र रे ह्यांना नॉर्थ बंगाल रिलीफ कमिटीच्या विद्यमाने पूरग्रस्तांसाठी मदतकार्य हाती घ्यावे लागलेले होते. मदतकार्यासाठी सर्वसामान्य लोकांकडून मोठा निधी गोळा करणे रे ह्यांना शक्य झालेले होते. त्यांना सुभाषचंद्र बोस, मेघनाद साहा आणि सतिशचंद्र दासगुप्ता ह्यांनीही मदत केलेली होती. हे मदतकार्य करत असतानाच साहांना पुरांच्या विध्वंसक शक्तीची प्रत्यक्ष कल्पना आलेली होती. ह्या अनुभवाबाबत साहा ह्यांनी वृत्तपत्रांत आणि नियतकालिकांत लिहून ठेवलेले आहे. १९३४ साली मुंबई येथे भरलेल्या इंडियन सायन्स काँग्रेसच्या अध्यक्षपदावरून बोलत असता, पुरांमुळे उद्भवलेल्या ह्या गंभीर समस्यांकडे त्यांनी विशेष लक्ष वेधले होते. नदीसंशोधन प्रयोगशाळा स्थापन करण्याची गरजही त्यांनी अधोरेखित केलेली होती. १९३८ मध्ये पुन्हा, नॅशनल

इन्स्टिटच्यूट ऑफ सायन्स ऑफ इंडियाच्या अध्यक्षपदावरून केलेल्या आपल्या भाषणात त्यांनी भारतीय नद्यांत पुन्हापुन्हा उद्भवणारी पूरपरिस्थिती, विशेषतः त्रिभूज प्रदेशांतील पूरपरिस्थिती अधोरेखित केली होती. १९४३ मध्ये बंगालात आलेल्या पुराने कलकत्त्यास उर्वरित भारतापासून विलग केले होते. साहांनीही ह्याबाबत विस्ताराने लिहिलेले आहे. साहा ह्यांच्या लिखाणामुळेच सरकारला परिस्थितीचे गांभीर्य लक्षात आले. परिणामी १९४३ मध्येच दामोदर खोरे चौकशी समिती अस्तित्वात आली. बरद्वानचे महाराज तिचे अध्यक्ष होते. साहा तिचे सदस्य होते. दामोदर खोरे प्रणाली हाताळण्याची योजना साहा ह्यांनी तयार करून समितीपुढे प्रस्तुत केली. आधुनिक विज्ञान व तंत्रज्ञानाच्या आधारे पूरनियंत्रण करण्याबाबतही त्यांनी विस्ताराने लिहिले. त्यांनी असा मुद्दा मांडला की, अमेरिकेतील टेन्नेस्सी व्हॅली ऍथॉरिटीच्या (टी.व्ही.ए.) आधिपत्याखाली टेन्नेस्सी व्हॅली सिस्टिममध्ये राबविण्यात आलेले प्रारूप (मॉडेल) दामोदर खोऱ्यात अंमलात आणता येऊ शकेल. त्यावेळच्या वाईसराय ह्यांच्या मंत्रिमंडळातील ऊर्जा आणि कार्ये विषयाकरताचे प्रभारी मंत्रिमंडळसदस्य असलेले डॉ.बी.आर.आंबेडकर ह्यांच्या सांगण्यावरून सरकारने, टी.व्ही.ए. प्रारूपावर आधारित दामोदर व्हॅली कॉर्पोरेशन (डी.व्ही.सी.) स्थापन करावी असा निर्णय घेतला. डी.व्ही.सी.ची स्थापना मार्च १९४८ मध्ये करण्यात आली. साहा ह्यांचे स्वारस्य केवळ बंगालातील नद्यांपुरतेच सीमित नव्हते.

भारतीय दिनदर्शिकेतील सुधारणांबाबतचे साहा ह्यांचे काम खूप महत्त्वाचे आहे. भारत सरकारने १९५२ साली, कौन्सिल ऑफ सायन्टिफिक अँड इंडस्ट्रिअल रिसर्चच्या विद्यमाने नियुक्त केलेल्या दिनदर्शिका सुधार समितीचे ते अध्यक्ष होते. ह्या समितीचे इतर सदस्य पुढीलप्रमाणे होते. ए.सी.बॅनर्जी, के.के.दफ्तरी, जे.एस.करंदीकर, गोरखप्रसाद, आर.व्ही.वैद्य आणि एन.सी.लाहिरी. साहा ह्यांच्या प्रयत्नांमुळेच समिती स्थापन होऊ शकली होती. समितीसमोरील कर्तव्यं, वैज्ञानिक अभ्यासाचे आधारे असे अचूक दिनदर्शिका तयार करण्याचे होते, जे भारतभर एकरूपतेने उपयोगात आणले जाऊ शकेल. हे काम प्रचंडच होते. समितीस देशाच्या निरनिराळ्या भागांत प्रचलित असलेल्या विविध दिनदर्शिकेचा तपशीलवार अभ्यास हाती घ्यावा लागला. अशा तीस निरनिराळ्या दिनदर्शिका अस्तित्वात होत्या. दिनदर्शिकेसोबत धार्मिक आणि स्थानिक भावना गुंतलेल्या असल्याने हे काम अधिकच गुंतागुंतीचे झालेले होते. १९५५ साली प्रकाशित झालेल्या समितीच्या अहवालास लिहिलेल्या प्रस्तावनेत नेहरू म्हणतात– त्या दिनदर्शिका देशातील भूतपूर्व राजकीय विभागांचे प्रतिनिधित्व करतात. आता आपल्याला स्वातंत्र्य लाभलेले आहे. त्यामुळे हे वांछनीय आहे की, आपल्या नागरी, सामाजिक आणि इतर उपयोगांकरताच्या दिनदर्शिकांत काहीशी एकरूपता असावी. हे ह्या समस्येस वैज्ञानिक दृष्टीकोनातून पाहून साध्य केले जावे. ह्या समितीच्या काही महत्त्वपूर्ण शिफारसी खालीलप्रमाणे आहेत.

एकीकृत राष्ट्रीय दिनदर्शिकेत (युनिफाईड नॅशनल कॅलेंडर) शक युग (सक इरा) उपयोगात आणले जावे. (इसवी सन २००२ म्हणजे शके १९२३–२४.)

१. वर्ष वसंत संपातानंतरच्या दिवशी सुरू होईल. (हा दिवस २१ मार्चच्या सुमारास येतो.)

२. सामान्य वर्षात ३६५ दिवस असावेत. लीप वर्षात ३६६ दिवस असावेत. शक युगात ७८ वर्षे मिळवून बेरीजेस जर चारने भाग जात असेल तर ते लीप वर्ष धरण्यात यावे. पण जेव्हा विचाराधीन वर्ष १०० च्या पटीत येईल तेव्हा, जर त्या वर्षाच्या आकड्यास ४०० ने भाग जात असेल तरच ते लीप वर्ष ठरेल. एरव्ही ते सामान्य वर्ष ठरेल.

३. वर्षाचा पहिला महिना चैत्र असेल. चैत्र ते भाद्रपद प्रत्येक महिन्यास एकतीस दिवस असतील आणि उर्वरित महिन्यांना प्रत्येकी तीस दिवस असतील.

साहा ह्यांच्यानुसार, आयुष्याची गुणवत्ता सुधारण्याचा एकमेव उपाय म्हणजे मोठ्या प्रमाणातील औद्योगिकीकरण होय. ते असा विचार करत की, भारत विज्ञान आणि तंत्रज्ञान विकसित करण्यात अपयशी ठरल्यास, भारतास काहीच आशा उरणार नाही. ते लिहितात, 'सर्व थोर धर्मांच्या संस्थापकांनी इतरांशी सहृदयतेने आणि सेवाभावाने व्यवहार करण्यासच शिकवले आहे, आणि हे (आदर्शवादी) तत्त्वज्ञान अंमलात आणण्यास सर्व काळांतील, प्रत्येक देशातील काही महान राजे आणि धर्माधिकाऱ्यांनी प्रयास केलेले आहेत, ह्यात मुळीच संशय नाही. पण असे प्रयास यशस्वी झाले नाहीत. व्यवहारात आदर्श प्रस्थापित करण्यासाठी; वस्तू-निर्माण-पद्धती सर्वांना विपूल प्रमाणात पुरेशा वस्तू निर्माण करतील ही शर्त अनिवार्य असते. तसे करण्याबाबत वस्तू-निर्माण-पद्धती उदासिन असत, ह्या साध्या कारणानेच ते प्रयास यशस्वी होऊ शकले नाहीत. आपण असे म्हणू या की, जगातील प्रगत देशांत, व्यक्तीगत आयुष्यांचा विचार करता, विज्ञानाने आजवर थोर धर्मसंस्थापकांनी ठरवलेले लक्ष्य साध्य केले आहे. ऐतिहासिक कारणांनी निर्माण झालेले, संपत्तीच्या विषम विभाजनाचे परिणाम, सामाजिक कायद्यांच्या प्रवेशामुळे झपाट्याने निरस्त होत आहेत.'

१९५२ साली, साहा स्वतंत्र उमेदवार म्हणून कलकत्ता वायव्य सांसदीय मतदारसंघातून निर्वाचित संसदसदस्य झाले होते. ह्या निवडीचे स्वागत करत असता जे.बी.एस. हल्दाने म्हणतात- मलाही त्यांच्या अलीकडील राजकारणातील पुनर्प्रवेशाप्रित्यर्थ त्यांचे अभिनंदन करण्याची अनुमती असावी. भारतास (आणि ब्रिटनलाही) देशाच्या सरकारात शास्त्रीय समज आणणाऱ्या लोकांची गरज आहे. अगदी ज्यांना त्यांचे राजकीय दृष्टीकोन मान्य नाहीत, तेही ह्याचा आनंद व्यक्त करतील की, लोकप्रतिनिधींच्या सभागृहात ते (साहा) आपला आवाज ऐकवू शकतील. अनेकांना ह्याचे आश्चर्य वाटते की, आंतरराष्ट्रीय ख्यातीचे वैज्ञानिक असूनही साहा ह्यांनी निवडणूक लढवण्याचा निर्णय का घेतला.

१६ फेब्रुवारी १९५६ रोजी आपल्या योजना आयोगातील कार्यालयात जात असता, हृदयविकाराचा मोठा झटका येऊन साहा अचानकच वारले. त्यांचे एक उद्यमी विद्यार्थी असलेले डी.एस. कोठारी म्हणतात त्यानुसार- साहांचे आयुष्य एका अर्थाने भारतातील वैज्ञानिक संशोधनाच्या वाढीचा आणि प्रगतीचा एक अविभाज्य भागच होते. त्यांच्या दृष्टीचा आणि व्यक्तिमत्त्वाचा परिणाम, भावी काळातील देशातील जवळपास प्रत्येक शास्त्रीय कार्यातील प्रत्येक पैलूवर दीर्घ काळ पडलेला दिसून येईल. त्यांची विज्ञानाप्रतीची निष्ठा, सरळसाधेपणा आणि निवडलेल्या कार्यादरम्यान व्यक्तिगत सोयींप्रतीची अनास्था; एक प्रेरणा आणि उदाहरण बनून राहील.

**मेघनाद साहा ह्यांनी लिहिलेली पुस्तके**

१. प्रिन्सिपल्स ऑफ रिलेटिव्हिटी (एस.एन.बोस ह्यांचे सोबत मिळून), कलकत्ता विद्यापीठ, कलकत्ता १९२०. हे पुस्तक म्हणजे, आईन्स्टाईन ह्यांच्या सापेक्षतावादाच्या सिद्धांवरील शोधनिबंधांचा अनुवाद आहे.

२. ट्रिटीज ऑन हीट (बी.एन. श्रीवास्तव ह्यांचेसोबत मिळून), इंडियन प्रेस, अलाहाबाद, १९३१.

३. ज्युनिअर टेक्स्टबुक ऑन हीट (बी.एन. श्रीवास्तव ह्यांचेसोबत मिळून), इंडियन प्रेस, अलाहाबाद, १९३२.

४. ट्रिटीज ऑन मॉडर्न फिजिक्स, व्हॉल्यूम-१

(एन.के.साहा ह्यांचेसोबत मिळून), इंडियन प्रेस, अलाहाबाद, १९३४.

५. माय एक्सपिरिअन्स इन सोव्हिएत रशिया, बुकमन इन्कार्पोरेटेड, कलकत्ता, १९४७.

**अधिक वाचनासाठी**

१. मेघनाद साहा, लेखकः सान्तिमय चटर्जी आणि एनक्षी चटर्जी, नॅशनल बुक ट्रस्ट, नवी दिल्ली १९८४.

२. मेघनाद साहा, लेखकः एस.बी.कर्मोहपात्रा, प्रकाशनविभाग, भारत सरकार, नवी दिल्ली–१९९७.

३. मेघनाद साहा, लेखकः डी.एस.कोठारी, बायोग्राफिकल मेमॉईर्स ऑफ फेलोज ऑफ द नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स ऑफ इंडिया, व्हॉल्यूम–२, नवी दिल्ली, १९७०.

४. प्रोफेसर मेघनाद साहा, हीज लाईफ, वर्क अँड फिलॉसॉफी, संपादनः समरेंद्रनाथ सेन, मेघनाद साहा ह्यांचा साठावा वाढदिवस समिती, कलकत्ता–१९५४.

५. थर्टी इयर्स ऑफ द इन्स्टिट्यूट ऑफ न्युक्लिअर फिजिक्स, साहा इन्स्टिट्यूट ऑफ न्युक्लिअर फिजिक्स, १९८१.

६. कलेक्टेड सायंटिफिक पेपर्स ऑफ मेघनाद साहा, संपादनः सान्तिमय चटर्जी, वैज्ञानिक आणि औद्योगिक संशोधन परिषद, नवी दिल्ली–१९६९.

७. कलेक्टेड वर्क्स ऑफ मेघनाद साहा, संपादनः सान्तिमय चटर्जी, ओरिएंट लाँगमन लिमिटेड, कलकत्ता, १९८२–१९९३.

८. सायन्स अँड कल्चर, गोल्डन ज्युबिली व्हॉल्यूम, इंडियन सायन्स न्यूज असोसिएशन, कलकत्ता, १९८५.

९. सायन्स अँड कल्चर, व्हॉल्यूम १–२१, इंडियन सायन्स न्यूज असोसिएशन, कलकत्ता, १९३६–५५.

१०. जवाहरलाल नेहरू ऑन सायन्स, संपादनः बलदेव सिंग, नेहरू मेमोरिअल म्युझियम अँड लायब्ररी, नवी दिल्ली–१९८६.

**संदर्भः**

१. मेघनाद साहाः खगोलशास्त्राचे प्रणेते, डॉ. सुबोध मोहंती, मराठी अनुवादः नरेंद्र गोळे, http://www.vigyanprasar.gov.in/scientists/saha/sahanew.htm

२. मेघनाद साहाः खगोलशास्त्राचे प्रणेते http://anuvad-ranjan.blogspot.in/2015/12/blog-postš27.htmllinks

**– नरेंद्र गोळे**
१०४ दत्तात्रय प्रसन्न, जोशीवाडी,
टिळकपथ छेदगल्ली, टिळकनगर,
डोंबिवली (पू.) – ४२१२०१
भ्रमणध्वनी : ९९३०५०१३३५
Email : narendra.v.gole@gmail.com

•••

## दिशासाठी

**आपले लेखनसहकार्य अपेक्षित आहे. आपल्या अध्ययन–अध्यापन विषयांतील नवीन घडामोडी, नवीन ज्ञानक्षेत्रे याबाबत सातत्याने लेखन करणे हे अध्यापनात साहाय्यकारी ठरणारे आहे.**

**तरी आपणांकडून लेखन अपेक्षित करीत आहोत.**

**– संपादक**

# नैतिक आणि आध्यात्मिक पाया

*नैतिक आणि अध्यात्मिक पाया यांचे महत्त्व विशद करणारा लेख - संपादक*

राष्ट्रपिता महात्मा गांधी यांना नैतिकता आणि नैतिक जीवनाचे एक आदर्श उदाहरण म्हणून जगाने सर्वमान्य केले आहे.

त्यांनी सत्य आणि अहिंसा हाच धर्म यावर आधारीत 'वर्तन' ह्या एकाच मानकावर विश्वास केला आहे.

**राष्ट्रपिता महात्मा गांधीच्या मते '<u>अंतर्मनाचा आवाज म्हणजेच सद्सद्विवेकबुद्धी</u>' हेच एकमेकांना पूरक व समानार्थी आहेत.**

सामाजिक आणि नैतिक मूल्ये पूर्णता रसातळाला गेली आहेत. सध्याच्या जिवघेण्या स्पर्धेत पालकसुद्धा आपल्या पाल्यांना सुचना करतात की, त्यांनी वर्गात नेहमीच पहिले/वरती यायलाच हवे.

बालपण हे अतिशय खोलवर ठसा उमटविण्याचे वय आहे. बालमन हे मऊ मेणासारखे असते, त्यामुळे त्या वयात त्यांना जे काही शिकवू त्याचा त्यांच्यावर खोलवर ठसा उमटविला जातो.

जर समुद्रकिनाऱ्यांवर दगडासारखे भरपूर हिरे सापडले असते तर आपण त्यांना उचलण्याची काळजी घेतली असती का?

पुस्तकी ज्ञान हे पुरेसे नाही. शिक्षकांचे स्वतःचे जीवन हेच विद्यार्थ्यांना एक आदर्श असावयास हवे. तेच केवळ आपल्या सद्वर्तनातून, विद्यार्थ्यांवरील त्यांच्या मित्रांकडून आलेला दबाब आणि असहिष्णुता याला रोखू व थांबवू शकतात.

श्रीमती संतोष सिंग विरुद्ध भारत सरकार व इतर या रिट याचिका (दिवाणी) क्र. १०२८ सन २०१४ दिनांक २२/०७/२०१६ (ऑल इंडिया रिपोर्टर २०१६ सर्वोच्च्य न्यायालय ३४५६) नुसार.

याचिकाकर्त्या ह्या दप्तरी नोंदीनुसार या न्यायालयासमोर व्यवसाय करणाऱ्या एक अधिवक्ता/विधीज्ञ आहेत. भारतीय संविधानातील अनुच्छेद ३२ मधील मा. सर्वोच्य न्यायालयाच्या कार्यक्षेत्राच्या अधिकारांत विनंती करून याचिकाकर्त्यांनी निवेदन केले होते की, 'समाजातील नैतिक मूल्यांचा वेगाने होत असलेला ऱ्हास व यास्तव प्रत्येक जीवन-पैलूत काहीही असो केवळ पैसे कमाविणे हा समाजाचा एकच उद्देश झाला आहे यामुळे त्यांना अतिशय गंभीरपणे त्रास होत आहे.'

यामध्ये आपल्याला या याचिकेमध्ये कोणत्या तरतुदी समाविष्ट आहेत याचा आढावा घेणे गरजेचे आहे.

**रिट याचिका आणि जनहित याचिका म्हणजे काय?**

**<u>जनहित याचिका</u>** : ठरावीक व्यक्तींच्या गटांकरिता एकाने अथवा त्या गटाने एकत्रितपणे/ संयुक्तिकरित्या अन्यायाने संतप्त होऊन समुचित कार्यवाहीद्वारे संविधानातील भाग तीन प्रमाणे प्रदान केलेले मुलभूत हक्क बजाविण्याकरिता मा. सर्वोच्च्य अथवा उच्च न्यायालयांत दाखल केलेला विनंती प्राधिलेख अर्ज याला जनहित याचिका असे मानले जाते. यामध्ये केवळ त्या नागरिकाच्या अथवा

संबंधीत इतर कोणाच्या व्यक्तीगत हितास बाधा न होता प्रामुख्याने सामाजिक जनहित बाधित होणे अथवा लोकांच्या मोठ्या गटाच्या हितास किंवा मुलभूत हक्कांना हानी पोहचल्याचा प्रश्न समाविष्ट व उपस्थित केला असल्याचे आवश्यक आहे.

वाजवी हितसंबंध असणारी जनतेतील कोणतीही व्यक्ती, सार्वजनिक कर्तव्याचा भंग झाल्यामूळे किंवा संविधानाच्या किंवा कायद्याच्या कोणत्याही तरतुदींचे उल्लंघन केल्यामुळे झालेल्या सार्वजनिक क्षतीबाबत न्यायिक उपाययोजना करण्यासाठी किंवा अशा सार्वजनिक कर्तव्याची अंमलबजावणी करविण्यासाठी जनहित याचिकेद्वारे कारवाई करू शकते.

एखादी व्यक्ती किंवा संस्था, गरीब, निरक्षर व अज्ञान व्यक्तींच्या मूलभूत हक्कांचे संरक्षण करण्यासाठी न्यायालयात जनहित याचिका दाखल करू शकते. तसेच एवढेच नव्हे तर, जनहित असलेल्या व्यक्तीने, अशा व्यक्तींच्या हक्कांचे उल्लंघन झाल्याबाबत न्यायाधीशांस उद्देशून लिहिलेले पत्र देखील जनहित याचिका असल्याचे न्यायालयाकडून समजण्यात येईल.

**रिट याचिका म्हणजे काय?**

भारतीय नागरिकाने अथवा संस्थेने अतिशय गंभीरपणे त्रास होत असताना अन्यायाने संतप्त होऊन संविधानातील भाग तीन प्रमाणे प्रदान केलेले मुलभूत हक्क बजाविण्याकरिता अथवा भाग चार मध्ये अंतर्भूत असलेली तत्त्वे देशाच्या व्यवहाराच्या दृष्टीने मुलभूत असून कायदे करताना लागू करणे हे राज्याचे कर्तव्य करण्यास समुचित कार्यवाहीद्वारे मा. सर्वोच्च्य अथवा उच्च न्यायालयांत दाखल केलेला विनंती प्राधिलेख अर्ज याला प्राधिलेख (रिट) याचिका असे म्हणतात.

**महादेश म्हणजे काय?**

राज्याच्या कार्यकारी अधिकाऱ्यास किंवा कनिष्ठ सरकारी अधिकाऱ्यांना त्यांचे अधिकृत कर्तव्य विहीत व योग्य प्रकारे किंवा अधिकारांचा गैरवापर न करता पार पाडण्याकरिता जारी केलेला न्यायालयाचा आदेश याला महादेश म्हणतात.

**<u>भारतीय संविधानाचा अनुच्छेद ३२ : या भागाद्वारे प्रदान केलेल्या हक्कांची बजावणी करण्याकरिता उपाययोजना.</u>**

(१) या भागाद्वारे प्रदान केलेल्या हक्कांची बजावणी करण्याकरीता यथोचित कार्यवाहीद्वारे सर्वोच्च्य न्यायालयाकडे विनंती अर्ज करण्याच्या हक्काची हमी देण्यात आली आहे.

(२) या भागाद्वारे प्रदान केलेल्या हक्कांपैकी कोणत्याही अंमलबजावणी करण्या यथोचित समुचित असतील असे निदेश किंवा आदेश अथवा हेबियस कॉर्पस (देहोपस्थिती), मँडॅमस (महादेश), प्रोहिबिशन (प्रतिषेध), को-वारंटो (क्वाधिकार) व सर्शिओराराय (प्राकर्षण) या स्वरूपाच्या प्राधिलेखांसह प्राधिलेख काढण्याचा सर्वोच्च्य न्यायालयास अधिकार असेल.

(३) संसद, खंड (१) व (२) द्वारे सर्वोच्च न्यायालयास प्रदान केलेल्या अधिकारांस बाधा न आणता, खंड (२) अन्वये सर्वोच्च्य न्यायालयाकडून वापरता येतील असे सर्व किंवा त्यांपैकी कोणतेही अधिकार अन्य कोणत्याही न्यायालयास आपल्या अधिकारितेच्या स्थानिक हद्दींच्या आत वापरण्यास कायद्याद्वारे अधिकार प्रदान करू शकेल.

(४) या अनुच्छेदाने हमी दिलेला हक्क, या संविधानाद्वारे त्यासाठी अन्य प्रकारे तरतुद करण्यात आली असेल ते खेरीज करून, निलंबित करता येणार नाही.

अनुच्छेद ३२ हे संविधानाचा आत्मा व हृदय आहे ज्यामध्ये व्यक्तींच्या मूलभूत हक्कांचे संरक्षण व हक्कांची

बजावणी करण्याकरिता यथोचित कार्यवाहीद्वारे सर्वोच्च्य न्यायालयाकडे विनंती अर्ज करण्याच्या हक्काची हमी देण्यात आली आहे आणि त्यासंदर्भात प्राधिलेख काढण्याचा सर्वोच्च्य न्यायालयास अधिकार आहे. मा. सर्वोच्च्य न्यायालय हेच मुलभूत हक्कांची हमी देते किंवा प्रतिवाद करते.

**भारतीय संविधानाचा अनुच्छेद ५१ (क)** :

या भागाद्वारे भारतीय नागरिकांची मुलभूत कर्तव्ये यांचा समाविष्ट आहे. अनुच्छेद ५१ (क) (च) नुसार आपल्या संमिश्र संस्कृतीच्या समृद्ध वारशाचे मोल जाणून तो जतन करणे हे प्रत्येक भारतीय नागरिकाचे कर्तव्य आहे.

**याचिकाकर्त्याचे थोडक्यात निवेदन** :

याचिकाकर्त्याची अशी तक्रार होती की, सध्याच्या शिक्षण व्यवस्थेत चांगल्या माणसाची जडणघडण करणे हा शिक्षणाचा मुख्य उद्देश ठसविला जात नाही. प्राथमिक व माध्यमिक शिक्षणात नैतिक मूल्यांचा मुलांच्या मनावर ठसा उमठविण्याकरिता शैक्षणिक सुविधा पुरविणे हे राज्याचे संविधानिक कर्तव्य असल्याचे निवेदन केले होते. केंद्रीय माध्यमिक शिक्षण बोर्ड आणि राष्ट्रीय शिक्षणाने नैतिक शिक्षणाचे पुरेसे महत्त्व अथवा दर्जा मान्य केलेला नाही असे सांगितले होते. संविधानाच्या अनुच्छेद २५ नुसार सद्सद्विवेकबुद्धीचे स्वातंत्र्य आणि धर्माचे मुक्त प्रकटीकरण, आचरण व प्रसार करण्याच्या अधिकारास सर्व व्यक्ती सारख्याच हक्कदार आहेत यानुसार **'नैतिक शास्त्र'** हा विषय अभ्यासक्रमात सक्तीचा न करण्याने अनुच्छेद २५ चा भंग झाल्याचे सांगितले होते. हे असे अनुच्छेद ५१ (क) (च) नुसार भारतीय नागरिकाच्या मुलभूत कर्तव्यास प्रतिकूल असल्याचे सांगितले होते. याचिकाकर्त्यांनी प्रामुख्याने इयत्ता पहिली ते बारावी पर्यंतच्या **अभ्यासक्रमात नैतिक शास्त्र हा विषय सक्तीचा करून** नैतिक मूल्ये आणि राष्ट्रीय शिक्षणाची कीर्ती राष्ट्रीय हिताकरिता ठसविणेकरिता या न्यायालयाच्या अधिकार कक्षेत अनुच्छेद ३२ नुसार महादेश मिळविण्याचा प्रयत्न केला होता.

**प्रतिवादीचे निवेदन** :

महामंत्री, मानव-संसाधन व विकास मंत्रालय आणि केंद्रीय माध्यमिक शिक्षण बोर्ड यांच्या माध्यमातून भारत सरकार सदर याचिकेत प्रतिवादी होते. न्यायालयाच्या दि. ०२ फेब्रुवारी २०१५ च्या नोटीसला उत्तर म्हणून केंद्रीय माध्यमिक शिक्षण बोर्डाने न्यायालयात प्रतिज्ञापत्र दाखल केले होते व भारत सरकारने त्याचा अवलंब केला होता.

सन १९८६ च्या शिक्षणावरील राष्ट्रीय धोरण यातील शिक्षणाच्या मूल्यांचा दर्जा यांचे परीक्षणाप्रमाणे अत्यावशक मूल्यांचा होत असलेला ऱ्हास आणि समाजातील वाढत असलेल्या उपाहासवृत्तीने समाजातील नैतिक मूल्यांची लागवड व जोपासना करण्याकरिता शिक्षण हे एक प्रभावी साधन बनविण्याकरिता अभ्यासक्रमात पूर्णसमायोजन करण्याची गरज लक्षकेंद्रीत केली असल्याचे निवेदन केले होते.

केंद्रीय माध्यमिक शिक्षण बोर्डाने आपल्या निवेदनात असे नमूद केले होते की, विद्यार्थ्यांच्या मनावर ठसा उमठविण्याकरिता संविधानिक मूल्ये आणि संपूर्ण जगाच्या संस्कृतीत जाहीर केलेली मुख्य जगमान्य मानवी मूल्ये ह्यांचा समाविष्ट संपूर्ण शैक्षणिक अभ्यासक्रमात केल्याचे निवेदन केले होते. संविधानाच्या अनुच्छेद ५१ (क) कडे विशेष ध्यान करून लोकशाही मूल्ये विद्यार्थ्यांच्या मनावर ठसविण्याकरिता प्रयत्न केला जात असल्याचे स्पष्ट केले होते. विशेषतः यातील मूल्ये विद्यार्थ्याच्या प्रगतीत मोजली जात असल्याचे सांगितले होते. यातील मूल्यांचा अवलंब करून अभ्यासक्रमविषयक, अभ्यासेत्तर गट कार्यक्रम व प्रकल्प राबविणे याकरिता शाळा बांधील

आहेत असे सांगितले होते. इयत्ता नववी व दहावीच्या मूल्यांकनात त्याचबरोबर सन २०१२–१३ पासून इयत्ता अकरावी व बारावीच्या वार्षिक परिक्षेतील मूल्यांकनांत मूल्यांवर आधारीत प्रश्नावली समाविष्ट केली असल्याचे सांगितले होते. जून २०१२ पासून त्यांची उद्दीष्टे साध्य करण्याकरिता, मूल्यांवर आधारीत शिक्षण या विषयाची अत्यंत महत्त्वपूर्ण उपयुक्त माहिती देणारे छोटे पुस्तक शिक्षकांकरिता प्रसिद्ध केले असल्याचे निवेदन केले होते. ज्यामध्ये शैक्षणिक मूल्ये यावर शिक्षकांचे पुस्तक, मूल्य कार्ड आणि इतर साहित्य यांचा समावेश असल्याचे स्पष्ट केले होते. मूल्यांचे शिक्षण कार्ड शिक्षकांना नैतिक शिक्षणांस मार्गदर्शन पुरविण्याकरिता उपलब्ध केले असून हे कार्ड शिक्षकांना त्यांच्या वर्गात मुलांशी संवाद साधण्याकरिता साधन म्हणून उपयोगी पडत असल्याचे निवेदन केले होते. पर्यावरण शिक्षण व पौगंडावस्थेतील शिक्षण यावर हस्तलिखित पुस्तिका, जागरूक नागरिक कार्यक्रमाची जाणीव करून देणे, प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक या वर्गांत लिंगसंवेदनशीलता विषयी शिक्षण देणे, मानवी हक्कांची ओळख इत्यादी बाबींवर योग्य ती पावले उचलली असल्याचे सांगितले होते. मानवाच्या स्वतःच्या व इतरांच्या जगण्यातील एकोपा याकरिता लागणारी मूल्ये आणि कौशल्ये यांच्या प्रोत्साहनाकरिता **'शांततेचा मार्ग'** या शीर्षकाचे संसाधन पुस्तक शिक्षकांकरिता लिहीले असल्याचे निवेदन केले होते. डिसेंबर २०१२ मध्ये राष्ट्रीय शिक्षण, संशोधन व प्रशिक्षण परिषद या विषयातील भागधारक जसे प्राचार्य, शिक्षक व शिक्षणतज्ज्ञ यांच्याशी सल्लामसलत करून **शाळेतील मुलांकरिता शिक्षण** या शिर्षकाखाली एक चौकट निर्माण केली असल्याचे सांगितले होते. या चौकटीत मूलभूत मूल्यांकरिता शिक्षण याचा अवलंब करीत **'संपूर्ण शाळेचा दृष्टीकोन'** या सदरात ज्यामध्ये परंपरागत अध्यापनशास्त्र यात आवश्यक असलेला बदल व नवीन अध्यापन शास्त्र याची गरज समाविष्ट केली असल्याचे सांगितले होते. अभ्यासेत्तर कार्यक्रमांतर्गत उदात्त कारणांकरिता चर्चा, वादविवाद, प्रदर्शने, प्रकल्प, प्रौढ शिक्षण चालविणे, सभा व निदर्शणे करणे त्याचबरोबर भूमिदिन, पर्यावरण दिवस, राष्ट्रीय शिक्षण दिन, स्वामी विवेकानंद, रवींद्रनाथ टागोर इत्यादी थोरांचे वाढदिवस साजरे करणे इत्यादी कार्यक्रमांवर भर देण्यात आला असल्याचे निवेदन केले होते. इयत्ता आठवीच्या समाजशास्त्र व अकरावीच्या राज्य शास्त्र या विषयाच्या अभ्यासक्रमांत मूलभूत अधिकार व कर्तव्ये आणि राज्य धोरणांची निदेशक तत्त्वे यांचा भाग समाविष्ट केला असल्याचे स्पष्ट केले होते.

**मा. सर्वोच्य नायालयाचा दृष्टीकोन व निष्कर्ष :**

नैतिक मूल्ये ही मूल्यांवर आधारीत शिक्षणाचा अविभाज्य भाग आहे असे म्हणण्यात काही फायदा असू शकत नाही असे मत न्यायालयाने नोंदविले होते. मुलांच्यात चौकसबुद्धी, ज्ञानइच्छा आणि मूल्यांचा अर्थ जोपासणे हा शिक्षणाचा उद्देश असून त्यापैकी स्वातंत्र्य, समता व प्रत्येकाचा सन्मान ही संविधानाचा गाभा असणारी मूलभूत मूल्ये आहेत असे स्पष्ट मत नोंदविले होते. ज्यांना आपल्या हक्कांची व इतरांच्याप्रती कर्तव्याची जाणीव आहे अशा जबाबदार व ज्ञानी नागरिकांची निर्मिती करणे हा सुद्धा एक शिक्षणाचा उद्देश आहे असे मत नोंदविले होते. शिक्षण हे प्रत्येकाच्या विकासाचे साधन असून राज्याच्या उभारणीसाठी सुद्धा शिक्षण हे एक महत्त्वाचे साधन असल्याचे मत नोंदविले होते. तंत्रज्ञानाने परंपरागत अडथळ्यांवर मात केली आणि जग एक माहिती कल्पना समुदायाचे जागतिक जाळे बनले असल्याचे मत नोंदविले होते. शिक्षण व्यवस्थेतील आव्हांनावर मात करत उत्क्रांती झाली असून कदाचित त्या आव्हांनांचा समर्थपणे मुकाबला करून व्यावहारीक तोडगा काढण्याकरिता आपल्या शिक्षण व्यवस्थेत अतिवेगाने उत्क्रांती झाली असल्याचे स्पष्ट केले होते.

**संविधानाच्या अनुच्छेद ३२ खालील न्यायालयाची अधिकारीतेचा उपयोग करून अशा प्रकारचा महादेश न्यायालयास काढता येईल का? हा वादप्रश्न या न्यायालयासमोर होता.**

ज्याअर्थी मूल्यांवर आधारीत शिक्षणाची व्यवस्था करणेची गरज आहे हे निर्विवाद असले तरी ती मूल्ये कोणत्या स्वरुपांत व रीतीने जोपासली जावीत ह्याचा आदेश न्यायालयाला देता येणार नाही असे मत नोंदविले होते. याचिकाकर्त्याने आपल्या समाजातील संस्कृतीतील अधिभौतिकवादाच्या व्याप्तीच्या वर्णनाविषयी तक्रार केली होती. संविधानाच्या अनुच्छेद ३२ खालील न्यायालयाची अधिकारिता ही सर्व रोगावर उपाय नसून नागरिकांच्या संविधानिक मूलभूत अधिकारास बाधा झाल्यास हक्क बजाविण्याकरिता उपाययोजना व प्रतिवाद असल्याचे स्पष्ट केले होते. भौतिकवादाच्या हाती सत्ता असलेल्या प्रबळ उपस्थिती बद्दल याचिकाकर्त्यांच्या अशा या तक्रारी इतरत्र असावयास हव्यात आणि ज्याच्याकडे पुरेसे ज्ञान अगर कौशल्य आहे आणि शैक्षणिक धोरणे आखणे व ती राबविण्याचे संविधानिक कर्तव्य आहे त्यांनी असे प्रश्न हाताळणे गरजेचे असल्याचे स्पष्ट मत नोंदविले होते. प्रत्येक चांगली गोष्ट जी समाजाने साध्य करण्यासाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे ती गोष्ट साध्य करण्यासाठी न्यायालयीन साधनांचा वापर करण्याची प्रवृत्ती व कल जनहित याचिकाकर्त्यांनी गृहीत धरले आहे अशी नोंद केली होती. न्यायालयीन प्रकिया ही संविधानिक अथवा कायदेशीर बाबींचे उल्लंघन याकरिता उपाययोजना पुरविते हे स्पष्ट केले होते. जनहित याचिकेत याचिकाकर्त्याचे स्वहित बाधीत होणे आवश्यक असणे हा नियम शिथिल करण्यात येतो, परंतु न्यायालयाने न्यायालयीन अधिकारीतेचा वापर करताना आवश्यक अशा घटकांचे पालन करणे न्यायालयावर बंधनकारक असल्याचे स्पष्ट मत नोंदविले होते. म्हणूनच ज्यावेळी राज्य व्यवस्थेविषयीचे प्रश्न अथवा वाद न्यायालयासमोर मांडले जातात त्यावेळी असे वाद कायदे किंवा संविधानातील चौकटीत मांडून न्यायालयीन अधिकार कक्षेत सोडविता अथवा निवारण करता येतील का या मूलभूत कसोटीचा कस लागला पाहिजेत हे स्पष्ट केले होते. धोरणात्मक बाबीं ह्या राज्याच्या कार्यकारी मंडळाच्या हाती सोपविल्या आहेत असे स्पष्ट मत नोंदविले होते. न्यायालय हे कायद्याचे नियम यांचे परिरक्षण करते असे मत नोंदविले होते. प्रस्तुत याचिका ही न्यायालयीन समीक्षा अथवा पुनरावलोकन कक्षेच्या बाहेर असल्याचे एक उदाहरण होते. जी मुले इयत्ता पहिली ते बारावी या कक्षेत शिकत आहेत त्यांना नैतिक शास्त्र ह्या एका वेगळ्या विषयाचे ओझे लादावे हे न्यायालय ठरवू शकत नव्हते. नैतिक शास्त्र हा एक वेगळा विषय असणारी मूल्यावर आधारीत शिक्षण व्यवस्था अगदी योग्यपणे उपयोगी पडेल काय? किंवा मूल्यावर आधारीत शिक्षण असा विहीत अभ्यासक्रम संपूर्णपणे संर्वांगाने विचार करणे ह्या बाबीं न्यायालयीन समिक्षा अथवा पुनराविलोकन करण्याचे कायम केलेले नियम यांस अनुसरून सोडविता येत नव्हते. ह्या अशा बाबीं संविधानाच्या अनुच्छेद ३२ खालील न्यायालयीन अधिकार कक्षेचा वापर करून सोडविता येत नव्हत्या. नैतिकतेचा युक्तीवाद लक्ष वेधणारा असून संस्कृतीचा ऱ्हास होत आहे ही शोकांतिका आहे असे मत नोंदविले होते. सदाचरण एकत्र करून मूल्यांची पुनर्व्याख्या करणे समाजाच्या इच्छेकरिता गरजेचे आहे याकरिता याचिकाकर्त्यानी युक्तिवाद केला होता. सध्याच्या परिस्थितीतील गुंतागुंत यातील धागेदोरे विस्कटणे ही असमर्थतता असून हा सक्तीचा युक्तीवाद स्वीकारणे न्यायालयास अवघड होते. नैतिकता महत्त्वाची असून समाजाने पाठपुरावा करून मिळविणे व हव्या असणाऱ्या अनेक सामाजिक मूल्यांपैकी एक आहे असे मत नोंदविले होते. लोकशाही समाजात मुलांच्या

शिक्षणात समान महत्त्व असणारी अनेक इतर मूल्ये समाजाला हवी असून त्यापैकी अनेकत्व स्वीकारणे आणि कल्पना, प्रतिमा व विश्वास यातील विविधता या जागतिक स्थरावर असलेल्या समस्येला तोंड देणे दुर्दैवी आहे असे मत नोंदविले होते. त्याचबरोबर ज्या व्यक्ती आपला पूर्णपणे भिन्न दृष्टीकोन बाळगतात त्यांच्याशी सहिष्णूता वाढविणे, ज्या व्यक्ती आर्थिक व भोवतालचे सामाजिक वातावणाच्या मुख्य प्रवाहाबाहेर फेकले जातात त्यांना सहानुभूती देणे, एका अर्थाने दया दाखविणे आणि प्रत्येक मानवप्राण्यांत असलेल्या नैसर्गिक माणुसकीची सत्यता जाणणे ह्या बाबीं तितक्याच महत्त्वाच्या व गरजेच्या असल्याचे स्पष्ट केले होते. पूर्वग्रह, द्वेष आणि भेदभाव यांचे लोकांवर होणारे भीतीजनक परिणाम व समाजाला भेडसावणाऱ्या या जागतिक समस्येची जाणीव मूल्यांवर आधारीत शिक्षणाने तरुणांना होणे आवश्यक आहे असे मत नोंदविले होते. भौतिकवादाच्या मार्गात बदल यास कमी लेखणाऱ्यांकरिता नैतिकतेची व्याख्या करणे कदाचित एकतर्फी धोकादायक जोखीम ठरू शकत होते. त्याचबरोबर नैतिकता ही कल्पनाच विस्तृत व आकाराने मोठी आहे असे स्पष्ट केले होते. कायदेशीर चौकटीच्या पलीकडे जाणाऱ्या विवादीत परिमाणांचा समतोल रेखांकित करण्याकरिता न्यायालय तोडगा काढू शकते हे गृहीत धरणे न्यायालयाला अवास्तव होते. विचारधारा, सामाजिक सिद्धांत, धोरण आखणे आणि प्रयोग करणे या क्षेत्रात आडवा येणारा एका विशिष्ट बाबींवर तोडगा काढणे व शाळेच्या अभ्यासक्रमात विशिष्ट विषयाचा सुचनात्मक आराखडा याची अंमलबजावणीकरिता महादेश काढून नियंत्रित करणे न्यायालयास आकलन करणे अवघड होते. शाळेत विषय शिकवावा का? मूल्यांचा संच किंवा चौकशी व ज्ञानाची रेषा यांचा एक वेगळा विषय शिक्षण व्यवस्थेत समाविष्ट करता येईल का? सध्याच्या विषयास समांतर असलेले मूल्य संच यांचे एकीकरण करण्याने अपेक्षीत निष्पत्ती साधता येईल का? आधीच शाळेच्या अभ्यासक्रमाचे ओझे मुलांवर असताना वेगळा विषय लादणे इष्ट होईल का? या सर्व कडवट वादांना एकापेक्षा अनेक तोडगे योग्य वाटू शकतात, ह्याच कारणास्तव ज्याचेकडे शिक्षण व शैक्षणिक बाबींवर व्यवस्था पहाण्याची जबाबदारी आहे त्यांनी त्या बाबींचे निराकरण करण्यास आधार होता. प्रत्येक चांगली गोष्ट जी समाजाच्या कल्याणाची समजली जाते ती न्यायालयाच्या माध्यमातून बंधनकारक करता येत नव्हती किंवा जनहित याचिकाकर्ते जसे समजतात तसे प्रत्येक आजारावर न्यायालयीन प्रकिया हा उपाय नव्हता. या न्यायालयासमोरील सध्याच्या बाबी न्यायालयीन आटोपशीर मानकाचे दृष्टीने निराकरण करण्यास असमर्थ असल्याने कायदेशीर अथवा संविधानीक चौकटीत न्यायालयीन समीक्षा अथवा पुनराविलोकन करण्यास कोणताही आधार नव्हता.

**न्यायालयाचा अंतिम निर्णयः**

**न्यायालयासमोरील कोणत्याही घटनेत, न्यायालयाने केंद्रीय माध्यमिक शिक्षण बोर्डाने दाखल केलेले उत्तर व त्यास अधोरेखित करून भारत सरकारने केलेला अवलंब याचा सारासार व संक्षिप्त विचार केला होता. वादातील प्रश्नास पर्यायी दृष्टीकोन संबंधितांना मूल्यांवर आधारीत शिक्षण पुरविण्यास उपयोगी पडेल काय ही बाब न्यायालयास मूल्यमापन करता येण्याजोगी नव्हती. या कारणास्तव या रीट याचिकेत गुणवत्ता नव्हती. त्याप्रमाणे याचिका बाद केली जाईल असा निर्णय केला होता. त्याप्रमाणे खटला भरण्याचा व हस्तक्षेप अर्ज निकाली काढला होता.**

म्हणूनच दि. २२ जूलै २०१६ रोजी मा. सर्वोच्च्य न्यायालयाचे मा. मुख्य न्यायमूर्ती टी. एस. ठाकूर व मा. न्यायमूर्ती डॉ. डी. वाय. चंद्रचूड यांच्या खंडपीठाने सदर प्राधिलेख याचिका बाद केली होती.

(पृष्ठ क्र. ३० वर)

# तत्त्वज्ञान आणि आपण

*ज्ञानशास्त्र, तर्कशास्त्र, नीतीशास्त्र आणि सौंदर्यशास्त्र अशा चार शास्त्रांच्याद्वारे तत्त्वज्ञानाचा अभ्यास करता येतो हे या लेखामध्ये विशद करण्यात आले आहे - संपादक*

जगातील आद्य तत्त्वज्ञ सॉक्रेटिस याच्या स्मरणार्थ नोव्हेंबर महिन्यातील तिसरा गुरुवार संयुक्त राष्ट्र संघाने 'जागतिक तत्त्वज्ञान दिन' (World Philosophy Day) म्हणून घोषित केला आहे. संयुक्त राष्ट्र संघाच्या या कृतीमुळे किमान या दिवशी तरी तत्त्वज्ञानासारख्या गंभीर परंतु तरीही समाजाच्या दृष्टीने आवश्यक अशा विषयाच्या वर्तमान आणि भविष्याबद्दल साधकबाधक चर्चा राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय पातळीवर घडून येईल अशी अपेक्षा ठेवण्यास हरकत नाही.

मुळात तत्त्वज्ञान आणि समाज असा संबंध लक्षात घेतल्यास समाजाच्या दृष्टीने तत्त्वज्ञानाकडे कला आणि मानव्य विद्या (Humanities) शास्त्रांमध्ये अभ्यासला जाणारा एक गंभीर विषय, विचारवंत आणि समाजशास्त्रज्ञ यांच्यातील चर्चा व वाद यात उपयोगी पडणारी एक ज्ञानशाखा, आध्यात्मिक गुरू-संत यांच्या विवेचनात आधारभूत असणाऱ्या संकल्पनांचा स्रोत आणि सरतेशेवटी 'मी कोण?', 'जीव-जगत्-ईश्वर' अशा अगम्य आणि अनाकलनीय प्रश्नांचा वेध घेणारे शास्त्र या दृष्टीने तत्त्वज्ञानाकडे पाहिले जाते. या दृष्टिकोनातून पाहिल्यास यात थोडेफार तथ्य असले तरीही तत्त्वज्ञानाबद्दल अनेक भन्नाट समज-गैरसमज लोकांमध्ये असलेले दिसून येतात.

मुळात, तत्त्वज्ञान हे एक मूलभूत सामाजिक शास्त्र आणि आणि सामाजिक शास्त्र असल्याने 'मानवी वर्तनाचा अभ्यास' हा याचा अध्ययन विषय ठरतो. मानवी वर्तनाचे अमूर्त पातळीवर (Abstract) केलेले विश्लेषण आणि त्या अनुषंगाने मानवी वर्तनावर परिणाम घडवणाऱ्या निसर्ग, पर्यावरण, विज्ञान या घटकांचा यांच्या मुळाशी जाऊन केलेला अभ्यास म्हणजे तत्त्वज्ञान होय आणि यातूनच भारतीय परंपरेतील आध्यात्मिक तत्त्वज्ञान (स्वतःचा स्वतःकडे होणारा प्रवास, 'स्व' चा शोध) आणि पाश्चात्त्य परंपरेतील भौतिक तत्त्वज्ञान (माणूस आणि सभोवताल यांच्यातील संबंधाचे परीक्षण) अशा भिन्न परंपरा उदयास आल्या. पण या दोन्ही परंपरा विश्लेषणासाठी तत्त्वज्ञानाची विषयाच्या मुळाशी जाऊन प्रश्नांची उकल करण्याची समान पद्धत वापरतात हे महत्त्वाचे. त्यामुळे आध्यात्मिक काय किंवा भौतिक काय या दोन्हीपासून वेगळे असे 'तत्त्वज्ञान' म्हणून काही एक उरतेच.

तत्त्वज्ञानाचा इंग्रजी प्रतिशब्द 'फिलॉसॉफी' (Philosophy) हा Philo + sophia या मूळ लॅटिन शब्दांपासून बनलेला आहे. याचा अर्थ 'शहाणपण विषयीचे प्रेम, आकर्षण' असा होतो. म्हणजे तत्त्वज्ञानाचे अभ्यासक हे शहाणपणाचे प्रेमिक (Lovers of Wisdom) ठरतात आणि या प्रेमापोटीच ते मानवी जीवनातील मूलभूत प्रश्नांची उकल करण्याचा शिस्तबद्ध प्रयत्न करतात. किमान बुद्धिमत्ता असणारा प्रत्येक माणूस त्याच्यापरीने त्याला पडलेल्या प्रश्नांची सोडवणूक करण्याचा प्रयत्न करतो आणि म्हणूनच प्रत्येकाचे स्वतःचे असे जगण्याचे एक तत्त्वज्ञान असते आणि म्हणून प्रत्येक माणूस वेगळा वागतो, वेगळा विचार करतो. पण याच गोष्टी पुस्तकांच्या माध्यमातून किंवा शिक्षणाच्या माध्यमातून समोर येतात तेव्हा 'हे काहीतरी भयंकर आहे', 'मी नाही त्यातला' अशी प्रतिक्रिया देताना

लोक दिसतात तेव्हा हा विरोधाभास हास्यास्पद वाटल्यावाचून राहात नाही. तत्त्वज्ञान टाळता येत नाही, ते असतंच, ते विश्लेषणाचे शास्त्र आहे. तत्त्वज्ञान ही सर्व शास्त्रांची जननी आहे.

ज्ञानशास्त्र (Epistomology), तर्कशास्त्र (Logis), नीतीशास्त्र (Ethics) आणि सौंदर्यशास्त्र (Aesthetics) अशा चार शास्त्रांच्या द्वारे तत्त्वज्ञानाचा अभ्यास करता येतो. सामान्यतः आपल्याला तत्त्वज्ञानाची ओळख ही भारतीय तत्त्वज्ञान आणि पाश्चात्त्य तत्त्वज्ञान अशी असते आणि या दोन्हींबद्दल आपली काही ठरावीक साचेबद्ध मते असतात. भारतीय आणि पाश्चात्त्य तत्त्वज्ञान हे एकमेकांच्या विरोधात नाहीत की ते एकमेकांना पर्याय नाहीत. परंतु त्यांचा अभ्यास मात्र परस्परपूरक ठरू शकतो. भारतीय तत्त्वज्ञानाचा गाभा म्हणजे षड्दर्शने, प्रस्थानत्रयी आणि आर्षवाङ्मयापासून ते अगदी अलीकडच्या जे. कृष्णमूर्ती यांच्या पर्यंतच्या तत्त्वज्ञानांच्या योगदानाने बनलेला आहे. तर पाश्चात्त्य तत्त्वज्ञानाला सॉक्रेटिस, प्लेटो, ॲरिस्टॉटल्, देकार्त अशा महान तत्त्ववेत्त्यांची परंपरा लाभली आहे. प्रश्नाला प्रतिप्रश्न करण्याच्या चिकित्सक पद्धतीतून तत्त्वज्ञानाचा विकास होत जातो आणि मानवी ज्ञानात भरत पडते हे भारतीय आणि पाश्चात्त्य तत्त्वज्ञानातील समान सूत्र आहे. हे सूत्र समजून घेण्यासाठी आणि तत्त्वज्ञान म्हणजे काय हे समजून घेण्याची इच्छा असणाऱ्यांनी प्रा. श्रीनिवास व्ही. दीक्षित यांचे 'भारतीय तत्त्वज्ञान' आणि साने गुरुजी लिखित 'पाश्चात्य तत्त्वज्ञानाची कहाणी' ही दोन पुस्तके आवर्जून मुळातून वाचावीत.

जागतिकीकरणाने भारलेल्या माहिती तंत्रज्ञानाच्या आजच्या युगात कमी वेळात जास्त वेगाने प्रश्नांचे इन्स्टंट समाधान (solution) शोधण्याची प्रवृत्ती वाढीस लागली आहे. त्या उलट शांतपणे, संयमाने विचार करून प्रश्नांची सविस्तर उकल करण्याची तत्त्वज्ञानाची वेळखाऊ पद्धत मागे पडली हे ओघाने आलेच. परंतु तरीही, वेगाने बदलणाऱ्या सामाजाची मूलभूत चौकट शाबूत राखून किमान मूलभूत तत्त्वे चिरंतन राखण्याची नैतिक जबाबदारी शेवटी तत्त्वज्ञानावरच येऊन पडते आणि वेगवेगळ्या देशांतील, समूहातील समाजशास्त्रज्ञ, विचारवंत आणि पब्लिक इंटलेक्च्युअल्स (Public Intellectuals) ही जबाबदारी नेटाने पार पाडताना दिसतात.

भारतीय आणि पाश्चात्त्य नसणाऱ्या समाजात तत्त्वज्ञान या विषयाची स्वतःची अशी वैभवशाली परंपरा असताना देखील सामाजिक, शैक्षणिक अशा पातळ्यांवर या विषयाची पीछेहाट होताना दिसते आणि या विषयाबद्दलची सार्वत्रिक अवस्था भयंकर अस्वस्थ करून सोडते. सामाजिक जीवनात तत्त्वज्ञानाचे स्थान वादातीत आहे. याबद्दल कुणाचेही दुमत असू शकत नाही. परंतु शैक्षणिक पातळीवर तत्त्वज्ञानाचे स्थान नेमके कुठे आहे आणि ते कुठे असायला हवे हा मात्र कळीचा मुद्दा ठरतो. भारतीय शिक्षण पद्धतीकडे पाहिल्यास तत्त्वज्ञान हा विषय एकूण शिक्षणक्रमाशी फारकत घेत चालल्याचे दिसते. आणि या विषयाला Mass Appeal नाही असे तद्दन फुटकळ कारण त्यासाठी दिले जाते. कुठल्याही विषयाची उपयुक्तता जर त्या विषयाच्या भविष्यातील रोजगार क्षमतेवरून (Employability) ठरवायची असेल तर या निकषावर नैसर्गिक व सामाजिक शास्त्रातील अनेक विषय निकालात काढून बाद ठरवावे लागतील. पण असे करून आपण आपल्या शिक्षण धोरणाच्या दर्जाशी प्रामाणिक आहोत का? या प्रश्नाचा अंतर्मूख होऊन विचार करण्याची गरज आहे.

मुळात तत्त्वज्ञान म्हणजे मूठभर लोकांची मक्तेदारी असून तो अगम्य असा अनाकलनीय विषय आहे हा गैरसमज आधी काढून टाकायला हवा. प्रत्यक्षात तत्त्वज्ञान ही एक जीवनपद्धती कशी होईल हे पाहणे महत्त्वाचे

आहे. मूळ भारतीय विचार हा याच आधारावर बेतलेला होता आणि त्यातूनच वर्णाश्रम पद्धतीचा विकास आणि विस्तार झाला. म्हणूनच तत्त्वज्ञान ही एक जीवन पद्धती (Way of life) आहे हा विचार समाजात रुजवण्याची गरज आहे आणि तो विचार रुजवण्याची योग्य वेळ म्हणजे शालेय जीवनातच 'तत्त्वज्ञान' या विषयाचा अभ्यास होणे.

या पार्श्वभूमीवर पाहिल्यास, जे. कृष्णमूर्तींचे 'निसर्गशाळांचे' प्रतिमान अत्यंत आदर्श प्रतिमान आहे. या शाळेतील मुले निसर्गाच्या सान्निध्यात राहून अत्यंत आरोग्यदायी वातावरणात तत्त्वज्ञानात्मक (Philosophical) पद्धतीने अनेक नैसर्गिक आणि सामाजिक शास्त्रांचा अभ्यास करतात. बरोबरीनेच संगीत, खेळ इ. शास्त्रांचेही अध्ययन करून 'परिपूर्ण मानव' होण्याच्या दृष्टीने त्यांची जडणघडण होते. यात कुठेही तात्त्विक बडेजाव, काहीतरी वेगळे करण्याचा आव नसतो तर अत्यंत साधेपणाने व शांतपणे ही प्रक्रिया राबवली जाते. अशाच प्रकारचे शिक्षण देण्याचा प्रयत्न रवींद्रनाथांच्या शांतीनिकेतन आणि प्राचीन भारताच्या 'गुरूकुल' पद्धतीतून होत असे.

थोडक्यात, शिक्षण व्यवस्थेच्या दृष्टीने 'तत्त्वज्ञान' हा विषय टिकवून ठेवण्यासाठी व त्याचे गतवैभव पुन्हा प्राप्त करण्यासाठी तत्त्वज्ञानाला आपल्या रोजच्या जगण्याचा भाग बनवावे लागेल आणि हीच शिकवण येणाऱ्या पिढ्यांना देखील द्यावी लागेल. जागतिक तत्त्वज्ञानदिनाच्या निमित्ताने हे एवढे 'तत्त्वज्ञान' निर्माण झाले तरी पुरेसे होईल.

**– प्रा. अपर्णा कुलकर्णी**
सेंट झेवियर्स महाविद्यालय,
मुंबई–४०० ००१
भ्रमणध्वनी : ७७६८०२७६५८

●●●

(पृष्ठ क्र.२७ वरून... **नैतिक आणि आध्यात्मिक पाया**)

**<u>न्यायालयीन प्राधिलेख याचिकेचा थोडक्यात अंतिम सारांश खालीलप्रमाणे</u> :**

**''याचिकाकर्त्यांनी संविधानाच्या अनुच्छेद ३२ व ५१ (क) च्या अधिकार कक्षेत मूल्यावर आधारीत शिक्षणाकरिता जनहित याचिका सादर केली होती. शालेय अभ्यासक्रमांत नैतिकशास्त्र हा सक्तीचा विषय समाविष्ट करावा याकरिता याचिकाकर्त्यांनी महादेश मिळविण्याचा प्रत्यत्न केला होता. याचिकाकर्त्याची अशी तक्रार होती की, सध्याच्या शिक्षण व्यवस्थेत चांगल्या माणसाची जडणघडण करणे हा शिक्षणाचा मुख्य उद्देश ठसविला जात नाही. प्रत्येक चांगली गोष्ट जी समाजाच्या कल्याणाची समजली जाते. ती न्यायालयाच्या माध्यमातून बंधनकारक करता येत नव्हती. संविधानाच्या अनुच्छेद ३२ खालील न्यायालयाची अधिकारिता ही सर्व रोगांवर उपाय नसून नागरिकांच्या संविधानीक मूलभूत अधिकारास बाधा झाल्यास हक्क बजाविण्याकरिता उपाययोजना व प्रतिवाद असल्याचे स्पष्ट केले होते. अशा तक्रारीकरिता महादेश जारी करणे न्यायालयास शक्य नव्हते.''**

याचिकाकर्त्यांचा याचिका करण्याचा दृष्टीकोन मोजक्या शब्दांत असा की, नैतिक शास्त्र हा धर्मावर आधारीत असा विषय नाही. त्याऐवजी त्याच्याने धर्मांधता, अंधश्रद्धा व हिंसा दूर केली जाते. त्याहीपुढे सर्वांवर प्रेम करा, सर्वांची सेवा करा असे घोषीत होते. सध्याच्या पिढीत ह्या मूल्याची कमतरता आहे.

एक जबाबदार नागरिक किंवा मुलगा किंवा मुलगी होण्याकरिता मुलाला भावनिक, मनाने आणि शरीराने प्रशिक्षित केलेच पाहिजेत. लहानग्यांच्या डोळ्यांत परमार्थ निष्ठेचा किरण प्रकाशित होवो हेच एक आवाहन.

शब्दांकन व अनुवाद : **सदानंद वैजनाथ पाटील**
विधी पदवी–तिसरे वर्ष,
ठाणे नगरपालिका विधी महाविद्यालय, ठाणे

# परिसर वार्ता

**– संकलित**

## सौ. आनंदीबाई जोशी इंग्रजी प्राथमिक विभाग

शैक्षणिक वर्ष २०१६ मधील काही सणांविषयी व त्यांच्या अंतर्गत साजऱ्या झालेल्या विविध उपक्रमांची माहिती करून घेणारा हा लेख –

**नागपंचमी (५ ऑगस्ट २०१६) –** शिक्षकांनी नागांची माहिती देणारी चित्रफीत मुलांना दाखवली. ज्यूनियरच्या मुलांनी कागदाचे आणि चिकण मातीचे साप तयार केले. सिनियरच्या मुलांनी सापांची विविध चित्रे काढली. शिक्षकांनी नागाच्या प्रतिमेची पूजा केली. तो शेतकऱ्याचा मित्र कसा आहे याची माहिती दिली. मुलांना लाह्या, बत्तासे असा प्रसाद दिला गेला.

**स्वातंत्रदिन (१२ ऑगस्ट २०१६) –** देशाला स्वातंत्र मिळवून देणाऱ्या काही नेत्यांची ओळख शिक्षकांनी मुलांना करून दिली. झेंड्याचा मान का व कसा ठेवायचा याची माहिती दिली. या दिवशी मुलांनी विविध स्वातंत्र्य सैनिकांचे वेश परिधान करून आले होते. ज्युनिअरच्या मुलांनी झेंडा रंगवला व तो हातात घेऊन देशभक्तीपर गाणी गायली. सिनियरच्या मुलांनी भारताचा नकाशा झेंड्याचे रंग वापरून रंगवला. चणे, दाणे असा पौष्टिक खाऊ मुलांना दिला.

**रक्षाबंधन (१७ ऑगस्ट २०१६) –** अनेक नात्यांमधील एक नातं म्हणजे बहिण भावांचं. हेच नातं शाळेत वेगळ्या पद्धतीने साजरे केले गेले. शाळेच्या परिसरातील झाडांना राख्या बांधल्या. सगळ्या मुलींनी एकमेकांना राख्या बांधल्या. ज्युनियरच्या मुलांनी कागदाचे गोलाकार कागद वहीत चिकटवून त्याला सजावट करून त्याची राखी केली. सिनियरच्या मुलांनी विविध राखींची चित्रे काढली. नारळाची वडी मुलांना खाऊ दिली.

**गणेश चतुर्थी (२ सप्टेंबर २०१६) –** शाळेत गणपतीची मूर्ती आणली गेली. त्या मूर्तीची पूजा आरती केली गेली. पर्यावरणाची काळजी घेऊन गणेशोत्सव साजरा कसा केला जाऊ शकतो याची माहिती मुलांना देण्यात आली. सिनियरच्या मुलांनी चिकणमातीपासून गणपती तयार केले. तर ज्यूनियरच्या मुलांनी मोदक तयार केले. सुकामेव्याचा खाऊ मुलांना प्रसाद दिला. गणपतीच्या गोष्टींची चित्रफित व गाणी मुलांनी बघितली ऐकली.

**गांधी जयंती / लालबहादूर शास्त्री जयंती –** महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री या दोन्ही थोर नेत्यांची जयंती २ ऑक्टोबर रोजी असते. या दोन्ही नेत्यांविषयी थोडक्यात माहिती मुलांना शिक्षकांनी सांगितली.

**नवरात्र / दसरा – भोंडला – ३ ऑक्टो. ते १० ऑक्टो.–** आदिशक्तीच्या विविध रुपांच्या पूजनाचा हा काळ. नवरात्राचे नऊही दिवस आमची चिमणी बालके विविध रंगांचे कपडे घालून येत होती. देवीच्या विविध नावे, रूपे, देवीचे श्लोक, गाणी या सर्वांचा परिचय रोज मुलांना करून दिला गेला. या काळातच खेळाला जाणारा पारंपरिक 'भोंडला' शाळेत खेळला गेला. नानकटाईची खिरापत सर्वांना दिली गेली. 'दसरा' या सणाचे महत्त्व व हा सण का साजरा करतात याची माहिती शिक्षकांनी दिली. पाटीपूजन करून सर्वांनी सरस्वतीची प्रार्थना केली.

**दिवाळी (२५ ऑक्टोबर २०१६) –** दिव्यांचा, प्रकाशाचा तेजाचा सण. या वर्षी २५ ऑक्टोबरला दिवाळी शाळेत साजरी झाली. या अनुषंघाने व्हरांड्यात विविध तक्ते लावण्यात आले. मुलांनी रंगवलेल्या रांगोळ्या आकाशकंदील यांची तोरणे लावून सजावट केली गेली. वर्गात दिवे लावून दिवाळीची गाणी म्हटली. वसुबारसेपासून ते भाऊबीजेपर्यंत दिवाळीच्या प्रत्येक

दिवसाचे महत्त्व मुलांना सांगितले गेले. ज्यूनियरच्या मुलांनी दिवे, पणत्या यांची तर सिनियरच्या मुलांनी रांगोळीची चित्रे रंगवली. चकली व लाडूचा खाऊ मुलांना दिला. दिवाळीच्या शुभेच्छा देऊन पहिल्या सत्राची सांगता झाली.

## जोशी-बेडेकर महाविद्यालय

### प्रा. नारायण बारसे यांना आदर्श ग्रंथपाल पुरस्कार




विद्या प्रसारक मंडळाच्या जोशी बेडेकर महाविद्यालयाचे ग्रंथपाल आणि ग्रंथालय आणि माहितीशास्त्र विभागाचे समन्वयक प्रा. नारायण बारसे यांना प्रा. भास्करराव थोरात आदर्श ग्रंथपाल पुरस्कार नवी मुंबई येथे सामारंभपूर्वक प्रदान करण्यात आला. नवी मुंबई येथील प्रभात सेवाभावी संस्था आणि युवा प्रतिष्ठान याच्या संयक्त विद्यमाने आयोजित कार्यक्रमात ग्रंथालय आणि माहितीशास्त्रात ग्रंथपाल आणि प्राध्यापक म्हणून दिलेल्या महत्त्वपूर्ण योगदानाबद्दल हा पुरस्कार देण्यात आला. पस्तीस वर्ष ग्रंथालय सेवा दिलेले रयत शिक्षण संस्थेचे आजीव सभासद प्रा. भास्करराव थोरात यांच्या निधनानंतर त्यांचे चिरंजीव व नवी मुंबई येथील प्रसिद्ध नेत्रशल्यविशारद डॉ. प्रशांत थोरात यांनी सांगली जिल्ह्यातील त्यांच्या मूळ गावी प्रा. भास्करराव थोरात यांच्या स्मरणार्थ ग्रंथालयाची स्थापना केली आणि या वर्षीपासून महाराष्ट्रात ग्रंथापालन क्षेत्रात महत्त्वपूर्ण योगदान देणाऱ्या ग्रंथपालाला आदर्श ग्रंथपाल पुरस्कार देण्याचे घोषित केले. आदर्श ग्रंथपाल ठरवणाऱ्या समितीने प्रा. नारायण बारसे यांची पुरस्कारासाठी निवड केली. प्रा. नारायण बारसे यांनी ग्रंथपाल म्हणून दिलेल्या योगदानाबरोबरच ग्रंथालय आणि माहितीशास्त्रातील प्रमाणपत्र, पदवी, पदव्युत्तर स्तरावर प्राध्यापक म्हणून मुंबई विद्यापीठ, भारती विद्यापीठ, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ इत्यादी अभ्यासक्रमामध्ये केलेल्या योगदान विचारात घेऊन हा पुरस्कार देण्याचे घोषित केले. नवी मुंबईमध्ये पार पडलेल्या समारंभात माजी सनदी अधिकारी अविनाश धर्माधिकारी, व माजी खासदार डॉ. संजीव नाईक यांच्या हस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. पाच हजार रुपये आणि स्मृतिचिन्ह असे पुरस्काराचे स्वरूप होते, या प्रसंगी नवी मुंबईचे महापौर श्री. सुरेश सोनावणे, डॉ. प्रशांत थोरात, प्राचार्य प्रताप महाडिक, प्राचार्य प्रमोद पाब्रेकर त्याचबरोबर नवी मुंबईचे अनेक मान्यवर नगरसेवक उपस्थित होते. पुरस्कार मिळाल्याबद्दल प्रा. नारायण बारसे यांचे विद्या प्रसारक मंडळाचे कार्याध्यक्ष डॉ. विजय बेडेकर, प्राचार्या डॉ. शकुंतला सिंह यांनी अभिनंदन केले .

## बांदोडकर विज्ञान महाविद्यालय

### भारतीय संविधानाचा जागर



२६ नोव्हेंबर संविधान दिवसानिमित्त राष्ट्रीय सेवा योजना, राष्ट्रीय छात्र सेना, सांस्कृतिक मंडळ व जागर जाणिवांचा अभियान यांच्या संयुक्त आयोजनात एका

प्रभात फेरीचे आयोजन करण्यात आले. महाविद्यालय परिसर व पटांगणात आयोजित करण्यात आलेल्या या प्रभात फेरीत सकाळी ८ वाजता विद्यार्थ्यांनी उदंड प्रतिसाद दिला.

भारतीय संविधान हे जगातील सर्वात उत्कृष्ट संविधान आहे व धर्मनिरपेक्ष आणि सार्वभौम राज्यासाठी संविधानाची बांधिलकी जपली तर महासत्तेबरोबरच आपण व्यक्तिमत्त्वही घडवू शकतो हा संदर्भ ठेऊन प्रभातफेरी नंतर पतंजली सभागृहात "Self Development Life Skill With The Indian Constitution" या वेगळ्या विषयावरील व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. प्रसिद्ध मानसशास्त्रज्ञ व समुपदेशक प्रा. निलेश मंडलेचा यांनी प्रमुख वक्ते म्हणून यावर प्रकाश टाकला.

व्याख्यानाच्या उद्घाटनाच्या सत्रात महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. माधुरी पेजावर यांनी भारतीय राज्यघटनेतील मूलभूत कर्तव्यांची ओळख करून देताना त्यातील महत्त्वाच्या पैलूंचा व्यवहारातील अर्थ उदाहरणे देऊन विद्यार्थ्यांना समजावून सांगितला.

या कार्यक्रमाला २५० विद्यार्थ्यांनी उपस्थिती दर्शविली.

**'सामाजिक बांधिलकीतून दिवाळीनिमित्त 'वयम'ला अनोखी भेट.'**



विद्या प्रसारक मंडळ हे विद्या प्रसाराबरोबर सामाजिक बांधिलकी असलेला व विवेकी विचारवंत असणारा विद्यार्थी घडविण्याचे काम करते. सामाजिक जाणीव असलेले नागरिक घडविणे हेच संस्थेचे ध्येय असून तसाच ते आजतागायत प्रयत्न करीत आहे.

महाविद्यालयाने आपले वैज्ञानिक संशोधनातील प्रावीण्य सिद्ध केलेच आहे त्याबरोबरच विद्यार्थ्यांमध्ये एक वैचारिक परिवर्तन घडवून आणून सामाजिक क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या 'वयम' या संस्थेला दिवाळी निमित्त एक अनोखी भेट दिली. एका दिवसात विद्यार्थी व शिक्षकांनी ७०० कपडे जमा करून या योजनेस उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

बांदोडकर महाविद्यालयातील अकरावीपासून ते पदवी महाविद्यालयातील विद्यार्थी व महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. माधुरी पेजावर यांच्या मार्गदर्शनाखाली आणि सांस्कृतिक विभागप्रमुख प्रा. प्रकाश माळी, प्रा. अनिल आठवले, प्रा. दर्शना चव्हाण, प्रा. विनोद थोरात, प्रा. बिपिन धुमाळे, प्रा. रोहिणी डोंबे तसेच शिक्षकेतर सहकारी जितेंद्र खैरनार, किरण मोरे, चंद्रकांत धुमाळ यांनी विद्यार्थ्यांनी आणलेल्या कपड्यांचे वर्गीकरण करून त्यातील शर्टस, पॅन्टस, साड्या, कुर्ता, पायजमा इ. कपडे वेगळे केले व हे ७०० पेक्षा जास्त जमा झालेल्या कपड्यांची अनोखी भेट 'वयम' या संस्थेकडे सुपूर्द केली. या सारख्या उपक्रमांतून आपल्याकडील असलेल्या जास्तीच्या वस्तू आपण इतरांना देऊन त्यांच्या गरजा भागवू शकतो व देण्यातील आनंद उपभोगू शकतो असा संदेश यामधून विद्यार्थ्यांना दिला गेला व ही दिवाळी विद्यार्थ्यांनी अशा नावीन्यपूर्ण रीतीने साजरी केली आणि यापुढेही हा उपक्रम असाच अविरतपणे चालू ठेवण्याचा मानस विद्यार्थ्यांनी व्यक्त केला.

**College For Potential Excellence दर्जा बहाल**

महाविद्यालय गेली ३७ वर्षे विज्ञान विषयाशी संबंधित महाविद्यालय म्हणून सर्वांना परिचित आहे.

या महाविद्यालयास विद्यापीठ अनुदान आयोगातर्फे College For Potential Excellence हा दर्जा ०१.०४.२०१६ ते ३१.०३.२०२१ या कालावधीकरता प्रदान करण्यात आला आहे. याबरोबरच १.५ कोटीचे अनुदान प्रयोगशाळा सुधारणा, ग्रंथालय संगणकीकरण, पुस्तक खरेदी, कौशल्य विकास, लँग्वेज लॅब, इंटरनेट इत्यादी सुविधांकरिता मंजुर करण्यात आले आहे.

आजवर महाविद्यालयाने अनेक पुरस्कार व विशेष अनुदान मुंबई विद्यापीठाचा उत्कृष्ट महाविद्यालय २००९-१०, रामकृष्ण बजाज संस्थेतर्फे Commendation Certificate, नॅक या राष्ट्रीय दर्जाच्या संस्थेतर्फे सतत दोन वेळा 'अ' दर्जा, केंद्राच्या विज्ञान व तंत्रज्ञान विभागातर्फे १ कोटीचे अनुदान त्याचबरोबर स्टार कॉलेज स्कीमअंतर्गत महाविद्यालयाची निवड असे टप्पे आजवर पार केले आहेत.

या महाविद्यालयातर्फे सदैव नावीन्य शैक्षणिक कार्यक्रम, विषयाशी संबंधित कार्यशाळा व परिषद अद्ययावत प्रयोगशाळा, संदर्भ ग्रंथानी सुसज्ज ग्रंथालय, सुविद्य प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी, आजी व माजी विद्यार्थी आणि विद्या प्रसारक मंडळाचा पाठिंबा हे सर्व महाविद्यालयाच्या विकासात मोलाची भूमिका बजावत आहेत.

आजवर महाविद्यालयाने केलेल्या परिश्रमाची पावती म्हणजेच UGC च्या CPE करता महाविद्यालयाची निवड होणे हे आहे.

**नेहा फाटक हीचे FACE OF GLOBE 2016 मधील सौंदर्यस्पर्धेतील यश**

महाविद्यालयाने विज्ञान क्षेत्रातील उत्कृष्ट महाविद्यालय असा आपला ठसा उमठवला आहे.

या महाविद्यालयाने आजवर अनेक चांगले विद्यार्थी, शिक्षक, प्राध्यापक, अधिष्ठाता, संशोधक, कुलगुरू समाजात घडवले आहेत.

महाविद्यालया करिता अजून एक गौरवाची बाब म्हणजे याच महाविद्यालयाची एक माजी विद्यार्थिनी नेहा फाटक हिने **Face Of Globe India 2016** हा आंतरराष्ट्रीय स्तरावरील सौंदर्य स्पर्धेचा किताब पटकविला आहे. तसेच **Face Of The Globe 2016** या जागतिक पातळीवर सौंदर्यस्पर्धेत तिची निवड झाली आहे.

ही सौंदर्यस्पर्धा डिस्ने हॉटेल, न्यू यॉर्क, डिस्ने लँड, पॅरिस येथे पार पडली. यावेळी जगभरातील १०६ सौंदर्यवतींनी विविध देशांचे प्रतिनिधित्व केले व या स्पर्धेच्या पहिल्या फेरीचे नेतृत्व नेहा फाटक हिने केले.

तिला उत्कृष्ट Cat Walk याकरता मुकुट प्रदान करण्यात आला तर सर्वोत्कृष्ट प्रेषकांच्या पसंतीस उतरलेल्या सौंदर्यवतींमध्ये तिने सातवे स्थान प्राप्त केले आहे.

नेहाच्या या यशाबद्दल सर्वच स्तरांतून तिचे कौतुक होत आहे.

**'आकांक्षा' महोत्सव जाणीवपूर्वक आवाजाच्या मर्यादेत.**

डिसेंबर महिना म्हणजे स्नेहसंमेलने, जल्लोष व तारूण्याचा सळसळता कालाविष्कार सादर होण्याचा काळ. यावेळी आपला 'आवाज' बुलंद असावा असे प्रत्येकाला वाटत असते, परंतु ठाण्याच्या गजबजलेल्या मध्यवर्ती परिसरात आपल्या नवनवीन विज्ञान संशोधनातील 'Excellency' करीत व तिसऱ्यांदा नॅकची 'अ' श्रेणी कायम राखीत आणि आपले मराठमोळे अस्तित्वही जोपासत असतांना समांतरपणे सामाजिक जाणीवेचे भान ठेवून ध्वनी प्रदूषण विरहीत वातावरणात वार्षिक स्नेहसंमेलन उत्कृष्टपणे करता येते याचा एक नवा आदर्श घालून देत गेल्या वर्षापासून विद्या प्रसारक मंडळाचे बा.ना.बांदोडकर विज्ञान महाविद्यालय आपला वेगळा ठसा उमटवीत आहे.

विद्या प्रसारक मंडळाचे कार्याध्यक्ष डॉ. विजय बेडेकर

माणसाचे प्रेम हे धरती सारखे असते. अगोदर एक दाणा पेरावा लागतो.

व बांदोडकर विज्ञान महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. माधुरी पेजावर यांच्या मार्गदर्शनातून व विचारांतून यावर्षीसुद्धा विद्यार्थी परिषदेच्या (Student council) बैठकीत सर्वानुमते असा निर्णय घेण्यात आला की निकोप पर्यावरणासाठी व सर्वांच्याच मानसिक स्वास्थ्यासाठी महोत्सवामधील आवाजाची पातळी ४५ ते ७५ डेसिबल्स च्या मर्यादेपलीकडे जाऊ द्यायची नाही. त्याकरिता पर्यावरणशास्त्र विषयांचे विद्यार्थी प्रतिनिधी व शिक्षक कार्यक्रमांत डेसिबल मीटर लावून त्याची दक्षता घेतील आणि सर्व विद्यार्थ्यांनी हा विचार मनोमनी सजवत तो अमलात आणला. कारण ८५ डेसिबल्स पेक्षा जास्त आवाजाची पातळी आपल्या मानसिक आरोग्यासाठी घातक ठरू शकते. त्यामुळे जाणीवपूर्वक आवाजाची पातळी मर्यादेत ठेवून आपण आपला कलाविष्कार सादर करू शकतो. हा नवा आदर्श बांदोडकर महाविद्यालयाने घालून दिला आहे.

'आकांक्षा' महोत्सव हा प्रत्येक वर्षी एक नवीन विषयावर (Theme) वर आधारित असतो. यावर्षीचा विषय (Theme) आहे ''Shades of India' (अतुल्य भारत) व याची तयारी ही सांस्कृतिक मंडळाकडून पर्यावरणाची दक्षता घेत होत आहे. भित्तीपत्रके, मोठी होर्डिंग्स व सूचना फलकही विद्यार्थ्यांनी स्वहस्ते आणि थर्माकोलचा वापर न करता प्लॅस्टिकविरहीत व जुनी वर्तमानपत्रे व तत्सम टाकावू वस्तूंपासून बनवून महाविद्यालय परिसर सुशोभित केला आहे. यामध्ये गायन स्पर्धेपासून फॅशन शो पर्यंत सर्व स्पर्धा होणार असल्या तरी Theme Line ला धरून असणार आहेत हे एक वैशिष्ठ्य आजपर्यंत बांदोडकर महाविद्यालयाने जपले आहे. असे मत यावेळी सांस्कृतिक समन्वयक प्रा.प्रकाश माळी यांनी व्यक्त केले.

पर्यावरणाचे संवर्धन केले पाहिजे असा नुसता संदेश न देता बांदोडकर महाविद्यालयातर्फे पर्यावरणाभिमुख उपक्रम जसे Bio composting , Worm composting, ग्रंथालय प्रकल्प, butterfly Garden असे अनेक नवीन प्रकल्प राबविण्यात येतात. सामाजिक बांधिलकीचा संदेश मुलांपर्यंत पोहचविण्यात बांदोडकर महाविद्यालय यशस्वी झाले आहे. तसेच विद्यार्थ्यांमध्ये जैव विविधतेबद्दल जागरूकता निर्माण व्हावी व कॅम्पसमधील झाडांची शास्त्रीय नावे, त्यांची व्यवहारातील नावे व वैद्यकीय उपयोग याची माहिती पोस्टर्सद्वारे प्रत्येक झाडांची सर्वेक्षणाद्वारे नोंद घेण्यात आली आहे. असा हा पर्यावरण प्रेमी कॉलेज कॅम्पस सर्व विद्यार्थी वर्गाला खुणावत असतो.

**अभिनंदन**



सूक्ष्मजीवशास्त्र विभागातील सौ.जयश्री पवार, सहाय्यक प्राध्यापक यांना मुंबई विद्यापीठातर्फे विद्या वाचस्पती (Ph.D.) पदवी प्रदान करण्यात आली.

सौ. पवार यांनी डॉ. डी. व्ही. कामत विभागप्रमुख, सूक्ष्मजीवशास्त्र विभाग, मिठाबाई महाविद्यालय यांच्या मार्गदर्शनाखाली "Studies on Molecular Analysis of Micro Organisms involved in degradation of Industrial Waste" या विषयावर आपला प्रबंध सादर केला.

**विद्या प्रसारक मंडळाचे**
**ठाणे नगरपालिका विधी महाविद्यालय**

**१. फ्रेशर वक्तृत्व व वादविवाद स्पर्धा :**

दिनांक ५/११/२०१६ रोजी प्रथम विधी विद्यार्थ्यांसाठी वक्तृत्व व वादविवाद स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेसाठी ॲड. मनोज भट आणि ॲड. रुपाली हे परीक्षक म्हणून हजर होते. सदर स्पर्धेमध्ये एकूण ३५ विद्यार्थ्यांनी भाग घेतला.

**वक्तृत्व स्पर्धेचे विजेते**

१) पलक गुप्ता  २) सारा कुरेशी

सुखी होण्यासाठी सुखी होण्याचा मार्ग म्हणजे निसर्गावर, नियतीवर, परमेश्वरावर कोणावर तरी विश्वास ठेवा!

३) ग्रीष्मा मेनन ४) श्रेया कुलकर्णी

**वादविवाद स्पर्धेचे विजेते**

१) मनिष भोजवानी २) रवी भावनानी

३) पलक गुप्ता

२) प्रथम विधी विद्यार्थ्यांनी नुकतीच डिबेट क्लबची स्थापना केली. प्राचार्या श्रीविद्या जयकुमार यांच्या मार्गदर्शनाखाली सदर क्लबची स्थापना झाली असून या माध्यमातून विविध वक्तृत्व व वादविवाद स्पर्धेचे आयोजन करण्यात येणार आहे. या क्लबचे सदस्य खालीलप्रमाणे आहेत.

१) पलक गुप्ता २) मनिष भोजवानी

३) गौरव मिश्रा ४) अशोक गरजे

५) देवेन तांडेल ६) बालाजी नारायण

७) प्रज्ञा सनस ८) प्रशांत भनसोडे

या क्लबच्या माध्यमातून दिनांक २६/११/२०१६ रोजी 'नोटबंदी समाज नागरी कायदा' या विषयावर वादविवाद स्पर्धा तर 'इंग्लिशचे महत्त्व' या विषयावर वक्तृत्व स्पर्धा ठेवण्यात आली होती. सदर स्पर्धेमध्ये जवळपास ३५ विद्यार्थ्यांनी भाग घेतला होता. ॲड. प्रीती गोपू नायर आणि ॲड. रुपाली हे परीक्षक म्हणून होते. या स्पर्धेचे विजेते खालील प्रमाणे आहे –

**वादविवाद**

**मराठी :**

१) भावेश बी. आर. २) अविनाश माने

३) अजय पै

**इंग्लिश :**

१) मनिष भाववानी २) अमित यादव

३) राज भट

**वक्तृत्व :**

१) पलक गुप्ता २) लेखा ३) ग्रीष्मा मेनन

**संविधान दिवस :**

दिनांक २६ नोव्हेंबर २०१६ रोजी महाविद्यालयामध्ये संविधान दिवस साजरा करण्यात आला. यावेळी दुपारी ३.३० ते ५.३० या दरम्यान ॲड. मनोज भट यांनी 'ड्राफ्टींग ऑफ रिट' या विषयावर व्याख्यान दिले. तसेच प्रभारी प्राचार्या श्रीविद्या जयकुमार यांनी 'संविधानाचे मूलभूत तत्त्व' या विषयावर व्याख्यान दिले. त्यानंतर संविधानाची प्रास्ताविका व शासनाने दिलेली प्रतिज्ञेचे वाचन करण्यात आले.

४) दिनांक २३/११/२०१६ रोजी प्रथम विधीच्या विद्यार्थ्यांसाठी तपासणी व उलट तपासणी या विषयावरील प्रात्यक्षिक करून दाखवण्यात आले. यावेळी ॲड. शेख यांनी अधिवक्ता म्हणून तर प्रभारी प्राचार्या श्रीविद्या जयकुमार यांची साक्षीदार म्हणून तपासणी व उलट तपासणी घेतली. यावेळेस विद्यार्थ्यांच्या शंकांचे निरासन करण्यात आले.

५) दिनांक ९ नोव्हेंबर २०१६ रोजी तृतीय वर्षाची विद्यार्थिनी अर्चना कदम व अंकिता मुखर्जी यांनी प्रथम विधीच्या विद्यार्थ्यांसाठी मुटकोट सादर करून दाखवले. यावेळेस ॲड. पायल व ॲड. जालीसादगी यांनी परीक्षक म्हणून मार्गदर्शन केले.

६) दिनांक १०/११/२०१६ रोजी महाविद्यालयातील प्रथम विधी प्रवेश प्रक्रिया पूर्णपणे संपुष्टात आली. महाविद्यालयातील सर्व जागा यशस्वीपणे भरण्यात आल्या.

७) मुंबई विद्यापीठाच्या सत्र ३ व ५ याच्या परीक्षा महाविद्यालयात सुरू असून त्याचप्रमाणे पेपर तपासणी देखील सुरू झाली आहे.

---

मानवी संबंध धावणाऱ्या आगगाडीच्या वेळापत्रकाप्रमाणे नसतात...
ते असतात औदुंबराच्या आडव्यातिडव्या पायवाटांसारखे.

## डॉ. वा. ना. बेडेकर व्यवस्थापन अभ्यास संस्था, ठाणे

**डॉ. व्ही. एन. बेडेकर इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेण्ट स्टडीज (BRIMS) येथे नॉलेज म्युझिअमचे / संग्रहालयाचे उदघाटन**



''ज्ञान ही अशी एक शक्ती आहे जी वाटल्याने, इतरांना दिल्याने द्विगुणित होते'' आणि म्हणूनच डॉ. व्ही. एन. बेडेकर इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेण्ट स्टडीजच्या विद्यार्थ्यांनी, सहा. प्रा. कृणाल पुंजाणी यांच्या मार्गदर्शन खाली Independence To Invigoration. या विषय सूत्रावर आधारित एक (Knowledge Museum) 'ज्ञान संग्रहालय' तयार केले आहे.

दिनांक ०३ डिसेंबर २०१६ रोजी महाराष्ट्र आर्थिक विकास मंडळाच्या संशोधन आणि प्रशिक्षण विभागाचे संचालक प्रा. बी. एन. लाड यांच्या हस्ते या संग्रहालयाचे उदघाटन करण्यात आले.

या नॉलेज म्युझियम/ संग्रहालयामध्ये प्रामुख्याने भारताला स्वातंत्र्य मिळाल्यापासून (१९४७ ते २०१६) भारताच्या दृष्टीने महत्त्वाच्या टप्प्यांना/ घटनांना प्रदर्शित करण्यात आले आहे. या संग्रहालयामध्ये एकूण १३५ महत्त्वाच्या टप्प्यानां ८ विविध पोस्टरमध्ये प्रदर्शित केले असून या सर्व प्रदर्शनाला अधिक उठावदार होण्यासाठी आमच्या विद्यार्थ्यांनी प्रत्येक दशकासाठी एक ध्वनी - चित्रफीत देखील तयार केली आहे.

या नावीन्यपूर्ण संग्रहालयाचा मुख्य उद्देश भारताच्या विकासातील विविध क्षेत्रातील उल्लेखनीय नेत्यांच्या योगदानाची ओळख भावी पिढीला करून देणे, तसेच या ज्ञानाच्या खजिन्यातून प्रेरणा घेऊन भावी पिढीनेही भारताच्या विकासासाठी योगदान द्यावे हा असून त्यासाठी ७ दशकातील उल्लेखनीय अशा टप्प्यांची माहिती येथे देण्यात आली आहे.

यामध्ये औद्योगिक सुधारणा त्या संबंधित कायदे, विविध सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम, आर्थिक आणि बँकिंग सुधारणा, खासगी क्षेत्रातील अव्वल कंपन्या, इस्रोचे काही मुख्य यशस्वी उपक्रम तसेच कायदा, शिक्षण, बँकिंग, आयटी, विमा, पॉवर, पेट्रोलियम, शेअर बाजार क्षेत्रातील संस्थांची स्थापना, बदल आणि विकास इत्यादींचा समावेश आहे.

संग्रहालयाच्या ह्या प्रकल्पासाठी BRIMS संस्थेचे संचालक डॉ. नितीन जोशी, यांचे नेतृत्व आणि सहकार्य तसेच सर संचालक डॉ. गुरुप्रसाद मूर्ती आणि प्रा. डॉ. सुधाकर आगरकर यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.

**ब्रीम्स्चे (DR VN BRIMS) माजी विद्यार्थी संमेलन २०१६**



वि. प्र. म. च्या डॉ. व्ही. एन. बेडेकर इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज तर्फे दिनांक ३ डिसेंबर २०१६ रोजी सायंकाळी संस्थेच्या माजी विद्यार्थ्यांसाठी वार्षिक स्नेह संमेलनाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाला माजी विद्यार्थ्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती सर्वांनाच आनंदित करणारी ठरली. बऱ्याच वर्षांनी पुन्हा महाविद्यालयात आल्याने सर्वांच्या जुन्या आठवणीं ताज्या झाल्या. माजी विद्यार्थी संमेलन ही विद्यार्थी आणि शिक्षकांसाठी नेहमीच मनामध्ये जपलेल्या जुन्या

स्मृतींना उजाळा देण्याची एक छान संधी असते. आनंदाची बाब म्हणजे महाविद्यालयाच्या पूर्णवेळ प्राध्यापकांबरोबरच अर्धवेळ तसेच व्हिजिटिंग / नेमित्तिक प्राध्यापक देखील कार्यक्रमाला हजर होते.

या समारंभात सांस्कृतिक कार्यक्रम, मनोरंजनाचे कार्यक्रम, खेळ या बरोबरच यावर्षी "Alumni Dil Se" या नवीन सदरात एक कार्यक्रम आयोजित केला गेला यामध्ये माजी विद्यार्थ्यांनी त्यांच्या महाविद्यालयीन तसेच व्यावसायिक कारकिर्दीतील अनुभव, आख्यायिका, आठवणीचे कथन केले. ब्रीम्स्चे संचालक डॉ. नितीन जोशी यांनी ब्रीम्सची एक माजी विद्यार्थी संघटना स्थापन करण्यासंबंधी व अशा संघटनेतर्फे विद्यार्थी आणि महाविद्यालय दोघांसाठी अधिक अर्थपूर्ण ठरेल, असे विद्यार्थी संमेलन आयोजित करण्या संबंधी सर्वांशी चर्चा केली. अशा प्रकारची संमेलने आपले माजी विद्यार्थ्यांचे ऋणानुबंध अधिक मजबूत करण्यासाठी सार्थक ठरतील असे मनोगत प्राध्यापिका सौ. सुखदा तांबे यांनी या वेळी व्यक्त केले. तसेच माजी विद्यार्थी संघटना नेमकी कशी असावी या विषयावर अनेक दृष्टीकोनातून विचार मंथन झाले.

या वर्षीच्या संमेलनाला ब्रीम्स्चे माजी संस्थापकीय संचालक डॉ. गुरुप्रसाद मूर्ती व प्रा. बी. एन. लाड यांची देखील सन्माननीय उपस्थिती लाभली.

ब्रीम्स्चे माजी विद्यार्थी आपापल्या वैयक्तिक, सामाजिक आणि व्यावसायिक कारकिर्दीत चांगली प्रगती करत आहेत याचा ब्रीम्सला अभिमान आहे.

एकंदरीतच हे संमेलन सर्वांसाठी संस्मरणीय अनुभव देणारे ठरले.

**उद्योग संस्था आणि शैक्षणिक संस्था यांना एकत्र आणण्यासाठी एक पाऊल पुढे**

**ब्रीम्स च्या विद्यार्थ्यांची Kokuyo Camlin आणि JSW Steel उद्योग संस्थांना भेट**

डॉ. व्ही .एन. बेडेकर इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेण्ट स्टडीज (BRIMS) तर्फे दिनांक १७ डिसेम्बर २०१६ रोजी तारापूर येथे विद्यार्थ्यांसाठी औद्योगिक क्षेत्राची एक शैक्षणिक सहल आयोजित करण्यात आली. डॉ. नितीन जोशी (संचालक, BRIMS) हे नेहमीच प्रात्यक्षिक शिक्षणामधून शिकण्यासाठी विद्यार्थी आणि शिक्षकांना प्रोत्साहित करत असतात आणि या विचारातूनच वस्तुनिर्माण उद्योग संस्थांचे कामकाज कसे चालते याचे प्रात्यक्षिक दाखवण्याच्या उद्देशाने तसेच उद्योगसंस्थांच्या नव्या पिढीकडून काय अपेक्षा असतात हे जाणून घेण्याच्या हेतूने ब्रीम्सच्या प्राध्यापिका विभूती एस.आणि कांचन ए. यांनी या क्षेत्र भेटीची आखणी केली होती.



औद्योगिक क्षेत्र भेटीच्या सुरुवातीला Kokuyo Camlin Ltd या उद्योग संस्थेचे ज्येष्ठ मानव संसाधन अधिकारी अजित राणे यांनी कंपनीची मानव संसाधन विषयक धोरणे, Camlin आणि Kokuyo या दोन कंपन्यांच्या विलीनीकरणानंतर झालेले बदल, व्यावसायीक सामाजिक जबाबदारी संबंधी कंपनीचा पुढाकार, आणि त्याच्या दृष्टीने खूप महत्त्व असणाऱ्या अशा गोष्टी म्हणजे कर्मचाऱ्यांचे समाधान आणि प्रतिबद्धता या संबंधीचे उपक्रम या विषयी विद्यार्थ्यांना थोडक्यात स्पष्टीकरण दिले. वस्तू निर्माण विभागातील प्रतिनिधींनी विद्यार्थ्यांना कंपनीचे विविध प्रक्रिया विभाग प्रत्यक्ष दाखविले जसे कच्च्या मालावरील संशोधन आणि विकास प्रक्रिया विभाग, रंगांचे मिश्रण, रंगाच्या बाटल्यांमध्ये रंग भरणे, लेबल लावणे, तसेच क्रेऑन, ऑइल पेस्टल, ऍक्रिलिक,

फॅब्रिक इत्यादी रंगाची निर्मिती प्रक्रिया विभाग प्रत्यक्ष दाखवून माहिती दिली. नेहमीच्या वापरातील शिस पेन्सील तयार करण्याची इतकी व्यापक प्रक्रिया पाहून तर विद्यार्थी आश्चर्यचकीतच झाले. एरवी वर्गात अभ्यासक्रमात असलेली औद्योगिक संबंध धोरणे (Industrial relation Policies) विद्यार्थ्यांना येथे व्यापकपणे उमजली.

या नंतरच्या JSW Steel Coated Products Ltd या कंपनीच्या भेटीत या उद्योग संस्थेचे मानव संसाधन अधिकारी श्री. बी. जाधव यांनी विद्यार्थ्यांचे स्वागत केले व व्यवस्थापकीय अधिकारी एम. पी. गुप्ता यांनी विद्यार्थ्यांना कंपनीच्या पूर्ण यंत्र संच प्रकल्पाची महत्त्वपूर्ण माहिती व इतिहास सांगितला तसेच इतर अधिकाऱ्यांनी कंपनीचे प्रक्रिया विभाग आणि मानव संसाधन विषयक धोरणाची माहिती दिली. विशेषतः ३.८० एकर परिसरात स्थित असा आशियातील सर्वात प्रभावी आणि संक्षिप्त वीज प्रकल्पाची तपशीलवार रचना आणि वीजनिर्मिती प्रक्रिया प्रत्यक्ष पाहताना तर विद्यार्थ्यांना खूपच आनंद झाला. या कंपनी मध्ये मुख्यतः Galvalume, Galvanizing आणि color coating या तीन प्रक्रियांचे कामकाज चालते. तसेच या कंपनी मध्ये ५एस.(५'S) या जपानी तंत्राची प्रभावीपणे अंमलबजावणी होते व योग्य यादी व्यवस्थापनाच्या साहाय्याने प्रगत तंत्रज्ञान आणि अद्ययावत यंत्रसामग्रीचा वापर करून विद्युत घटाचे अखंड उत्पादन करणारी प्रक्रिया देखील येथे आहे.

एकंदरीत या औद्योगिक क्षेत्र भेटींतून विद्यार्थी जे वर्गात शिकतात ते उद्योगात प्रत्यक्षात कसे उपयोगात आणले जाते हे पाहण्याची संधी मिळाली. आम्हाला असा विश्वास आहे की या पुढेही विद्यार्थ्यांसाठी अशा भेटी आयोजित केल्या गेल्या तर विद्यार्थ्यांना या क्षेत्रात अधिक प्राविण्य मिळवण्यासाठी त्याचा उपयोग होईल तसेच उद्योग संस्थांना देखील या तरुण पिढीकडून नवीन कल्पना मिळतील व शिक्षण संस्था आणि उद्योग संस्था याच्या मधील दरी कमी होण्यासाठी नक्की फायदेशीर ठरतील.

## || आईपण ||

आई होणं...

म्हणजे स्त्रीचा दुसरा जन्म होणं...

असंख्य वेदना आणि यातना सोसताना

त्या होणाऱ्या आईच्या मुखीही ''आई गं'' ची कळ...

होता मखमली एक स्पर्श

कोवळ्या आईचेही रिते होई आभाळ...

इथे आईची परीक्षा संपलेली नसते

इथूनच 'आईपण' सुरू झालेले असते

दूर कामावर गेलेल्या माउलीचे लक्ष पिलापाशी

घरी येताच घट्ट धरे लेकरू उराशी

आईचे बोट धरुनी बाळ शाळेला जात असते

बोट सोडताना लेकराच्या मनाची घालमेल माउलीला कळत असते

त्या क्षणी मन भरून आलेल्या आईच्या ओठी स्मित असते

ही क्षणिक ताटातूट सहन करण्याची शक्ती देवाने प्रत्येक आईला दिलेली असते

लेकरू मोठं झाल्यावर ही सगळी गोष्टं,

म्हणजे त्याच्यासाठी त्याचे 'बालपण'...

पण आईची गोष्ट संपतच नाही,

कारण, तिने आजन्म स्वीकारलेलं असते 'आईपण'

**– विभूती सावे**

सहाय्यक प्राध्यापक

डॉ. वा. ना. बेडेकर इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज

●●●

पाण्याचा एक थेंब महत्त्वाचा नसेल पण ह्या थेंबाची संततधार जर दगडावर पडली तर ती धार दगडाला विंधते.

(पृष्ठ क्र. २ वरून ... **संपादकीय**)

अजूनही उडताना दिसतात. एका सशक्त लोकशाहीमध्ये विरोधी पक्षांनी आपल्या जबाबदारीचे भान ठेवून सरकारवर टीका करायलाच हवी व सरकारने देखील ही टीका सकारात्मक दृष्ट्या घेतली पाहिजे.

येथे अजून एक मुद्दा महत्त्वाचा आहे. तो म्हणजे भारतामध्ये काळा पैसा निर्माण का होतो? ह्याचे उत्तर देताना एक धाडसाचे विधान करावे लागेल व ते म्हणजे आतापर्यंतच्या सरकारांनी घेतलेले चुकीचे निर्णय व त्रुटी असलेले बनवलेले कायदे हे होय. आपण भारतातील परिस्थितीचे बारीक निरिक्षण केले तर असे लक्षात येते की, येथे अनेक प्रकारच्या कायद्यांची मांदियाळी झाली आहे. स्वातंत्र्यानंतर जवळ जवळ ६९ ते ७० वर्षांच्या काळात भारतात सत्तेवर येणाऱ्या सरकारांनी जनतेवर विविध नवनवीन कायद्यांचा भडीमार केलेला आढळतो. हे कायदे व्यापार-उदीम, जंगल, उत्पन्न, नैसर्गिक साधन संपत्ती, विक्रीकर इत्यादी अनेक बाबतीत केलेले आढळतात. केंद्रीय अर्थमंत्रालय, वाणिज्य मंत्रालय, कंपन्यांविषयीचा कारभार पाहणारे मंत्रालय इत्यादी मंत्रालये वा खाती एकंदरीतच बँक व्यवसाय, अर्थव्यवस्था, चलन व विविध कर इत्यादी बाबतचे कायदे सततपणे करताना दिसतात. त्यामुळे प्रत्येक बाबतीत अनेक कायदे, ह्या कायद्यांमधून बाहेर पडण्याच्या पळवाटा व ह्या पळवाटांमधून बाहेर पडण्यासाठी होणारा भ्रष्टाचार असे दृश्य आपल्या डोळ्यांसमोर उभे राहते व ह्यातूनच काळ्या पैशाची निर्मिती होते असे म्हणणे वावगे ठरणार नाही. नेमके हेच थांबवावयाचे असेल तर फक्त कायदे करून चालणार नाही; तर त्या कायद्यांची काटेकोरपणे अंमलबजावणी झाली पाहिजे हे देखील पाहायला हवे. नेमका हाच फरक आपल्यात व पाश्चिमात्य राष्ट्रांत आढळून येतो. युरोप, उत्तर अमेरिकेतील तसेच दक्षिण गोलार्धातील ऑस्ट्रेलिया व न्यू झीलंड हे देश प्रगत समजले जातात व येथील मानवी जीवनाची प्रत (राहणीमान) अतिशय चांगली आहे असे म्हटले जाते. याचा अर्थ असा की, येथे व्यापार-उदीम, उत्पन्न व इतर अनेक बाबतीतचे सर्वसमावेशक कायदे आहेत. ह्या कायद्यांची अंमलबजावणी सुरळीतपणे होते. एखाद्याने, मग तो कितीही मोठा व्यक्ती असला तरी, कायद्याचे उल्लंघन केले तर त्यास शिक्षा होते. आपल्यासारखी तेथे वशीलेबाजी चालत नाही की, तुरुंगांमध्ये भारताप्रमाणे काही 'विशेष' कैद्यांना 'व्ही.आय.पी.' सारखी वागणूक मिळत नाही.

ह्या देशांमध्ये (पश्चिमेकडील प्रगत) खऱ्या अर्थाने 'कायद्याचे' राज्य तर आहेच मात्र सरकार आपल्या सामाजिक व राष्ट्रीय जबाबदारीचे भान ठेवून आपले निर्णय राबवत असते व कायद्यांची अंमलबजावणी करत असते. त्यामुळेच अगदी क्षुल्लकशा गोष्टीवरून देखील तेथील लोक सरकारला धारेवर धरताना व कोर्टात खेचताना दिसतात. ह्या देशांमधील करप्रणाली विषयक व वित्त विषयक कायदे अगदी कडक आहेत. ह्या अनेक देशांमध्ये लोकांकडून कर रूपात देखील मोठ्या प्रमाणात महसूल गोळा केला जातो. मात्र, एक गोष्ट खरी की, हा सगळा पैसा जनतेच्या हितासाठी व देशसंरक्षणार्थ वापरला जातो. त्यामुळेच पाश्चिमात्य देशांमध्ये जनतेला चांगले व स्वच्छ रस्ते, सुरक्षित पाणी पुरवठा, उत्तम दर्जाची 'पब्लिक ट्रान्सपोर्ट सिस्टम'- सार्वजनिक दळणवळणाची पद्धत (ह्यात बससेवा, टॅक्सीसेवा, रेल्वे, मेट्रो इत्यादींचा समावेश होतो) इत्यादी गोष्टींचा लाभ होतो. युरोपातील अनेक देशांमध्ये तर स्वतःच्या मालकीची गाडी असतानादेखील बस व मेट्रोतून प्रवास करणाऱ्यांची संख्या जास्त आहे. असे होण्याचे कारण म्हणजे तेथील जनतेला विश्वास आहे की, आपल्या सरकारने केलेल्या ह्या सुविधा अतिशय छान असून त्यांची सेवा अतिशय योग्य, चोख व नियोजनबद्ध असते.

---

श्रध्दावान, बुद्धीवान, कर्तृत्ववान व ऐश्वर्यवान माणसांचे ते कोठेही गेले
तरी हार्दिक स्वागत होते- गौतम बुद्ध

म्हणजेच बस व मेट्रो वेळेवर धावतात. त्या स्वच्छ असतात व लंडनसारख्या शहराची तर लोकसंख्या जास्त असूनदेखील ह्या वाहनांमध्ये आपल्यासारखी तुडूंब गर्दी नसते. ह्या देशांमध्ये ज्येष्ठ नागरिकांसाठी देखील अनेक विशेष सेवा व फायदे सरकारने उपलब्ध करून दिलेले आढळतात. सर्वात महत्त्वाचे म्हणजे ह्या देशांमध्ये समाजातील कुठल्याही स्तरातील व्यक्तीला परवडण्यासारखी उत्तम दर्जाची आरोग्य सेवा आहे. हे एवढे सांगण्याचे कारण म्हणजे ह्या सर्वांचा अभाव आपल्याकडे दिसतो. परंतु आपणही अशा प्रकारच्या सुविधा जनतेला देऊ शकतो व आपल्या देशातील जनतेची मानवी जीवनाची प्रत वाढवू शकतो. आपल्या देशाचे राष्ट्रीय उत्पन्न व दरडोई उत्पन्न सध्या वाढत आहे. परंतु येत्या काळात ते अनेक पटीने वाढायला हवे. जर आपणास खरोखरच देशातील मानवी जीवनाची प्रत व देशाच्या विकासाचा दर वाढवावयाचा असेल तर मग फक्त रु. ५०० च्या व रुपये १००० च्या नोटा बंद करून चालणार नाही. आपल्याला त्याउपर जाऊन पुढचा विचार करणे आवश्यक आहे. मग हा पुढचा विचार कुठला? ह्याचाच एक भाग म्हणजे आपल्याला भारतीय अर्थव्यवस्थेमध्ये संरचनात्मक बदल वा सुधारणा (Structural reforms) घडवाव्या लागतील. युरोप व अमेरिकेत मोठ्या मूल्यांच्या नोटा कधीच बंद करण्यात आल्या आहेत. युरोपमध्ये तर ५०० युरोच्या नोटेला 'बिन लादेन' म्हणतात. कारण ह्या नोटांचाच उपयोग प्रामुख्याने दहशतवाद्यांना आर्थिक पुरवठा करण्यासाठी व इतर वाममार्गांसाठी केला जातो. अमेरिकेनेदेखील १०० डॉलरपेक्षा जास्त मूल्य असणाऱ्या नोटा बंद केल्या आहेत. त्यामुळे आपल्या सरकारने रुपये ५०० व १००० च्या नोटा बंद केल्या मात्र त्याऐवजी ५०० च्या नवीन नोटा व २००० एवढे अधिक मूल्य असलेल्या नोटा चलनात का आणल्या असाव्यात हे लक्षात येत नाही. असो, भारतातून खरोखरच काळे धन नष्ट करावयाचे असेल तर मग वर नमूद केल्याप्रमाणे संरचनात्मक बदल घडवून आणण्याची आवश्यकता आहे. त्यासाठी जनतेमध्ये देखील जागरुकता निर्माण करणे गरजेचे आहे. चलनात वा अर्थव्यवस्थेत कमीत कमी प्रमाणात चलनी नोटा वापरात याव्या असे सरकारला वाटत असेल तर त्यानुसार बँकींग व्यवस्थेत देखील अनेक बदलांची गरज आहे व त्यास अनुसरून Physical infrastructure (मूलभूत सुविधांची) उपलब्धता व कार्यशीलता सिद्ध करावी लागेल. ह्यासाठी मोठ्या प्रमाणात माहिती तंत्रज्ञानाचा (IT) उपयोग करून ही सर्व तांत्रिक व्यवस्था उभी करावी लागेल तेव्हा कोठे एवढ्या विस्तीर्ण अशा भारत देशातील कानाकोपऱ्यांतील सामान्यांमधील सामान्य माणूस डेबीट कार्ड, क्रेडिट कार्ड इत्यादी 'प्लास्टिक मनीचा' वापर करू शकेल व सर्व व्यवहारांची माहिती देखील ठेवता येईल. असे झाले तरच खऱ्या अर्थाने देशातील काळ्या धनाचे उच्चाटन होईल. शेवटी सर्वात महत्त्वाचे म्हणजे जे कर सरकार जनतेकडून वसूल करते, त्याचा परतावा जनतेला जागतिक दर्जाच्या उत्तम सुखसुविधा देऊन करावा लागेल. तरच खऱ्या अर्थाने लोकांचे राहणीमान उंचावेल, काळा पैसा कितीतरी पटीने कमी होईल व देश देखील आर्थिकदृष्ट्या प्रगत होईल. नरेंद्र मोदींचे सरकार येत्या अडीच वर्षांच्या कालावधीत हे करू शकेल अशी अपेक्षा आहे. मोदींना हे जमले नाही तर अन्यथा, पुन्हा म्हणावे लागेल 'ये रे माझ्या मागल्या!'

**सुभाष गं. शिंदे**

●●●

Posting under the Reg. No. MH/MR/TNC-27/2004-2006


# विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

- *अत्याधुनिक दृक्श्राव्य यंत्रणा*
- *वातानुकूलित प्रसन्न वातावरण*
- *वाहने उभी करण्यासाठी प्रशस्त जागा*

*अशा सुविधांनी युक्त*

| सभागृहाचे नाव | ठिकाण | आसन क्षमता |
|---|---|---|
| थोरले बाजीराव पेशवे सभागृह | महाविद्यालय परिसर | ३०० |
| कात्यायन सभागृह | कला/वाणिज्य इमारत, ३ रा मजला | १६० |
| पातंजली सभागृह | बा. ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालय इमारत | १६० |
| पाणिनी सभागृह | डॉ. वा. ना. बेडेकर व्यवस्थापन अभ्यास संस्था इमारत | १८० |
| मनु सभागृह | वि.प्र.मं.चे ठाणे नगरपालिका विधी महाविद्यालय इमारत | २५० |

## संपर्क

कार्यवाह

**विद्या प्रसारक मंडळ**

विष्णूनगर, नौपाडा, ठाणे – ४०० ६०२

दूरध्वनी क्रमांक – २५४२६२७०


हे मासिक प्रकाशक आणि संपादक डॉ. विजय वासुदेव बेडेकर व मुद्रक श्री. विलास सांगुर्डेकर, परफेक्ट प्रिण्टस्, नुरीबाबा दर्गा रोड, ठाणे-४०० ६०१ या मुद्रणालयामध्ये छापून विद्या प्रसारक मंडळ, जिल्हा ठाणे-४०० ६०२ यांच्याकरिता विद्या प्रसारक मंडळ, डॉ. बेडेकर विद्या मंदिर, विष्णूनगर, ठाणे - ४०० ६०२ इथून प्रकाशित केले.